रविवार
१० ऑगस्ट २०२५

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : १६१
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

# अजिंक्य भारत

बातम्यांचा गतिमान पाठलाग




शुबमन गिलच्या जर्सीवर लागली सर्वात मोठी बोली

(पान ७ वर)


## महत्त्वाचे

### मुंबई विमानतळावर नेटवर्कमध्ये बिघाड,



**मुंबई :** विमानतळावर शनिवारी थर्ड पार्टीडेटा नेटवर्कमध्ये बिघाड झाल्याने विमानांच्या उड्डाणे प्रभावित झाल्याची घटना घडली. यानंतर एअर इंडियाने प्रवाशांना संभाव्य उशीराबाबत माहिती देत एक ॲडव्हायजरी जारी केली आहे. दरम्यान या बिघाडामुळे एअर इंडियासह इतरही अनेक विमानांच्या उड्डाणांवर परिणाम झाल्याचे पाहायला मिळाले.
दरम्यान विमान कंपनीने माहिती दिली की बिघाड झालेली सिस्टीम दुरुस्त करण्यात आली आहे. मात्र असे असले तरी काही विमानांच्या उड्डाणांना उशीर होण्याची शक्यता आहे, आणि ही उड्डाणे काही काळांनी सुरळित होतील. तसेच विमान कंपनीने विमानतळाकडे जाण्याच्या आधी फ्लाइटचे स्टेटस तपासून घेण्याचा सल्ला प्रवाशांना दिला आहे.

### माजी उपराष्ट्रपती कुठे गायब?- सिब्बल



**नवी दिल्ली :** जगदीप धनखड यांनी उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा दिल्यापासून ते कुठे गायब आहेत? त्यांच्या आरोग्याबद्दल आणि सुरक्षेबाबत चिंता वाटत आहे. त्यामुळे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या संदर्भात विधान करावे, असे आवाहन राज्यसभा खासदार कपिल सिब्बल यांनी शनिवारी केले. राजीनामा दिल्यापासून जगदीप धनखड सार्वजनिकरित्या कार्यक्रमात किंवा इतरत्र दिसले नाहीत, असे सिब्बल म्हणाले.पत्रकार परिषदेत कपिल सिब्बल म्हणाले की, ''लापता लेडीज'' चित्रपटाबद्दल ऐकले होते पण कधीही ''लापता उपराष्ट्रपतीं'' बद्दल ऐकले नाही. उपराष्ट्रपतींच्या राजीनाम्यानंतर, आम्हाला त्यांच्या ठावठिकाण्याबद्दल काहीही माहिती नाही. सिब्बल यांनी दावा केला की, धनखड त्यांच्या अधिकृत निवासस्थानी नाहीत. २२ जुलै रोजी, जगदीप धनखड यांनी राजीनामा दिला. आज ९ ऑगस्ट आहे आणि त्या दिवसापासून, ते कुठे आहेत हे आम्हाला माहित नाही, असे ते म्हणाले. मी त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्या खाजगी सचिवांनी फोन उचलला आणि सांगितले की ते विश्रांती करत आहेत, असे सिब्बल यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

### उत्तराखंड:महाराष्ट्रातील १७२ पैकी १७१ पर्यटक सुरक्षित

**मुंबई :** उत्तराखंडमधील धराली परिसरात झालेल्या भीषण भूस्खलन आणि पूरस्थितीत अडकलेल्या महाराष्ट्रातील १७२ पैकी १७१ पर्यटक सुरक्षित आहेत. उर्वरीत एक पर्यटक कृतिका जैन यांच्याशी उत्तराखंडमधील स्थानिक प्रशासन संपर्क साधण्यासाठी प्रयत्न करत आहे.एकुण १७१ पर्यटकांपैकी १६० पर्यटक (३१ मातली, ६ जॉली ग्रॅन्ट तसेच १२३ उत्तरकाशी) येथे सुखरुप आहेत. सुरक्षित पर्यटकांनी त्याच्या नियोजित कार्यक्रमानुसार वाटचाल सुरु केली आहे. उर्वरित ११ पर्यटक हर्षील येथे सुरक्षित असून त्यांना एअर लिफ्ट करुन सुरक्षित ठिकाणी हलविण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य आपत्ती नियंत्रण कक्ष हे उत्तराखंड जिल्हा नियंत्रण कक्ष, उत्तरकाशी आणि राष्ट्रीय आपत्कालीन प्रतिसाद केंद्र यांच्याशी सातत्याने संपर्कात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.आपत्ती व्यवस्थापन तथा जलसंपदा मंत्री गिरीश महाजन हे स्वतः उत्तरकाशी येथे घटनास्थळी दाखल झाले आहेत.

## मला पंतप्रधान व्हायचेय: चिमुकलीने लाडक्या मोदींकडे मागितली रक्षाबंधन ओवाळणी

**नवी दिल्ली : दि. ९** वृत्तसंस्था

देशभरात शनिवारी रक्षाबंधनाचा सण साजरा करण्यात आला. दिल्लीतील शाळकरी विद्यार्थीनींनी पंतप्रधान निवासस्थानी जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदींना राखी बांधली. चिमुकल्या विद्यार्थीनींनी पंतप्रधान मोदींसाठी विशेष राख्या आणल्या होत्या.या विशेष रक्षाबंधन कार्यक्रमाचा एक व्हिडीओ पंतप्रधान मोदींनी त्यांच्या सोशल मीडियावर शेअर केला.



### पंतप्रधानांचे विद्यार्थीनींसोबत रक्षाबंधन

### चिमुकल्यांनी बांधली नरेंद्र मोदींना विशेष राखी

व्हिडीओमध्ये चिमुकल्यांसोबत पंतप्रधान मोदी संवाद साधताना दिसत आहेत. त्यांनी सर्व विद्यार्थिनींना रक्षाबंधनच्या शुभेच्छा दिल्या. एक चिमुकली मला पंतप्रधान व्हायचे आहे, असे पंतप्रधान मोदींना सांगताना दिसत आहे. 'स्वच्छ भारत', 'मन की बात', 'उज्वला गॅस', 'अटल पेन्शन', 'डिजीटल इंडिया', अशा केंद्र सरकारच्या सर्व योजनांचा आणि 'ऑपरेशन सिंदूर'चा उल्लेख यावेळी दोन विद्यार्थिनींनी पंतप्रधान मोदींसमोर केला.या सर्व योजना विद्यार्थीनींनी लक्षात ठेवल्याने पंतप्रधानांनी त्यांचे कौतुक केले. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक्स' पोस्ट करुन देशवासियांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा देखील दिल्या.

## देशात संरक्षण उत्पादनाने गाठला विक्रमी टप्पा

### भारताची ऐतिहासिक झेप

**नवी दिल्ली : दि. ९** वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आत्मनिर्भर भारत या महत्त्वाकांक्षी संकल्पनेला संरक्षण क्षेत्रात मोठे यश मिळाले आहे. भारताचे वार्षिक संरक्षण उत्पादन आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये १,५०,५९० कोटी रुपयांच्या (सुमारे १.५१ लाख कोटी रुपये) अभूतपूर्व पातळीवर पोहोचले आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी शनिवारी ही घोषणा केली.
ही वाढ केवळ देशाच्या संरक्षण सिद्धतेसाठीच नव्हे, तर भारताला एक जागतिक संरक्षण उत्पादन केंद्र बनवण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.
संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनानुसार, हे यश आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत संरक्षण उत्पादनातील स्वयंपूर्णतेच्या वाढत्या गतीचे आणि वचनबद्धतेचे प्रतीक आहे.
संरक्षण उत्पादनातील हा विक्रमी आकडा गेल्या आर्थिक वर्षाच्या (२०२३-२४) तुलनेत तब्बल १८ टक्क्यांची मजबूत वाढ दर्शवतो. गेल्या वर्षी हे उत्पादन १.२७ लाख कोटी रुपये होते. मात्र, सर्वात लक्षणीय बाब म्हणजे गेल्या पाच वर्षांतील वाढ. आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये जे उत्पादन केवळ ७९,०७१ कोटी रुपये होते, त्यात आता तब्बल ९० टक्क्यांची वाढ झाली आहे.
या कामगिरीबद्दल संरक्षण उत्पादन विभाग, संरक्षण सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि खाजगी उद्योगांच्या एकत्रित प्रयत्नांचे संरक्षणमंत्र्यांनी कौतुक केले. त्यांनी म्हटले की, हा वाढता आलेख भारताच्या संरक्षण औद्योगिक पायाच्या मजबुतीचे स्पष्ट द्योतक आहे. (पान २ वर)



### वाढीचा वेग आणि आकडेवारी

- आर्थिक वर्ष २०२४-२५ - १,५०,५९० कोटी रुपये
- आर्थिक वर्ष २०२३-२४ - १,२७,००० कोटी (१८ % वाढ)
- आर्थिक वर्ष २०१९-२० - ७९,०७१ कोटी (९० % वाढ)

### यशामागील कारणे

गेल्या दशकात सरकारने संरक्षण क्षेत्रात केलेल्या दूरगामी धोरणात्मक सुधारणा, व्यवसाय सुलभतेसाठी उचललेली पावले आणि स्वदेशीकरणावर दिलेला विशेष भर या वाढीमागे असल्याचे मानले जाते.

## शरद पवारांचा गौप्यस्फोट;राजकीय वर्तुळात खळबळ!

### निवडणुकीच्या १६० जागांसाठी भेटायला आलेली ती दोन माणसे कोण?

**नागपूर : दि. ९** वृत्तसंस्था

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी- शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्या उपस्थितीत आज नागपूरात मंडल यात्रेचा शुभारंभ झाला. याप्रसंगी शरद पवारांनी पत्रकारपरिषेदत बोलताना विविध मुद्द्यांवर भूमिका मांडली. तसेच यावेळी शरद पवारांन एक मोठा गौप्यस्फोटही केला. शरद पवार म्हणाले, विधानसभा निवडणुकीआधी दोन माणसं भेटायला आली होती. त्यांच्याकडून १६० जागा जिंकून देण्याची गॅरेंटी देण्यात आली होती.



त्या दोन व्यक्तींची राहुल गांधी यांच्यासोबत भेट घालून दिली होती. त्यावेळी यामध्ये आपण पडायला नको, असे आम्ही ठरवलं. ज्यामुळे आता राजकीय वर्तुळात ती दोन माणसे नेमकी कोण याबाबत चर्चांना उधाण आलं आहे.
शरद पवार यावेळी त्यांनी ठाकरे बंधूंची युती आणि राहुल गांधींच्या आरोपांवरही भाष्य केले. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंच्या युतीवर बोलताना पवार म्हणाले की यावर आता ठोस बोलताना येणार नाही, आम्ही चर्चा करू. तर राहुल गांधींचे मतचोरीचे आरोप संशय घेणारे आहेत. राहुल गांधींच्या पत्रकार परिषदेला मीही उपस्थित होतो. राहुल गांधींच्या आरोपाला आयोगाने उत्तर द्यावे.
राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा बिहारमधील मतदार यादी पूनसर्वेक्षणावरून निवडणूक आयोगाला लक्ष्य केलं आहे. राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेत थेट पुरावेच सादर केले होते. यावेळी त्यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत घोळ झाल्याचाही आरोप त्यांनी केला होता. तसेच अनेक निवडणुकीत एका व्यक्तीने तीन वेळा मतदान केल्याचंही त्यांनी म्हटलेलं आहे. राहुल गांधींच्या या आरोपानंतर आता राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आलं आहे


## आरोपीने न्यायालयातून काढला पळ सहा पोलिसांचे निलंबन

**ठाणे दि. ९** वृत्तसंस्था

येथील मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांना कळवा रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी नेताना गंभीर त्रुटी केल्याप्रकरणी ठाणे पोलीस दलातील नऊ पोलीस कर्मचारी निलंबित झाले. हे प्रकरण ताजे असतानाच, भिवंडीत बलात्काराच्या गुन्ह्यातील आरोपी पळून गेल्याने ६ पोलीस कर्मचारी निलंबित करण्यात आले आहेत. यामुळे गेल्या दोन दिवसात एकूण १५ पोलिसांवर निलंबनाची कारवाई झाली आहे.ठाणे मध्यवर्ती कारागृह येथील ५ आरोपींना भिवंडी न्यायालय येथे हजर करण्यासाठी ठाणे पोलिसांनी पथक नेमले होते. पथकाच्या ताब्यात असलेल्या आरोपीमध्ये भिवंडी शहर पोलीस ठाण्यात बलात्काराच्या आरोपाखाली अटक असलेल्या सलामत अली अन्सारी (३२) याचा समावेश होता.सलामत हा मूळचा बिहार राज्यातील मधुबन जिल्ह्याचा रहिवासी असून तो सध्या भिवंडीत राहात होता.

(पान २ वर)

## ऑपरेशन अखलदरम्यान दोन जवान शहीद



**जम्मू : दि. ९** वृत्तसंस्था

### एका दहशतवाद्याचा खात्मा

जम्मू-काश्मीरमधील कुलगाममध्ये ऑपरेशन अखलदरम्यान दोन जवान शहीद झाले आहेत, तर एका दहशतवाद्याचा खात्मा करण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांपासून कुलगाममध्ये सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. मात्र शनिवारी सकाळी चकमक तीव्र झाली आणि जोरदार गोळीबार झाला.
आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार, यामध्ये १० सुरक्षा कर्मचारी जखमी झाले आहेत, तर दोन जवान शहीद झाले आहेत. सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये अद्याप चकमक सुरू आहे. सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांना सर्व बाजूंनी घेरले आहे. असे सांगितले जात आहे की, या भागात अनेक दहशतवादी लपलेले असू शकतात आणि त्यांचा शोध सुरू आहे.जम्मू-काश्मीरमधील कुलगाममध्ये गेल्या अनेक दिवसांपासून लष्कर आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. ऑपरेशन महादेवद्वारे सुरक्षा दलांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यांतील गुन्हेगारांना ठार केल्यापासून, दहशतवादी संतप्त झाले असून, त्यांच्याकडून सतत कट रचले जात आहेत.आता या भागात, कुलगाममध्ये ही मोठी चकमक झाली आहे. यामध्ये आतापर्यंत सुरक्षा दलांचे दोन जवान शहीद झाल्याचे वृत्त आहे. सुरक्षा दल दहशतवाद्यांना चोख प्रत्युत्तर देत आहेत. दहशतवादी घनदाट जंगलांचा पुरेपूर फायदा घेत आहेत, असे सांगितले जात आहे की सध्या किमान तीन दहशतवादी लपले आहेत. त्या दहशतवाद्यांना शोधण्यासाठी सुरक्षा दल शोध मोहीम राबवत आहेत. ऑपरेशन महादेवनंतर या परिसरात तणाव वाढला आहे. कुलगाममध्ये, जिथे ही चकमक झाली, तेथे सुरक्षा दल गेल्या नऊ दिवसांपासून ऑपरेशन अखल राबवत आहेत. यापूर्वी, या भागात अनेक दहशतवादी लपले असल्याची माहिती मिळाली होती, त्यांचा खात्मा करण्यासाठी, सैन्य आणि जम्मू-काश्मीर पोलीस कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे ऑपरेशन राबवले.

## ५ उच्च न्यायालयांमध्ये १६ न्यायाधीशांची नियुक्ती

### केंद्र सरकारकडून अधिसूचना जारी

**नवी दिल्ली : दि. ९** वृत्तसंस्था

केंद्र सरकारने शुक्रवारी आंध्र प्रदेश, कलकत्ता, दिल्ली, छत्तीसगड आणि कर्नाटक या उच्च न्यायालयांमध्ये १६ न्यायाधीशांच्या नियुक्त्यांची अधिसूचना जारी केली. केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी 'एक्स' या सोशल साइटवर नियुक्त्यांच्या अधिसूचनेची माहिती दिली. भारतीय संविधानाने दिलेल्या अधिकारांनुसार, भारताच्या राष्ट्रपतींनी भारताच्या सरन्यायाधीशांशी सल्लामसलत केल्यानंतर उच्च न्यायालयांमध्ये न्यायाधीश आणि अतिरिक्त न्यायाधीशांची नियुक्ती केली आहे, अशी माहिती त्यांनी दिली.
अतिरिक्त न्यायाधीश न्यायमूर्ती बिस्वरूप चौधरी, न्यायमूर्ती प्रसेनजीत बिस्वास, न्यायमूर्ती उदय कुमार, न्यायमूर्ती अजय कुमार गुप्ता, न्यायमूर्ती सुप्रतिम भट्टाचार्य, न्यायमूर्ती पी.एस. चॅटर्जी आणि न्यायमूर्ती एम.डी. शब्बर रशिदी यांची ३१ ऑगस्ट २०२५ पासून १ वर्षाच्या नवीन कार्यकाळासाठी कोलकाता उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## ३३४ नोंदणीकृत राजकीय पक्षांना यादीतून काढले

### भारतीय निवडणूक आयोगाचा निर्णय

**नवी दिल्ली : दि. ९** वृत्तसंस्था

भारतीय निवडणूक आयोगाने शनिवारी ३३४ नोंदणीकृत राजकीय पक्षांना यादीतून काढून टाकले आहे. २०१९ पासून आतापर्यंत गेल्या सहा वर्षांत एकही निवडणूक लढवण्याचे आवश्यक निकष या पक्षांना पूर्ण करता आले नाहीत.
याशिवाय, या पक्षांची कार्यालये त्यांच्या नोंदणीकृत कागदपत्रांमध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर देखील उपस्थित नाहीत. यामुळे निवडणूक आयोगाने अशा सर्व पक्षांची मान्यता काढून घ्यायचा निर्णय घेतला आहे.आयोगाने म्हटले आहे की, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सर्व तथ्ये आणि शिफारसींचा विचार केल्यानंतर, यादीतून हे पक्ष वगळले आहेत. आता, एकूण २८५४ पक्षांपैकी २५२० पक्ष शिल्लक आहेत. सध्या निवडणूक आयोगाकडे सहा राष्ट्रीय पक्ष, ६७ राज्यस्तरीय पक्ष आहेत.
निवडणूक आयोगाच्या (पान २ वर)




### ३० दिवसांच्या आत आक्षेप नोंदवा

निवडणूक आयोगाने असेही म्हटले आहे की जर कोणत्याही पक्षाला या आदेशाबद्दल काही अडचण असेल तर तो ३० दिवसांच्या आत आयोगाकडे अपील करू शकतो. निवडणूक आयोग अशा पक्षांना काढून टाकत आहे, जे आता जनतेच्या संपर्काच्या बाहेर आहेत.
ते फक्त कागदावरचे अस्तित्व टिकवून आहेत. जून २०२५ मध्ये, निवडणूक आयोगाने सफाई अभियान सुरू केले. यासह, राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना वरील अटींचे पालन करण्याबाबत ३३५ आरयूपीपींची पडताळणी तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले.

## दिल्लीत राम मंदिराची भिंत पडून आठ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली : दि. ९** वृत्तसंस्था

राजधानी दिल्लीतील हरिनगरमध्ये शनिवारी पावसादरम्यान भिंत कोसळल्याने एक अपघात झाला. जैतपूर पोलिस स्टेशनच्या हरिनगरमधील बाबा मोहन राम मंदिराजवळील समाधी स्थळाची भिंत कोसळल्याने सुमारे आठ जण गाडले गेले.
या अपघातात सर्व आठ जखमींचा मृत्यू झाला आहे. अपघातातील आठ जणांमध्ये तीन पुरुष, दोन महिला, दोन मुली आणि एक मुलगा आहे. सात जणांच्या मृत्यूनंतर, जखमी हाशिबुलवर रुग्णालयात उपचार सुरू होते. त्याचाही मृत्यू झाला आहे.
दिल्ली अग्निशमन विभागाने आठही जणांच्या मृत्युला पुष्टी दिली आहे. या अपघातात शबीबुल ३०, रबीबुल ३०, मुत्तू अली ४५ हे तीन पुरुष, रुबिना २५ आणि डॉली २५ या दोन महिला, रुखसाना ६, हसीना ७ या दोन मुली आणि हाशिबुल नावाच्या मुलाचा मृत्यु झाला आहे.मृत्यूची माहिती देण्यापूर्वी, अतिरिक्त डीसीपी दक्षिण पूर्व ऐश्वर्या शर्मा म्हणाल्या की येथे एक जुने मंदिर आहे आणि त्याच्या शेजारी जुन्या झोपडपट्ट्या आहेत. तिथे भंगार विक्रेते राहतात. रात्रीच्या मुसळधार पावसामुळे भिंत कोसळली.
अपघातात आठ लोक अडकले, ज्यांना वाचवण्यात आले आणि रुग्णालयात नेण्यात आले. भविष्यात अशी घटना घडू नये म्हणून आम्ही आता या झोपड्या रिकाम्या केल्या आहेत.यापूर्वी, दक्षिण पूर्व दिल्लीतील जैतपूर भागात असलेल्या हरी नगरमध्ये इमारत कोसळल्याची नोंद झाली होती. नंतरच्या तपासात असे दिसून आले की ही घटना इमारत कोसळल्याची नाही तर भिंत कोसळल्याची होती.

## वास्तव | आनंद गवई वयाच्या ऐकोणीसव्या वर्षी झाले होते शहीद

# बलिदानानंतरही सुरूच कुटुंबाचा संघर्ष

। विठ्ठल महल्ले ।

**अकोला, दि. ९ :** अकोला देशासाठी सर्वोच्च बलिदान दिलेल्या आपल्या वीर जवानांना आपण मोठ्या अभिमानाने नमन करतो, त्यांच्या शौर्यकथांची उजळणी करतो. पण प्रत्यक्षात त्यांच्या कुटुंबियांची परिस्थिती काय असते, हे आपण क्वचितच पाहतो. अकोल्यातील शहीद आनंद गवई यांच्या कुटुंबाची कहाणी ही अशाच कटू वास्तवाची साक्ष देते.
२४ एप्रिल १९९० रोजी जन्मलेले आनंद गवई, लहानपणापासूनच शिस्तप्रिय आणि कर्तव्यनिष्ठ होते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर १४ सप्टेंबर २००९ रोजी त्यांनी भारतीय सैन्यात प्रवेश केला. जम्मू-काश्मीरमध्ये ऑपरेशन रक्षक मोहिमेदरम्यान, २६ जानेवारी २०१७ रोजी कुरेज सेक्टरमध्ये झालेल्या भीषण हिमस्खलनात आनंद गवई देशासाठी हसत-हसत हौतात्म्य पत्करले. त्यांच्या बलिदानाने संपूर्ण अकोला जिल्हा अश्रूधारा धरून उभा राहिला होता. हजारोंच्या उपस्थितीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार झाले, आणि त्यावेळी दिलेली आश्वासने आजही कागदावरच अडकून आहेत. अंत्यसंस्कारावेळी (पान २ वर)







एकीकडे आपण प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या वीरांना सलाम करतो, तर दुसरीकडे त्याच दिवशी शहीद झालेल्या आनंद गवई यांच्या कुटुंबाला प्रशासनाच्या गलथान कारभाराशी लढावे लागते. पुतळा काढला, दिलेली शेती परत घेतली, आणि रस्त्याला दिलेले नावही अडवले या सगळ्यात नेमका गुन्हा कोणाचा आहे?''माझ्या मुलाच्या बलिदानाचं हे असं कौतुक?'' देशासाठी प्राण देणाऱ्या जवानाच्या कुटुंबाशी असा अवमान करणे केवळ अन्यायकारक नाही, तर समाजाच्या संवेदनांवरही आघात आहे.आता तरी शासन प्रशासनाने हा अन्याय दूर करून वीर जवानाचा सन्मान करावा अशी रास्त अपेक्षा व्यक्त करतो.

**-शत्रुघ्न गवई,वीरपिता** ,अकोला.

### संघर्ष आणि आशेचा किरण

आनंद गवई यांचे बलिदान हे फक्त एका घराचे नव्हे, तर संपूर्ण अकोल्याचे अभिमान आहे. पण हा अभिमान जिवंत ठेवण्यासाठी त्यांचे कुटुंब आजही संघर्ष करत आहे. स्मारकाचे स्वप्न अजूनही अधुरे आहे, रस्त्याच्या नावाचा निर्णय अजूनही अडकलेला आहे,तरीही वीरपिता हार मानलेले नाहीत ''माझ्या मुलाच्या नावाचा सन्मान व्हायलाच हवा. हे फक्त माझं नाही, तर प्रत्येक नागरिकाचं कर्तव्य आहे,'' ते ठामपणे म्हणतात.

## पान 1 वरून...

### देशात संरक्षण उत्पादनाने ...

सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्राची भूमिका या एकूण उत्पादनात संरक्षण सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि इतर सार्वजनिक उपक्रमांचा वाटा सुमारे ७७ टक्के आहे, तर खाजगी क्षेत्राचे योगदान २३ टक्के राहिले आहे. विशेष म्हणजे, खाजगी क्षेत्राचा सहभाग सातत्याने वाढत आहे.
खाजगी क्षेत्राचा वाटा: आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये २१ टक्के असलेला खाजगी क्षेत्राचा वाटा यावर्षी २३ टक्क्यांपर्यंत वाढला आहे.उत्पादनातील वाढ: सार्वजनिक क्षेत्राच्या उत्पादनात जिथे १६ टक्क्यांची वाढ झाली, तिथे खाजगी क्षेत्राच्या उत्पादनात तब्बल २८ टक्क्यांची प्रभावी वाढ नोंदवण्यात आली आहे. हे देशाच्या संरक्षण परिसंस्थेत खाजगी उद्योगांची वाढती भूमिका अधोरेखित करते. आयातीवरील अवलंबित्व कमी करून देशांतर्गत गरजा पूर्ण करणारी आणि निर्यातीची क्षमता बळकट करणारी संरक्षण औद्योगिक व्यवस्था निर्माण करण्यावर सरकारने भर दिला आहे, ज्याचे सकारात्मक परिणाम आता दिसू लागले आहेत.भविष्यातील दिशा संरक्षण उत्पादनातील ही विक्रमी कामगिरी भारताच्या वाढत्या सामर्थ्याचे प्रतीक आहे. सरकारचे सातत्यपूर्ण धोरणात्मक पाठबळ, खाजगी क्षेत्राचा वाढता सहभाग आणि निर्यातीची वाढती क्षमता पाहता, भारताचे संरक्षण उत्पादन क्षेत्र येत्या काळात आणखी वेगाने प्रगती करेल, असा विश्वास तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे.या यशामुळे भारत केवळ आपल्या संरक्षण गरजांसाठी आत्मनिर्भर होणार नाही, तर मित्र राष्ट्रांना संरक्षण सामग्री निर्यात करणारा एक प्रमुख देश म्हणूनही उदयास येईल.

### आरोपीने न्यायालयातून काढला ...

त्याला पथकाने न्यायालयात हजर केले असता, तो गर्दीचा फायदा पोलिसांच्या रखवालीतून पळून गेला. याप्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी पळून गेल्याने कर्तव्यावर सतर्क न राहता निष्काळजीपणा आणि हालगर्जीपणाचे कृत्य करुन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम क्र.३ (तीन) चे उल्लंघन केले आहे, असा ठपका पथकातील ६ पोलीस कर्मचारी निलंबित करण्यात आले आहेत. ठाणे पोलीस मुख्यालयाचे पोलीस उपायुक्त डॉ. पवन बनसोड यांनी ही कारवाई केली आहे.

### ३३४ नोंदणीकृत राजकीय ...

विद्यमान मार्गदर्शक तत्त्वांनुसार, जर एखादा पक्ष सलग ६ वर्षे निवडणूक लढवत नसेल, तर तो पक्ष नोंदणीकृत पक्षांच्या यादीतून काढून टाकला जातो. हे रद्द झालेले पक्ष आता लोकप्रतिनिधी कायद्याच्या कलम २९ बी आणि कलम २९ सी च्या अधीन असतील. हे पक्ष निवडणूक चिन्ह (आरक्षण आणि वाटप) आदेश, १९६८ च्या तरतुदींनुसार कोणताही लाभ मिळविण्यास पात्र राहणार नाही.

### बलिदानानंतरही सुरूच कुटुंबाचा ...

उपस्थित प्रशासनिक अधिकारी आणि राजकीय नेत्यांनी शहरातील एका मार्गाला शहीदाचे नाव देण्याचे आणि भव्य स्मारक उभारण्याचे वचन दिले होते. पण वर्षानुवर्षे उलटली तरी या वचनांची पूर्तता झाली नाही. न्यायासाठी आनंद गवई यांचे वडील शत्रुघ्न गवई यांनी १४ ऑगस्ट २०१८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण केले. आश्वासने पुन्हा मिळाली, पण कृती मात्र शून्यच राहिली.शेवटी, कुटुंबाने स्वतःच पुढाकार घेत २४ एप्रिल २०२२ रोजी, आनंद गवई यांचा वाढदिवस साधून, पत्रकार चौकाजवळ मोर्णा नदीकाठी सरकारी जागेत त्यांचा पुतळा उभारला. हा पुतळा कुणालाही अडथळा नसतानाही २१ डिसेंबर २०२२ रोजी जिल्हा प्रशासनाने तो काढून टाकला. ''देशासाठी मुलगा गेला, आणि आता त्याच्या स्मृतीलाही न्याय नाही,'' अशी वेदना वीरपिताचे शब्द ऐकताना मन पिळवटून निघते. पत्रकार चौक ते वाशिम बायपास मार्गाला आनंद गवई यांचे नाव देण्याचा तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांचा लेखी आदेश असूनही महानगरपालिका प्रशासनाने तो आदेश मान्य केला नाही. आज, आनंद गवई यांच्या कुटुंबाचा लढा सुरूच आहे हा लढा आता शत्रूशी नसून आपल्या स्वतःच्या व्यवस्थेशी आहे. ज्याने प्राण देऊन देश वाचवला, त्याची स्मृती जपण्यासाठी त्याच्या कुटुंबाला एवढी वर्षे लढावे लागते, ही बाब केवळ अन्यायकारक नाही तर आपल्या समाजासाठी लाजिरवाणी आहे. बलिदानाचा सन्मान हा फक्त भाषणात आणि फलकांवर नसून कृतीत दिसला पाहिजे हीच या कुटुंबाची हाक आहे.

**शोक आणि सन्मानाची गोळाबेरीज**

शहीद आनंद गवई नाव घेताच मनात एकाच वेळी अभिमान आणि हळहळ दोन्ही निर्माण होते. देशासाठी हसत-हसत प्राण देणाऱ्या या १९ वर्षीय तरुणाचा फोटो आजही घराच्या भिंतीवर टांगलेला आहे, पण त्याची आठवण फक्त त्या भिंतीत अडकून राहिली आहे. प्रजासत्ताक दिनाच्या सकाळी देशाच्या सीमारेषेवर हिमस्खलनाखाली गाडले गेलेले आनंद, आणि इथे त्यांच्या नावाला मिळणारा सन्मान मात्र प्रशासनाच्या फाईलखाली दडून बसला आहे.वीरपिताचे डोळे आजही पाणावतात ''माझा मुलगा देशासाठी गेला, पण आता त्याच्यासाठीचा पुतळा, त्याच्या नावाची पाटीही वाचवावी लागते,'' हे शब्द मनाला भेदून जातात.

## माजी जि प अध्यक्ष कडून शिवभक्तांना फराळाचे वाटप

**देवरी :** मंचनपूर सावरा येथील शिवभक्त १५० वर्षाची परंपरा आजही जोपासत आहेत. त्यांच्या या अखंड भक्तीचे निसिम्य प्रेम व भक्ती यामध्ये गावकरी गावातून मिरवणूक काढून भक्तिमय वातावरणात नाहून निघतात. पूर्णा नदीचे पवित्र जल घेऊन सावरा येथील शिवभक्त पाणेटयेथून जल घेऊन गावामध्ये पोहोचतात. त्याच दिवशी खूप मोठ्या प्रमाणात कावड यात्रा साजरी होते .
पूर्णा नदीचे जल कावडमध्ये भरल्यानंतर कुठेही न थांबता आणि कावड खांद्यावरून खाली न उतरवता सर्व शिवभक्तांना वेताळबाबा या ठिकाणी व्यवस्था करून त्यांना माजी जि प अध्यक्षा सौ संध्याताई वाघोडे व वाघोडे परिवारातर्फे भाविकांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला.व भक्तिपूर्वक फराळाचे वाटप करण्यात आले.

## ज्येष्ठ पत्रकार अनिल माहोरे यांचा आज सत्कार

### ज्येष्ठ संपादक प्रवीण बर्दापूरकर प्रमुख पाहुणे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. ९ :** गेली चार दशके पत्रकारिता आणि सामाजिक जीवनात कार्यरत असलेले ज्येष्ठ पत्रकार अनिल माहोरे यांचा एकसष्ठी निमित्त जाहीर सत्कार आज रविवार दि.१० ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी साढेसहा वाजता श्री.शिवाजी कॉलेज सभागृह देशमुखफाइल अकोला येथे आयोजित केला आहे.
महाराष्ट्रातील गाजलेले रोखठोक पत्रकार आणि वक्ते तसेच लोकसत्तेचे माजी संपादक .प्रवीण बर्दापुरकर यांच्या अतिशय मौलिक भाषणाची संधी या निमित्याने श्रोत्यांना मिळणार आहे. सोबत माजी राज्यमंत्री गुलाबराव गावंडे, एका दैनिकाचे मुख्य संपादक .प्रकाश पोहरे, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष शौकतअली मिरसाहेब,ज्येष्ठ पत्रकार दिनेश शुक्ल यांच्या उपस्थितित होणाऱ्या या समारंभाला सर्वांनी सह परिवार उपस्थित राहावे असे आवाहन सत्कार आयोजन समितीचे केले आहे.

## शेतकरी हक्क परिषदेतून बच्चू कडू यांचा इशारा

# शेतकऱ्यांना कर्जमाफी न दिल्यास आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर बहिष्कार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**पुणे , दि. ९ :** शेतकऱ्यांना कर्जमाफी न दिल्यास आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर बहीष्कार घालण्याची घोषणा प्रहार पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी केली आहे. आश्वासनांची पुर्तता न करता हे राज्य सरकार जात आणि धर्माच्या आधारावर मतांचे विभाजन करीत असल्याचा आरोपही त्यांनी केला. शुक्रवारी पुण्यात झालेल्या शेतकरी हक्क परिषदेत कडू यांनी ही भूमिका स्पष्टपणे मांडली. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी, आमदार कैलास पाटील, बाळासाहेब देशमुख, शेतकरी नेते अजित नवले, अनिल घनवट आणि पत्रकार रमेश जाधव उपस्थित होते. कडू यांनी घेतलेल्या भुमिकेवर परीषदेची दिशा पुढील बैठकीत ठरविली जाईल असे राजू शेट्टी यांनी स्पष्ट केले. तर निवडणुकीवर बहीष्कार टाकण्याचा निर्णय वैयक्तिक असल्याचे कडू यांनी स्पष्ट केले.
शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बोलण्याऐवजी सत्ताधारी पक्षांनाा जात-धर्माच्या आधारावर मतांचे विभाजन करायचे असल्याचा आरोप कडू यांनी केला. ते म्हणाले, ''तरुणांची दिशाभूल करून राजकारणाच्या खेळात त्यांना ओढले जात आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा न करता फूट पाडणारे प्रचार सुरू आहेत. अशा परिस्थितीत आम्ही निवडणूक प्रक्रियेत सहभागी होणार नाही. खेड्यापाड्यातील तरुणांना मतांसाठी तोडले जाईल. त्याला शेतकरी बळी पडतील सध्याचे राजकारण वाहत गेले असून, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर एकत्रित होण्याची गरज असल्याने हा निर्णय घेतला आहे.''
कडू यांनी यापूर्वी रायगड व मोझरी येथे कर्जमाफीसाठी आंदोलन केले होते. त्यानंतर सरकारने निर्णय घेण्याचे आश्वासन दिले, मात्र अद्याप ठोस पावले उचललेली नाहीत. ''शेतकऱ्यांची मते विभागली जाऊ नयेत, त्यांच्या प्रश्नांवर सर्वांनी एकत्र यावे, यासाठी हा बहिष्कार हे आमचा 'ब्रह्मास्त्र' ठरेल,'' असेही कडू म्हणाले.

### कोण काय म्हणाले ?

**शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणे शेतमालाला हमीभाव देणे, ही महायुती सरकारची आश्वासने हवेत विरली आहेत. त्या पार्श्वभूमीवर व्यापक जनआंदोलन उभारण्याच्या अनुषंगाने या परिषदेत चर्चा करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या सर्व संघटना एका मंचावर येऊन शेतकऱ्यांचे प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठीचा कृती आराखडा तयार करतील त्यासाठी अधिवेशन घेऊन राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा केली जाईल. त्यात निवडणुकीवरील बहिष्कार बाबतही चर्चा केली जाईल, अशी माहिती राजू शेट्टी यांनी दिली.**

## मराठवाड्यात पावसाची जोरदार बॅटिंग



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर , दि. ९ :** गेल्या काही दिवसांपासून राज्यातील अनेक ठिकाणी पावसाने उघडीप दिल्याचे पाहिला मिळत आहे. त्यात आता मोठ्या खंडानंतर पावसाने पुन्हा जोरदार आगमन केले आहे. गुरुवारी, शुक्रवारी दिवसभरात पावसाने सर्वत्र हजेरी लावली. विभागीय आयुक्त कार्यालयातून प्राप्त माहितीनुसार, विभागातील हिंगोली, परभणी आणि नांदेड जिल्ह्यामध्ये पावसाचा अधिक जोर होता. येथील एकूण १६ मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली आहे.
जवळपास आठवडाभरापासून पावसाची प्रतीक्षा होती. पावसाअभावी पिकेही सुकून जात होती. शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली होती. या काळात कडक ऊन पडत असल्यानेही पिकांना धोका निर्माण झाला होता. परंतु, गुरुवारी सकाळी सात ते आठच्या सुमारास पावसाने सर्वत्र पुनरागमन करून दिलासा दिला. दरम्यान, गुरुवारी दिवसभरात अधूनमधून पावसाची हजेरी सुरु होती.
विभागात गुरुवारी सकाळी ते शुक्रवारी सकाळी ८ वाजेपर्यंत एकूण १४. ८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. यात सर्वाधिक ४८. ८ मिमी हिंगोली, त्यानंतर नांदेडमध्ये ३०.० मिमी तर परभणी जिल्ह्यात २३.५ मिमी पाऊस झाला आहे. या तिन्ही जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याचेही समोर आले आहे. दरम्यान, मराठवाड्यात पावसाची बॅटिंग सुरु झाली असली तरी संभाजीनगर, जालना, बीड, लातुरात मात्र पावसाने किरकोळ हजेरी दिल्याचे चित्र आहे.

## बारामतीत पुन्हा विमानाचा अपघात!

### टायर निखळल्याने टॅक्सीवेवरून गवतात घुसले



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बारामती , दि. ९:** येथील रेड बर्ड एव्हिएशन खाजगी विमान प्रशिक्षण संस्थेच्या शिकाऊ विमानाला आज (९ ऑगस्ट) सकाळी पावणे आठच्या सुमारास अपघात झाला. प्रशिक्षणार्थी पायलट विवेक यादव (वय २४, मुंबई) विमान उडवत असताना पुढील टायरमध्ये तांत्रिक बिघाड झाला. टायर वाकडे होऊन निखळल्याने विमान टॅक्सीवेवरून बाजूच्या गवतात घुसले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, परंतु विमानाच्या पंख्याचे आणि चाकाजवळील भागाचे नुकसान झाले आहे.
विवेक यादव यांनी नेहमीप्रमाणे प्रशिक्षणासाठी उड्डाण घेतले होते. लँडिंगदरम्यान पुढील टायरमध्ये बिघाड झाल्याचे लक्षात येताच त्यांनी आपत्कालीन लँडिंगचा प्रयत्न केला. मात्र, टायर निखळल्याने विमान धावपट्टी सोडून गवतात गेले. घटनास्थळी रेड बर्डच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने विमान बाजूला घेऊन दुरुस्तीचे काम सुरू केले. रेड बर्डकडून या प्रकरणी कोणतेही अधिकृत निवेदन जारी करण्यात आलेले नाही.
रेड बर्ड एव्हिएशनच्या विमानांना यापूर्वीही बारामतीत अपघात झाले आहेत. ऑक्टोबर २०२३ मध्ये चार दिवसांच्या अंतराने दोन अपघात घडले होते. त्यामुळे डायरेक्टोरेट जनरल ऑफ सिव्हिल एव्हिएशन () ने रेड बर्डच्या सर्व तळांवरील प्रशिक्षण कार्यवाहीवर निर्बंध घातले होते.
यामध्ये तांत्रिक बिघाड आणि देखभाल प्रक्रियेतील त्रुटी आढळल्या होत्या. काही महिन्यांपूर्वी हे निर्बंध उठल्यानंतर प्रशिक्षण पुन्हा सुरू झाले, परंतु आजच्या घटनेने पुन्हा सुरक्षेचा प्रश्न उपस्थित झाला आहे.
दरम्यान, हा अपघात विमानतळाजवळ घडल्याने मोठी दुर्घटना टळली असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. जर विमान एखाद्या निवासी भागात, शाळेत किंवा मधील कंपनीवर कोसळले असते, तर मोठी हानी होऊ शकली असती.

## नागपुरात उड्डाण पुलाच्या खोदकामात आढळले जुने मानवी सांगाडे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपुर , दि. ९ :** उपराजधानी नागपुरातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. नागपूरमध्ये उड्डाण पुलाच्या निर्माणासाठी खोदकाम सुरू असताना मजुरांना मानवी सांगाडा आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. मानवी हाडांचा सांगाडा सापडल्याने मजुरांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर येथील सक्करदरा भागातील बेसा पावर हाऊसजवळ उड्डाणपुलाच्या



### मजुरांमध्ये भीतीचे वातावरण

कामासाठी खोदकाम सुरू करण्यात आले. शुक्रवारी मजूर खोदकाम करत असतान अचानक मानवी हाडांचा सांगाडा आढळून आला. त्यानंतर मजुरांनी तात्काळ पोलिसांना यासंदर्भात माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली.

## बालकामगार कायद्याची होतेय सर्रास पायमल्ली



**ओझर :** बाल कामगार विरोधात कायदा अस्तित्वात असतानादेखील केवळ त्याची अंमलबजावणी होत नसल्याने हा कायदा कागदावरच राहिला आहे. उत्तर पुणे जिल्ह्याकडील भागात मोठ्या प्रमाणात हॉटेल, वीटभट्टी, बांधकामासाठी बालमजुरांचा सर्रास वापर केला जात आहे. यावर निर्बंध घालण्यासाठी कामगार आयुक्तांनी बंद केलेले डोळे उघडणे गरजेचे आहे. याविषयी जनजागृती करणेकामी शासनाकडून विविध जाहिराती वृत्तपत्रातून, टी. व्ही. द्वारे प्रकाशित व प्रसारित केल्या जातात. तसेच यासाठी कामगार दिनही साजरा केला जातो.

## ओला, उबेरला आता भारत टॅक्सीचे आव्हान

### पहिल्या टप्प्यात महाराष्ट्र, गुजरात, दिल्लीत सेवा सुरु होणार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**मुंबई , दि. ९ :** देशभरातील ॲप आधारित टॅक्सी सेवेतील ओला, उबर कंपन्यांची मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी केंद्रीय सहकार विभागाच्या पुढाकाराने देशात प्रथमच सहकारी तत्वावर 'भारत टॅक्सी ' सुरु करण्याची तयारी सुरू झाली आहे. त्यासाठी बहुराज्य सहकारी टॅक्सी सेवा संस्थेची स्थापना करण्यात आली असून पहिल्या टप्प्यात महाराष्ट्र, गुजरात, दिल्ली आणि उत्तर प्रदेशात ही सेवा सुरु केली जाणार असल्याची माहिती राष्ट्रीय सहकार विकास निगममधील सूत्रांनी दिली.
गेल्या महिन्यात केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सहकार धोरणाची घोषणा करताना सहकारमंत्री अमित शहा यांनी डिसेंबर पूर्वी देशात सहकारी तत्वावर ॲप आधारित टॅक्सी सेवा सुरु करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार भारत ही ॲप आधारित टॅक्सी सेवा सुरु केली जाणार आहे. सहकार विभागाच्या पुढाकाराने ही योजना आखली जात आहे. यासाठी राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ(एनसीडीसी), भारतीय कृषी फर्टिलायझर सह लि.(ईफको), गुजरात सहकारी दुग्ध विकास संस्था अशा आठ सहकारी संस्थाच्या सहभागातून बहुराज्य सहकारी टॅक्सी संस्थेची नोंदणी करण्यात आली असून त्यासाठी ३०० कोटींचे भांडवल उभारण्यात आले आहे.
भारतीय कृषक सहकारी संस्था(कृभको), राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक(नाबार्ड), राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ(एनडीडीबी) आणि राष्ट्रीय सहकार निर्यात लि.याही संस्था सहकारी टॅक्सी संस्थेच्या भागधारक असून यात सरकारचा थेट सहभाग नसेल. या सर्व संस्था सहकारी तत्वावर ही टॅक्सीसेवा टप्पा टप्प्याने देशभरात सुरु करणार आहेत.पहिल्या टप्प्यात महाराष्ट्र, गुजरात, दिल्ली आणि उत्तर प्रदेशात भारत टॅक्सीची सेवा सुरु केली जाणार असून त्यासाठी आतापर्यंत २०० टॅक्सी चालकांची नोंदणी करण्यात आली आहे. या योजनेची शास्त्रोक्त आखणी करण्याटी जबाबादरी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट(आयआयएम) बेंगळुरू यांच्यावर सोपविण्यात आली असून ॲप निर्मितीसाठी म्हणजेच तांत्रिक भागिदारासाठी निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

**प्रगती** | गुलाबी रिक्षा मिळाल्याने महिलांना स्वावलंबनाची शाश्वती

## गुलाबी रिक्षातून महिलांच्या उन्नतीचा मार्ग - आदिती तटकरे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**कोल्हापूर, दि. ९ :** गुलाबी रिक्षा मिळाल्याने महिलांना स्वावलंबनाची शाश्वती मिळाली आहे. या योजनेमुळे महिला सक्षमीकरणाला चालना मिळेल. या माध्यमातून सामान्य महिलांना उन्नतीचा मार्ग गवसला आहे, असे मत महिला व बालविकास विभागाच्या मंत्री आदिती तटकरे यांनी येथे व्यक्त केले. महिला व बालविकास विभागाच्या वतीने येथे मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते पिंक ई रिक्षा व रुपे कार्डचे वितरण करण्यात आले, या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.
वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, खासदार शाहू महाराज छत्रपती, माजी आमदार राजेश पाटील, महिला व बालविकास विभागाच्या आयुक्त नयना गुंडे, जि. प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., कायनेटिक ग्रीनच्या संस्थापिका, मुख्य कार्यकारी अधिकारी सुलज्जा फिरोदिया मोटवानी, कार्यकारी संचालक रितेश मंत्री, जोयेल जॉर्ज, अग्रदीप रॉय उपस्थित होते.
या कार्यक्रमात महिला लाभार्थ्यांना पिंक ई-रिक्षाचा चौथा ताफा सुपूर्द करण्यात आला. महाराष्ट्र शासनाने पिंक ई-रिक्षा योजना सुरू केली असून पुणे, नाशिक, नागपूर, अहमदनगर, सोलापूर, कोल्हापूर, अमरावती व छत्रपती संभाजीनगर या ८ जिल्ह्यांमध्ये १० हजार पर्यावरणपूरक कायनेटिक ग्रीन इलेक्ट्रिक तीनचाकी रिक्षा तैनात केली जाणार आहे. आठ सहभागी जिल्ह्यांमध्ये कायनेटिक ग्रीन १५०० चार्जर कार्यान्वित करणार आहे. यामुळे महिला सक्षमीकरण आणि हरित पर्यावरणाला चालना मिळेल, असे यावेळी सांगण्यात आले.
या योजनेअंतर्गत, महाराष्ट्र सरकार प्रत्येक ई-रिक्षाच्या किमतीवर २० टक्के अनुदान देईल, तर लाभार्थी १० टक्के रक्कम डाउन पेमेंट म्हणून देतील. उर्वरित ७० टक्के रक्कम प्रमुख वित्तीय भागीदारांनी दिलेल्या बँक कर्जाद्वारे दिली जाईल, ज्यामधून सुलभ आणि कमी व्याजदरामध्ये आर्थिक साह्याची खात्री मिळेल. याव्यतिरिक्त, महाराष्ट्र सरकार व कायनेटिक ग्रीन लाभार्थ्यांशी संलग्न होण्यासाठी आणि बचत गटासोबत सहयोग करण्यासाठी विविध ठिकाणी प्रत्यक्ष उपक्रम राबवतील. त्यांना अधिक पाठिंबा देण्यासाठी कायनेटिक ग्रीन मोफत ड्रायव्हिंग प्रशिक्षण देईल, ड्रायव्हिंग लायसन्स मिळवण्यास मदत करेल आणि उत्तम चार्जिंग पायाभूत सुविधा उभारेल.
वेईकल आणि बॅटरी दोन्ही पाच वर्षांच्या वॉरंटीसह येतील, सर्व नियतकालिक आणि प्रतिबंधात्मक देखभाल सेवांचा समावेश असलेला व्यापक वार्षिक देखभाल करार (एएमसी) असेल, ज्यामध्ये पाच वर्षांसाठी प्रत्येक तिमाहीत एक मोफत सेवा समाविष्ट असेल.

## बिबट्याच्या हल्ल्यात तीन वर्षाच्या आयुषचा मृत्यू

**नाशिक :** नाशिकजवळील वडनेर दुमाला भागात बिबट्याच्या हल्ल्यात आयुष भगत या तीन वर्षीय बालकाचा मृत्यू झाला. रात्री आयुष घरासमोर ओट्यावर खेळत होता. बिबट्याने त्याला उचलून नेले. शेकडो स्थानिक, वन विभागाचे थर्मल ड्रोन आणि पोलिसांच्या श्वान पथकाच्या मदतीने अंधारात बालकाचा शोध घेण्यात आला.
पाच तासानंतर त्याचा मृतदेह हाती लागला. रक्षाबंधनच्या पूर्वसंध्येला बहीण श्रेयाला लहानग्या भावास गमवावे लागले. आयुष व त्याची आठ वर्षीय बहीण श्रेया रात्री आठ वाजता घराच्या बाहेर ओट्यावर खेळत होते. काही वेळाने श्रेया घरात गेली असता बिबट्याने आयुषवर झडप मारून त्याला शेतात ओढत नेले.कुटुंबिय घराबाहेर आल्यानंतर आयुष दिसला नाही. परिसरात रक्त सांडल्याचे दिसल्यावर त्यांनी शोध सुरू केला.

## महत्त्वाचे

### मोदी सरकारचे गृहिणींना 'रक्षाबंधन गिफ्ट'

**नवी दिल्ली:** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत मोदी सरकारच्या केंद्रीय मंत्रिमंडळाने रक्षाबंधनापूर्वी महिला-गृहिणींना मोठी भेट दिली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत एलपीजी अनुदानासाठी प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेसाठी १२,०६० कोटी रुपये मंजूर करण्यात आले. त्याचवेळी स्वस्त दरातील स्वयंपाकाच्या गॅससाठी ३० हजार कोटी रुपये मंजूर करण्यात आले. सरकारी तेल कंपन्यांना बाजारभावापेक्षा कमी किमतीत एलपीजी विकल्याने होणारे नुकसान भरून काढणे हा अनुदान देण्याचा उद्देश आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने शुक्रवारी ५२,६६७ कोटी रुपयांच्या पॅकेजला मंजुरी देताना शिक्षण, एलपीजी, पायाभूत सुविधा आणि ईशान्येकडील राज्यांच्या विकासावर भर देण्यात आला आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीत पाच महत्त्वाचे निर्णय घेण्यात आल्याचे जाहीर केले.

### ऑनलाइन, ऑफलाइन तिकिटात फरक नाही

**मुंबई :** महाराष्ट्र मनोरंजन शुल्क कायद्याच्या कलम २(ब) मध्ये समाविष्ट केलेल्या सातव्या तरतुदीची घटनात्मक वैधता उच्च न्यायालयाने कायम ठेवली आहे. सिनेमा मालकांकडून चित्रपट तिकिटांच्या ऑनलाइन बुकिंगसाठी आकारल्या जाणाऱ्या अतिरिक्त रकमेचा तरतुदीमध्ये समावेश होतो. ऑनलाइन बुकिंगची प्रक्रिया ही ऑफलाइन बुकिंगपेक्षा वेगळी नाही. ऑनलाइन बुकिंगबाबत यादी-२ च्या एंट्री ६२ अंतर्गत कर आकारला जाऊ शकतो, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने सातवी तरतूद वैध ठरवली.मल्टिप्लेक्स थिएटर्सची संघटना असलेल्या एफआयसीसीआय-मल्टीप्लेक्स असोसिएशन ऑफ इंडियाने उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. त्या याचिकेवर न्या. महेश सोनक, न्या.जितेंद्र जैन यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. संबंधित तरतुदीचा समावेश ऑनलाइन तिकीट बुकिंगसाठी मालकांकडून प्रवेशाच्या देयकाशी संबंधित होता.

### उल्हासनगरमध्ये २७ लाखांचे एमडी हस्तगत

**उल्हासनगर :** उल्हासनगर गुन्हे शाखेने एका नायजेरियन डीलर सह पाच जणांना अटक केली आहे. त्यांच्याकडून २६ लाख ६१ हजार रुपये किमतीची १३१ ग्राम एम डी पावडर हस्तगत केली आहे.आरोपींमध्ये एका महिलेचा समावेश आहे. मिळालेल्या माहितीनुसार सोमवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार राजेंद्र रघुनाथ थोरवे यांना नेवाळी चौकाकडून कटईकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका महिलेकडे मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक योगेश आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीरंग गोसावी, पोलीस उपनिरीक्षक प्रवीण खोचरे, पोलीस अंमलदार राजेंद्र थोरवे, गणेश गावडे, योगेश वाघ, शेखर भावेकर, सुरेश जाधव, मंगेश जाधव, रितेश वंजारी, प्रसाद तोंडलीकर, संजय शेरमाळे, विक्रम जाधव, रेवणनाथ शेकडे, मीनाक्षी खेडेकर, मनोरमा सावळे, कुसुम शिंदे, अविनाश पवार यांच्या पथकाने सापळा रचून बंद पडलेल्या एका ढाब्यासमोर कारवाई केली.दरम्यान या गुन्ह्यातील चार पुरुष आरोपी हे नालासोपारा येथील राहणारे असून महिला ही मुंब्र्याची रहिवाशी आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रवीण खोचरे करत आहेत.

## अमेरिका किंवा इतर कोणत्याही देशाची मध्यस्थी

# काश्मीरच्या मुद्द्यावरून पुन्हा पाकिस्तानने ओकली गरळ

**नवी दिल्ली : दि.९ वृत्तसंस्था**

पाकिस्तानने पुन्हा एकदा काश्मीर मुद्द्यावरून पाकने पुन्हा एकदा गरळ ओकली आहे. पाकिस्तानने ''काश्मीर प्रश्न सोडवण्यासाठी अमेरिकेसह कोणत्याही देशाची मदत घेण्यास तयार'' असल्याचे म्हटले आहे. पाकिस्तानच्या परराष्ट्र कार्यालयाचे प्रवक्ते शफकत अली खान यांनीहे विधान केले आहे.

पत्रकार परिषदेत शफकत अली खान यांनी बोलताना,''पाकिस्तान केवळ अमेरिकेकडूनच नव्हे तर काश्मीर वाद सोडवण्यास आणि परिस्थिती स्थिर करण्यास मदत करू शकणाऱ्या कोणत्याही देशाकडून मदतीचे स्वागत करेल.'' असे म्हटले आहे. ते म्हणाले की,''हा वाद दक्षिण आशियातील शांतता आणि सुरक्षा समस्यांच्या केंद्रस्थानी आहे.''



भारताची भूमिका स्पष्ट, तृतीय पक्षाची मध्यस्थी नाकारली

भारत सतत म्हणत आहे की त्याला पाकिस्तानसोबतच्या चर्चेत कोणत्याही तिसऱ्या पक्षाचा सहभाग नको आहे. १९७२ च्या शिमला कराराने दोन्ही देशांमधील कोणत्याही तृतीय पक्षाच्या मध्यस्थीलाही नकार दिला. भारताने हे देखील स्पष्ट केले आहे की ते फक्त पाकव्याप्त काश्मीर (पीओके) परत करण्याच्या आणि दहशतवादाच्या मुद्द्यावर पाकिस्तानशी चर्चा करेल.मे महिन्यात दोन्ही देशांमधील चार दिवसांच्या संघर्षानंतर कोणत्याही प्रकारचा परस्पर संपर्क झालेला नाही. या समस्येचे निराकरण करण्यासाठी अमेरिकेच्या स्वारस्याचे पाकिस्तान स्वागत करतो असे खान म्हणाले, परंतु भारताने आपले मत बनवावे. सध्या दोन्ही बाजूंमध्ये नियमित राजनैतिक संपर्काशिवाय कोणताही संवाद नाही.

### दहशतवाद,अफवा आणि आरोपांना दिले उत्तर


**पाकिस्तानच्या खैबर-पख्तूनख्वा आणि बलुचिस्तानमधील दहशतवादावर बोलताना खान म्हणाले की अफगाणिस्तानातून पसरणाऱ्या दहशतवादाचा मुद्दा अनेक वेळा उपस्थित करण्यात आला आहे. खनिज उत्खननासाठी अमेरिकेसोबत कोणत्याही गुप्त कराराचे वृत्त त्यांनी फेटाळून लावले आणि युक्रेन संघर्षात पाकिस्तानी नागरिकांचा सहभाग असल्याचे आरोप ''निराधार'' असल्याचे म्हटले. खान म्हणाले की युक्रेनियन अधिकाऱ्यांनी या विषयावर पाकिस्तानशी औपचारिकपणे संपर्क साधलेला नाही.**

## रॅगिंगचा आरोप करीत पीएचडी स्कॉलरने संपविले जीवन

**कोलकाता : दि.९ वृत्तसंस्था**

कोलकात्याच्या कल्याणी येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च मधील २५ वर्षीय पीएचडी स्कॉलरने गुरुवारी संध्याकाळी कॉलेजच्या परिसरात आत्महत्येचा प्रयत्न केला होता. यानंतर काही तासांतच रुग्णालयात उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. त्यादिवशीच त्याने सोशल मीडिया पोस्टमध्ये रॅगिंग आणि याविरोधत इन्स्टिट्यूटच्या प्रशासनावर उदासीनतेचे आरोप केले होते.


''हे जग माझ्यासाठी नव्हतंच पण मी आता हे सहन करू शकत नाही. मी पराभव पत्करतो. मला मृत्यूनंतर ती शांती मिळावी जी मला आयुष्यात जीवंत असताना कधीही मिळाली नाही'', असे विद्यार्थी अनामित्रा रॉयने सोशल



मीडियावरील पोस्टमध्ये लिहिले आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उत्तर २४ परगणा येथील श्यामनगर येथील रहिवासी आणि जीवशास्त्राचा पीएचडी विद्यार्थी असलेला अनामित्रा रॉय गुरुवारी संध्याकाळी आयआयएसईआर येथील प्रयोगशाळेत बेशुद्ध अवस्थेत आढळला. त्याला कल्याणी येथील एम्समध्ये नेण्यात आले, जिथे शुक्रवारी सकाळी त्याचा मृत्यू झाला. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, त्याने विषारी पदार्थ प्राशन केल्याचे दिसून येत आहे.

## भारताशी पंगा पाकिस्तानला महागात!

### तब्बल ₹४.१० अब्ज (४१० कोटी रुपये) नुकसान



**इस्लामाबाद : दि.९ वृत्तसंस्था**

भारतासोबतच्या तणावामुळे पाकिस्तानने आपल्या हवाई क्षेत्रात भारतीय विमानांना प्रवेश नाकारला, ज्यामुळे पाकिस्तान एअरपोर्ट्स अथॉरिटीला तब्बल ₹४.१० अब्ज (४१० कोटी रुपये) नुकसान सहन करावे लागले आहे. ही माहिती पाकिस्तानच्या संरक्षण मंत्रालयाने राष्ट्रीय सभेमध्ये दिली आहे.

२४ एप्रिल ते २० जून २०२५ दरम्यान पाकिस्तानने भारतासाठी आपले हवाई क्षेत्र बंद केले होते. या निर्णयाचा थेट परिणाम दररोज उड्डाण करणाऱ्या १०० ते १५० भारतीय विमानांवर झाला. परिणामी, पाकिस्तानच्या एकूण हवाई वाहतुकीत २० टक्के घट झाली व ''ओव्हरफ्लायिंग चार्जेस'' अर्थात आंतरराष्ट्रीय विमानांकडून घेतल्या जाणाऱ्या हवाई शुल्कातून मिळणाऱ्या उत्पन्नात मोठी घट झाली.

पाकिस्तानने भारतीय विमानांसाठी हवाई बंदी २४ ऑगस्ट २०२५ पर्यंत वाढवली आहे, तर भारतानेही २३ ऑगस्ट २०२५ पर्यंत पाकिस्तानच्या विमानांना भारतीय हवाई क्षेत्रात प्रवेश नाकारला आहे. भारताचे नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी हे जाहीर केलं. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा मोहम्मद आसिफ यांनी स्पष्ट केलं की, याआधी सांगितलेला ८.५ अब्ज (८५० कोटी) तोट्याचा अंदाज खरा नसून प्रत्यक्षात हवाई शुल्कातून झालेलं नुकसान ४.१० अब्ज इतकंच आहे. काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सिंधु जलवाटप करार एकतर्फी रद्द केला. त्यानंतर भारत सरकारने ऑपरेशन सिंदूर सुरू केलं.

### दाक्षिणात्य अभिनेता ध्रुव कुमार विरोधात फसवणुकीचा गुन्हा

**मुंबई : दि.९ वृत्तसंस्था**

प्रसिध्द दाक्षिणात्य अभिनेता ध्रुव कुमार उर्फ ध्रुव सरजा याच्याविरोधात अंबोली पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निर्माता राघवेन्द्र हेगडे यांच्याकडून 'द सोल्जर' चित्रपटासाठी साडेतीन कोटी रुपये घेऊन कराराचे उल्लंघन केल्याचा सरजा याच्यावर आरोप आहे. यामुळे ९ कोटी रुपयांचा तोटा झाल्याचा आरोप हेगडे यांनी केला आहे.कांदिवली पश्चिम येथे वास्तव्यास असलेले तक्रारदार राघवेन्द्र हेगडे (५२) आर. एच. एन्टरटेनमेन्ट व आर-९ एन्टरटेनमेन्टचे मालक आहेत. त्यांनी २०१६ मध्ये 'जग्गी दादा' या चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले होते. हा चित्रपट सुपरहिट झाल्यानंतर दाक्षिणात्य अभिनेता ध्रुव कुमार उर्फ ध्रुव सरजा त्यांना त्यांच्या अंधेरी येथील कार्यालयात भेटायला गेला होता. त्याने त्यांच्यासोबत काम करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानंतर त्यांनी 'द सोल्जर' चित्रपट काढायचे ठरवले. २१ फेब्रुवारी २०१९ रोजी आर-९ एन्टरटेनमेन्ट आणि ध्रुव यांच्यात करार झाला.

## पाकिस्तानची ५ लढाऊ विमाने, एक टेहळणी विमान उद्ध्वस्त

# हवाई दल प्रमुखांचा मोठा खुलासा

**नवी दिल्ली : दि.९ वृत्तसंस्था**

भारतीय हवाई दलाने मे महिन्याच्या सुरुवातीला राबवलेल्या ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानला जबर लष्करी हादरा दिल्याची अत्यंत महत्त्वाची माहिती समोर आली आहे.

हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग यांनी शनिवारी बंगळूरु येथे एका व्याख्यानात बोलताना खुलासा केला की, भारताच्या हवाई संरक्षण प्रणालीने पाकिस्तानची ५ लढाऊ विमाने आणि एक विशेष टेहळणी विमान नष्ट केले आहे. या कारवाईमुळे पाकिस्तानच्या हवाई सामर्थ्याला मोठा धक्का बसला आहे.

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने ७ ते १० मे दरम्यान ऑपरेशन सिंदूर राबवले होते. या कारवाईत पाकिस्तानचे नेमके किती नुकसान झाले, याचा तपशील पहिल्यांदाच अधिकृतपणे



समोर आला आहे.

एअर चीफ मार्शल एल.एम. कटरे स्मृती व्याख्यानात बोलताना ए.पी. सिंग यांनी या ऑपरेशनची सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, ''भारताच्या जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्र प्रणालीने पाकिस्तानची एकूण ६ विमाने पाडली. यामध्ये जेकबाबाद हवाई तळावर उभी असलेली काही -१६ लढाऊ विमाने आणि भोलारी येथील एक विमानाचा समावेश आहे.'' हे एक विशेष लष्करी विमान आहे, जे हवाई टेहळणी आणि शत्रूच्या हालचालींवर नजर ठेवून पूर्वसूचना देण्याचे काम करते. हवाई दल प्रमुखांच्या मते, हे विमान तब्बल ३०० किलोमीटर अंतरावरून अचूकतेने पाडण्यात आले. हवाई दल प्रमुखांनी बालाकोट एअर स्ट्राइकच्या अनुभवाचाही उल्लेख केला. ते म्हणाले, ''बालाकोटमध्ये आपण मोठे यश मिळवले होते, पण तेथील नुकसानीचे ठोस पुरावे सादर करता न आल्याने आपल्याच देशातील लोकांना यश पटवून देताना अडचणी आल्या. तिथे मोठ्या प्रमाणात दहशतवादी मारले गेल्याची गुप्त माहिती आमच्याकडे होती, पण आम्ही ते सिद्ध करू शकलो नाही. मात्र, ऑपरेशन सिंदूरमध्ये आम्ही ही उणीव भरून काढली आणि आपण काय साध्य केले आहे, हे जगाला दाखवून दिले. याचा मला आनंद आहे.''

**४०० प्रणाली ठरली गेम चेंजर:** हवाई दल प्रमुखांनी नुकत्याच खरेदी केलेल्या -४०० क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, ''-४०० प्रणाली या युद्धात गेम चेंजर ठरली. तिच्या प्रचंड मारक क्षमतेमुळे पाकिस्तानी विमाने भारतीय हद्दीपासून दूर राहिली आणि लांब पल्ल्याच्या ग्लाइड बॉम्बसारख्या शस्त्रांचा वापर करू शकली नाहीत.

**❑ एअर चीफ मार्शल सिंग यांनी या ऑपरेशनच्या यशाचे श्रेय कणखर राजकीय इच्छाशक्तीला दिले. ते म्हणाले की, यावेळी लष्कराला स्पष्ट निर्देश देण्यात आले होते आणि कोणत्याही प्रकारचे निर्बंध लादण्यात आले नव्हते.**

**लक्ष्यांची अचूक निवड: यावेळी केवळ दहशतवाद्यांचे लॉन्चपॅडच नव्हे, तर दहशतवादी संघटनांच्या म्होरक्यांना आणि त्यांच्या मुख्यालयांना लक्ष्य करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.**

## चिराग पासवानवर भाजप नाराज ; नितीशविरोधी भूमिकेमुळे अस्वस्थ

**पाटणा :दि.९ वृत्तसंस्था**

बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी एनडीएमध्ये राजकीय खळबळ उडाली आहे. भाजपकडून समोर आलेल्या माहितीनुसार, लोक जनशक्ती पक्षाचे प्रमुख आणि केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांच्या अलिकडच्या नितीशविरोधी भूमिका आणि त्यांच्या विधानावर पक्ष नाराज असल्याचे सांगण्यात येत आहे. विशेषतः, बिहारमधील कायदा आणि सुव्यवस्थेच्या परिस्थितीवर नितीश कुमार सरकारवर केलेली टीका भाजप 'चांगल्या पद्धतीने



केली असल्याचे' मानत नाही. माहितीनुसार, भाजप लवकरच चिराग यांच्याशी बंद दाराआड बैठक घेणार असून त्यांना युतीची एकता राखण्यास सूचना देणार असल्याचे म्हटले जात आहे. निवडणुकीपूर्वी नेतृत्वाबद्दल स्पष्ट संदेशही देण्यात येणार असल्याचे म्हटले जात आहे. भाजपने वारंवार पुनरुच्चार केला आहे की, नितीश कुमार हे बिहारमध्ये एनडीएचा चेहरा आहेत आणि निवडणुका त्यांच्या नेतृत्वाखाली लढवल्या जातील. चिराग यांच्या विधानांमुळे महाआघाडीविरुद्धच्या संयुक्त लढाईला हानी पोहोचू शकते अशी भाजपला चिंता आहे. पक्षाचा असा विश्वास आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अलीकडील सभांनी बिहारमध्ये 'मजबूत एनडीए'चा संदेश दिला आहे, ज्याचा अशा विधानांमुळे परिणाम होऊ शकतो. चिराग पासवान यांच्या विधानसभा निवडणुका लढवण्याच्या इराद्यावर, भाजप म्हणते की हे त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना ऊर्जा देण्यासाठी आहे.



## धारलीमध्ये पीडितांच्या हातात नुकसान भरपाई म्हणून ५००० रु.चा चेक ; नागरिकांचा संताप

**धारली : दि.९ वृत्तसंस्था**

उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यातील धाराली दुर्घटनेदरम्यान मदत वाटपावरून वाद निर्माण झाला आहे. धाराली आणि हर्षिल याठिकाणी ग्रामस्थांनी आपत्तीग्रस्त कुटुंबांना देण्यात येणारे ५००० रुपयांचे धनादेश स्वीकारण्यास नकार देत धामी सरकारचा निषेध केला. यावर जिल्हा दंडाधिकारी प्रशांत आर्य यांनी, ''५००० रुपयांचे धनादेश केवळ तात्काळ मदत म्हणून दिले जात आहेत. नुकसानीचे संपूर्ण मूल्यांकन आणि सविस्तर अहवाल तयार केल्यानंतर, बाधित कुटुंबांना योग्य भरपाई दिली जाईल'' असे म्हटले आहे.

धाराली आणि हर्षिल खोऱ्यात झालेल्या मोठ्या विध्वंसात मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. दरम्यान, याठिकाणी सततच्या पावसामुळे पूर येण्याचा धोका आहे. धरणाला कोणताही धोका होऊ नये म्हणून गंगोत्री महामार्गावरील मनेरी धरणातून पाणी भागीरथीमध्ये सोडले जात आहे.आतापर्यंत ७०० हून अधिक लोकांना (स्थानिक आणि इतर राज्यातील भाविक) वाचवण्यात आले आहे. सरकार म्हणते की २५० लोक (५० प्रवासी आणि २०० स्थानिक) अद्याप वाचवले गेले नाहीत. आतापर्यंत ५ जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाली आहे. (राज्य सरकारच्या मते ३, तर लष्कराच्या मते २). बेपत्ता लोकांच्या आकडेवारीतही तफावत आहे. लष्कराचा दावा आहे की १०० लोक बेपत्ता आहेत, तर राज्य सरकार १६ आणि जिल्हा प्रशासन ५० लोक बेपत्ता असल्याचे सांगत आहे. यामध्ये ८ लष्करी जवानांचा समावेश आहे.

धारालीमध्ये नेटवर्क कनेक्टिव्हिटी आणि वीजपुरवठा आता पूर्ववत करण्यात आला आहे. जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी सांगितले की बाधित लोकांना मदत साहित्य पोहोचवले जात आहे. चिनूक हेलिकॉप्टरद्वारे जनरेटर आणि आवश्यक उपकरणे देखील पोहोचवण्यात आली आहेत.


## संरचना — नासाने आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक बंद करण्याचा घेतला निर्णय

# 'इंटरनॅशनल स्पेस स्टेशन'चे होणार महासागरात विसर्जन?

**नासा : दि.९ वृत्तसंस्था**

नासाने आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. २०३० पर्यंत हे स्पेस स्टेशन पृथ्वीच्या कक्षेतून निमो पॉइंटमध्ये पाडण्यात येणार आहे. या अंतराळ स्थानकाचे संशोधन १९९८ मध्ये करण्यात आले होते. तेव्हापासून आतापर्यंत या स्पेस स्टेशनला २६ देशांतील २८० हून अधिक अंतराळवीरांनी भेट दिली आहे. मात्र आता हे स्पेस स्टेशन खराब होत चालल्याने बंद करण्यात येणार आहे.

नासाने दिलेल्या माहितीनुसार, हे स्पेस स्टेशन पॅसिफिक महासारगात सोडण्याची तयारी सुरु आहे. यामागचे कारण म्हणजे या स्थानकाचे मॉड्यूल, तसेच ट्रस आणि रेडिएटर्सची संरचना खराब होत चालली आहे. यामुळे अंतराळात मोठा धोका



निर्माण होण्याची शक्यता आहे. नासा पॅसिफिक महासागरातील पॉइंट निमोमध्ये आयएसएसला पाडण्याचा निर्णय घेतला आहे.

दक्षिण महासागरातील एक क्षेत्र ज्याला पॉइंट निमो म्हणून ओळखले जाते. हे पृथ्वीवरील अत्यंत निर्जन ठिकाण मानले जाते. या ठिकाणी मानव, पशु-पक्षी, वनस्पतींचा देखील वास नाही. पॉइंट निमो न्यूझींडच्या किनाऱ्यापासून ३ हजार मैल आणि अंटार्क्टिकापासून २ हजार मैल अंतरावर आहे. हे ठिकाणे गेल्या अनेक दशकांपासून खराब झालेल्या उपग्रहांसाठी आणि अंतराळयानांसाठी एक स्मशानभूमी केंद्र बनले आहे.अमेरिकेच्या नासा, रशियाच्या रोसकॉसमॉस, जपानच्या जॅक्सा, युरोपच्या ईएसए आणि कॅनेडियन स्पेस एजन्सीद्वारे केले जाते. पंरुत आता हे स्पेस स्टेशन पृथ्वीच्या वातावरण कक्षेतून बाहेर काढण्यात येणार आहे. यासाठी १५० अब्ज डॉलर्सचा खर्च होण्याची शक्यता आहे. स्पेसएक्स यासाठी एक डीऑर्बिट वाहन बनवणार आहे. याच्या मदतीने हे स्पेस स्टेशन पॉइंट निमोमध्ये सोडण्यात येईल.नासाने दिलेल्या माहितीनुसार,अंतराळ स्थानकाला पाडण्या ऐवजी अनेक पर्यायांचा विचार करण्यात आला होता. यामध्ये ला पृथ्वीच्या कक्षेतून अधिक वर ढकलण्याचा विचार होता,पण यामुळे मोठा धोका निर्माण झाला असता. तसेच चे वेगवेगळ्या पार्ट्समध्ये विभाजन करुन त्याला संग्रहालयात ठेवले जाणार होते, मात्र यासाठी मोठा खर्चाची आणि जोखमीची गरज आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

# पोलीस, तपास यंत्रणा आणि न्यायव्यवस्थेला स्वचिंतनाची गरज!



विचारमंथन

डॉ. एम.आर.इंगळे
मो. 9423429060

अलिकडे बऱ्याच प्रकरणांतील न्यायालयाचा निर्णय पाहता पोलिस व तपास यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उभे झाले आहे. या यंत्रणांच्या तपासात बऱ्याच त्रुटी आणि दोष राहिल्यामुळे गुन्हेगार मोकाट सुटतात परिणामी सामाजिक स्वास्थ्य धोक्यात आले आहे. सामान्य माणसाचा न्यायासाठी ज्या व्यवस्थेवर विश्वास आहे त्या न्यायव्यवस्थेतही भ्रष्टाचार होत आहे, त्यामुळे न्याय सुद्धा विकला जातो याचा अनुभव अनेक निर्णयावरून दिसतो. त्यामुळे कायद्याचे राज्य व लोकशाही धोक्यात आली असून संविधानातील मूल्ये पायदळी तुडविली जात आहेत.

अनेक निर्णयात कायद्यातील तरतुदींना फाटा: अलिकडे संपत्तीच्या वादातील, वैयक्तिक, सामाजिक, कौटुंबिक, राजकीय आणि देशाच्या व समाजाच्या हितासाठी महत्त्वाचे असणारे न्यायालयीन निर्णय बघितले तर बऱ्याच निर्णयात कायद्यातील तरतुदींना फाटा दिला जात असून त्यातील पळवाटा शोधून सत्य व न्यायाची अवहेलना होत आहे. कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणात तर स्वतः न्यायालयांनी महिलांच्या संरक्षणार्थ असलेल्या कायद्याचा महिला दुरुपयोग करतात अशी टिप्पणी करून कायद्याची कडक अंमलबजावणी करण्याऐवजी कायद्यातील तरतुदी शिथिल केल्या. त्यामुळे न्यायालये महिलांवरील अत्याचाराला प्रोत्साहन तर देत नाहीत ना ? असा प्रश्न निर्माण होतो. तसेच आज देशात कोणत्याही कायद्याचा दुरुपयोग करण्याची प्रवृत्ती सर्वत्र पाहायला मिळते तर मग फक्त महिला किंवा मागासवर्गीय लोकं त्यांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायद्याचा दुरुपयोग करतात असे म्हणणे पक्षपातीपणाचे नाही का?याबाबत चिंतन होणे आवश्यक आहे.

नुकतेच मुंबई आणि मालेगाव बॉम्बस्फोटाच्या अत्यंत महत्त्वाच्या आणि संवेदनशील खटल्यांचे निकाल लागले. मुंबई बॉम्बस्फोट खटल्यात उच्च न्यायालयाने आणि मालेगाव बॉम्बस्फोट खटल्यात मुंबई सत्रन्यायालयाच्या विशेष एनआयए न्यायालयाने सर्व आरोपींना निर्दो ष घोषित केले. यावरून जर आरोपी निर्दोष आहेत तर मग हे स्फोट घडविले कोणी असा गंभीर प्रश्न निर्माण होतो. मात्र याबाबत कोणीही स्वचिंतन करायला तयार नसल्याचे दिसते. म्हणजे कायद्याच्या संरक्षणार्थ असलेल्या यंत्रणा आपापली जबाबदारी नीट पाळत तर नाहीतच पण एकदुसऱ्यांवर खापर फोडण्यात स्वतःला धन्य मानतात ही न्यायाची आणि न्यायव्यवस्थेची शोकांतिका आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.



वास्तविक पाहता हे दोन्ही खटले अत्यंत महत्त्वाचे होते कारण ते दहशतवादी हल्ले आहेत. त्यामुळे पोलिस आणि तपास यंत्रणांनी तातडीने निष्पक्ष, पारदर्शक, वास्तव, आणि न्याय्य तपास करणे अपेक्षित होते. तपासात कोणत्याही तांत्रिक त्रुटी राहणार नाहीत, यासोबतच परिस्थितीजन्य पुरावे, फॉरेन्सिक लॅबचे अहवाल इत्यादी मध्ये कोणतीही कमतरता राहणार नाही याची दक्षता घ्यायला पाहिजे होती. पण दोन्ही खटल्यांच्या निर्णयात न्यायालयांनी तपास यंत्रणांवर ताशेरे ओढत तपासातील अनेक बाबी संशयास्पद असल्याने आरोपींना निर्दोष ठरविले ही अत्यंत गंभीर आणि चिंतनीय बाब आहे.

तपास यंत्रणेत संवेदनशीलतेचा अभाव : आपल्या देशात वेगवेगळ्या प्रकारचे अपराध वाढले असून गुन्हेगारीने उच्चांक गाठला आहे. त्यामुळे साहजिकच पोलिस, तपास यंत्रणा आणि न्यायव्यवस्थेवर अतिरिक्त ताण पडत आहे. परिणामी पोलिस किंवा तपास यंत्रणा कोणत्याही घटनेचा तपास करतांना फारशा तत्पर व गंभीर नसतात. काही अपवाद वगळता ह्या यंत्रणा गुन्हा नोंदवून घेण्यात आणि तपास करण्यात खूप दिरंगाई करतात कारण त्यांच्यात संवेदनशीलतेचा अभाव दिसून येतो. तद्वतच पोलिस आरोपींकडून लाच स्वीकारून मलाई खाण्यात धन्यता मानतात त्यामुळे तपासात त्रुटी ठेवून गुन्हेगारांना संरक्षण देतात हा पोलिस यंत्रणेला लागलेला कलंक तर आहेच पण काही सन्माननीय अपवाद वगळता पोलिसच स्वतः ''सद्रक्षणाय खलनिग्रहणाय'' या आपल्या ब्रीद वाक्याला काळीमा फासत आहेत.

तपास यंत्रणा आणि न्यायालयीन निर्णय: तपास यंत्रणांना कायद्यानुसार विशिष्ट काळात न्यायालयात चार्जशीट दाखल करावी लागते म्हणून ठीक आहे. पण तरीही तपासात दिरंगाई केली जाते आणि नंतर घाईघाईने तपास करून चार्जशीट न्यायालयात दाखल करण्यात येते. त्यामुळे तपासात त्रुटी राहतात. या तपासातील त्रुटींमुळे अनेक वेळा न्यायालयांनी तपासयंत्रणेवर ताशेरे ओढत फटकारले आहे. पण गेंड्याची कातडी पांघरलेल्या भ्रष्ट यंत्रणेला त्याबाबत काहीही वाटत नाही.

कोणत्याही प्रकरणाची सुनावणी जेव्हा न्यायालयात होते तेव्हा ती तपास यंत्रणेने केलेल्या तपासाच्या आधारे आणि पुरावे, साक्षीदार, वैद्यकीय तपासणी अहवाल, फॉरेन्सिक लॅबचे रिपोर्ट, घटना स्थळावरून हस्तगत केलेल्या वस्तू आणि वकिलांचा युक्तिवाद यावरून होत असते. त्यामुळे तपास यंत्रणेच्या तपासात जर त्रुटी असतील तर अनेक वेळा संशयाच्या आधारे आरोपी निर्दोष सुटतात. हे तपास यंत्रणेचे घोर अपयश आहे. म्हणून याबाबत न्यायालयांनी ठोस भूमिका घेऊन आपले निर्णय अधिक न्याय्य होतील याची दक्षता घेतली पाहिजे.

कायदेशीर व संवैधानिक जबाबदारी: देशात घडणाऱ्या प्रत्येक गुन्ह्याचा किंवा घटनेचा तपास करण्याची कायदेशीर जबाबदारी पोलिस किंवा तपास यंत्रणेवर असते. त्यांनी जर तपासात दिरंगाई केली किंवा काही कायदेशीर कमतरता ठेवल्या तर न्यायालयात न्याय मिळण्याची अपेक्षा धूसर होते. तसेच न्यायालयीन प्रक्रिया क्लिष्ट व अतिविलंबाची असल्यामुळे निर्णय व्हायला अनेक वर्ष लागतात. त्यामुळेच अलिकडे असं म्हटलं जाते की, '' न्यायासाठी विलंब म्हणजे न्याय नाकारणे होय.'' म्हणून पोलिस, तपासयंत्रणा व न्यायालयांनी आपापली कायदेशीर व संवैधानिक जबाबदारी अधिकाधिक प्रामाणिकपणे आणि तातडीने पार पाडणे आवश्यक आहे. आज देशात जे वातावरण निर्माण केल्या जात आहे, त्याला पायबंद घालण्यासाठी, लोकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी, त्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि खऱ्या अर्थाने न्यायासाठी पोलिस, तपासयंत्रणा आणि न्यायव्यवस्थेने स्वचिंतन करणे आणि कायदे अधिक प्रभावीपणे राबविणे काळाची गरज आहे.

# उपराष्ट्रपती पदाची निवडणूक आणि पक्षीय समीकरणे!



राजकारण

डॉ. विनोद गायकवाड
राजकीय अभ्यासक, मो. ९८५०३२४२०२

संविधानाच्या कलम ६३ नुसार उपराष्ट्रपतीला दुहेरी जबाबदारी दिली आहे. एक, राष्ट्रपती पदावरील व्यक्तीने राजीनामा दिल्यास किंवा ते काही अडचणींमुळे जबाबदारी सांभाळण्यास असमर्थ असतील तर उपराष्ट्रपतीला राष्ट्रपतीचे कामकाज पहावे लागते, परंतु असे प्रसंग क्वचितच येतात. दुसरी, उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध सभापती असतात. पूर्ण पाच वर्षे ही जबाबदारी उपराष्ट्रपतीला पार पाडावी लागते. ही भूमिका पार पाडत असतांना निश्चितच उपराष्ट्रपतीचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे राजकारणाशी संबंध येतो. राज्यसभेचे सभापती हे पक्षीयदृष्टीने सभागृह चालवितात. परिणामी पक्षीय राजकारणापासून अलिप्त असलेले हे पद राजकीय वादात अडकते. त्यामुळेच कार्यकाल संपण्यापूर्वीच जगदीप धनखड यांनी उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा दिला. उपराष्ट्रपती पद रिक्त झाल्याने नऊ सप्टेंबर रोजी निवडणूक होणार आहे.



उपराष्ट्रपती, राज्यसभेचे सभापती हे संवैधानिक पदे असल्याने या पदांची रचना व अधिकार संविधानाने निश्चित केले. उपराष्ट्रपतीला राज्यसभेचा सभापती म्हणून सभागृहाचे कामकाज चालवायाचे असल्याने राज्यसभेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास ते पात्र असावे. मात्र ते राज्यसभेचे सदस्य नसतात. संविधानाच्या कलम ६६ नुसार उपराष्ट्रपतीची निवड प्रमाणशीर पद्धतीने तसेच एकल संक्रमणीय गुप्त मतदान पद्धतीने केली जाते. संसदेचे म्हणजेच लोकसभा आणि राज्यसभेचे सदस्य उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत मतदार असतात. विधानसभा सदस्यांना या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार दिलेला नाही. राजकीय समीकरणांच्या आधारावर बहुमत प्राप्त करणारा नेता निवडून येतो. संविधानाच्या कलम ६७ मध्ये राज्यसभेच्या साध्या बहुमताने आणि लोकसभेच्या संमतीने उपराष्ट्रपतीला त्यांच्या पदावरून पदभ्रष्ट करण्याची तरतूद आहे. याच तरतुदींच्या आधारावर माजी सभापती धनखड यांच्यावर पक्षपातीचा आरोप करून त्यांना पदभ्रष्ट करण्याचा प्रस्ताव राज्यसभेच्या इतिहासात पहिल्यांदाच इंडिया आघाडीने डिसेंबर २०२४ मध्ये आणला होता. मात्र पुरेशा संख्याबळा अभावी तो पारित होऊ शकला नव्हता. माझी उपराष्ट्रपती धनखड यांचा प्रवास पक्षांतराचा राहिला. १९८९ मध्ये राजस्थानमधील झुंझुनू लोकसभा मतदारसंघातून जनता दलाच्या तिकीटवर ते निवडून आले होते. त्यानंतर १९९१ मध्ये त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश करून १९९३ च्या किशनगड विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसच्या तिकिटावर ते विजयी झाले. त्यानंतर २०२३ मध्ये त्यांनी भाजपात प्रवेश केला. २०१९ मध्ये पश्चिम बंगालचे राज्यपाल म्हणून जबाबदारी स्वीकारली आणि त्यानंतर २०२२ मध्ये ते उपराष्ट्रपती झाले. अशाप्रकारे वकिली ते उपराष्ट्रपती असा त्यांचा राजकीय प्रवास आहे. या राजकीय प्रवासात त्यांचा शेवट मात्र राजीनाम्याने झाला. विरोधी पक्षासह सत्ताधाऱ्यांनी सुद्धा पक्षपातीचा आरोप त्यांच्यावर लावल्याने त्यांना २०२७ पूर्वीच म्हणजेच मुदतपूर्व राजीनामा द्यावा लागला.

राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि इंडिया आघाडी अशा दोन आघाडींमध्ये संसदेचे पक्षीय समीकरणे विभागले आहे. संख्याबळाचा विचार केल्यास रालोआकडे लोकसभा आणि राज्यसभेत अधिक संख्याबळ आहे. लोकसभेत आणि राज्यसभेत भाजपा सर्वात मोठा पक्ष असला तरी भाजपाला बिहारचे मुख्यमंत्री नितेश कुमार यांच्या संयुक्त जनता दलाचा आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांच्या तेलगू देशम पक्षाच्या खासदारांचा पाठिंबा आवश्यक आहे. राष्ट्रीय लोकतांत्रिक आघाडीच्या सत्ता स्थापनेमध्ये हे दोन्ही पक्ष जसे किंगमेकर आहेत, तसेच ते उपराष्ट्रपतीच्या निवडणुकीतही असतील. आपापल्या घटकराज्याच्या विकासासाठी मोदी सरकारसोबत राहणेच दोन्ही मुख्यमंत्र्यांची पहिली पसंती असली तरीही भाजपाला मित्र पक्षाशी चर्चा करूनच उपराष्ट्रपती पदाचा उमेदवार निश्चित करावा लागेल. लोकसभेची एकूण सभासद संख्या ५४३ तर राज्यसभेची एकूण सदस्य संख्या २४५ आहे. भाजपाचे लोकसभेत २४० आणि राज्यसभेत १०२ सदस्य आहेत. राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटक पक्षांचे लोकसभेत २९३ आणि राज्यसभेत १३४ असे एकूण ४२७ सदस्य आहेत. तर काँग्रेसचे लोकसभेत ९९ आणि राज्यसभेत २७ सदस्य आहेत. लोकसभेत इंडिया आघाडीतील समाजवादी पक्षाचे ३७ आणि तृणमूल काँग्रेसचे २९ सदस्य आहेत. इंडिया आघाडीतील घटक पक्षांचे दोन्ही सभागृहातील सदस्यांची संख्या ३०० पेक्षा अधिक आहे. राज्यसभेतील २४५ पैकी रालोआकडे १३४ सदस्य असल्याने राज्यसभेतही त्यांचेच बहुमत आहे. एकूणच एकट्या भाजपाकडे स्पष्ट बहुमत नसले तरी घटक पक्षांचे मिळून बहुमत होत असल्याने राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा उपराष्ट्रपतीपदाचा उमेदवार विजयी होणार आहे. दोन्ही आघाडीत नसलेल्या इतर छोट्या राजकीय पक्षांची भूमिका फारशी महत्त्वाची नाही. काही सदस्यांनी सत्ताधारी रालोआची कास धरल्याने त्यांची संख्या वाढणार.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात स्थिर सरकार असल्याने उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीकरीता रालोआ मजबूत स्थितीत आहे. तिकडे इंडिया आघाडी लोकसभा निवडणुकीपूरतीच असल्याच्या प्रतिक्रिया आम आदमी पक्षासह इतर काही घटक पक्षांकडून येत असल्याने इंडिया आघाडीत मतभेद आहेत. ते दिल्ली विधानसभा निवडणुकीत दिसले. काँग्रेस आणि आप ने विधानसभा निवडणूक वेगवेगळी लढविल्याने पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे इंडिया आघाडीकडून उपराष्ट्रपती पदाचा उमेदवार दिला तरी बहुमताअभावी त्या उमेदवाराचा पराभव तर होईलच शिवाय इंडिया आघाडीतील मतभेद पुन्हा पुढे येतील.



कथा

प्रा. मोहन काळे
७०३८२७६५५८




रामला काहीच कळेना. तो सैरभैर झाला. आपले आई वडील इतके वाईट कसे वागू शकतात यावर त्याचा विश्वास बसत नव्हता. त्यानं त्याच्या आई-वडिलांचे संवाद ऐकले होते. आई म्हणत होती, ''ते मले काईच सांगू नोका. मले एकत्र नाई रायाचं म्हन्जे नाई रायाचं. आपुन अल्लग निंगू. तुम्ही, मी अन् आपला राम. तुमचे भाऊ तिकडे मस्त अल्लग राहतात अन् आपुन सबनायचं करू करू थंडेगार होतो. ना कुठी जाता येत ना हौस मौज करता येत. सबन पावने आपल्याच घरी येतात. मी कितीक करू? तुम्ही तुमच्या आईबाबाले मोठ्याच्या घरी पाठून द्या. त्यायचं काई कर्तव्य हाये की नाई?'' रामची आई बोलत होती.

''अवं, तू अशी काय करतं? ते आईबाबा हायेत माले. त्यायले मी असं कसं म्हनू?'' रामच्या बाबांचा विनवणी करणारा आवाज आला.

''ते मले काईच सांगू नोका. तुमाले कसं सांग्याचं ते तुम्ही ठरवा.'' आई ऐकायला तयार नव्हती.

''पन त्यायचा तुले काय त्रास हाये? राम तर त्यांच्या अंगावर हाये. त्याले आबाआजी शिवाय करमील काय? ते हायेत म्हनून आपल्याले काई चिंता नाई. त्यायच्याच्यानं पाव्हने आपल्या घरी येतात. त्यानं घरात चैतन्य रायते. घर दनदन रायते.''

''तुम्हाले काय! सबन कराव तर मले लागते. तुम्ही ऐकत नसान तर मी जातो माहेराले. मंग राहा तुम्ही अन् तुमचे आईबाबा आनंदानं. तुम्हाले तेच पाहिजे त तुम्हीच राहा अठी. ''

''हे पाय. मालं डोक्सं चालून नाई राह्यलं. मले तू चार पाच दिसाचा टाईम दे. मंग पायतो काय करता येते ते.''

''देले. पाच काय दाहा दिवस देले. पायजे तेवळा ईचार करा. मंग मात्र मी तुमचं काईबी ऐकून घेनार नाई.''

असं म्हणून आई फणकाऱ्यानं तिथून निघून गेली. बाबा तसेच डोकं पकडून खुर्चीवर बसून विचार करू लागले.

राम चौथीत होता. तो अभ्यासात हुशार होता. त्याचं त्याच्या आईबाबांवर खूप प्रेम होतं. पण तेवढंच प्रेम आजीआजोबांवर सुद्धा होतं. आबा त्याला रात्री झोपताना छान छान गोष्टी सांगायचे. त्याला बाहेर फिरायला न्यायचे. त्याच्यासोबत खेळायचे. आजी त्याचा खूप लाड करायची. आई रागावली तर आजीच त्याचा बचाव करायची. त्याची आंघोळ घालून द्यायची. त्याची तयारी करून द्यायची. त्याला खाऊ घालायची. तो आजीआबाच्या अंगावर होता. आई किंवा बाबा गावाला गेले तर त्याला काहीच वाटायचं नाही पण आबा किंवा आजी मोठ्या बाबाकडे किंवा आत्याकडे एक दिवस जरी गेले तरी त्याला करमायचे नाही. ते म्हणजे त्याचे जीव की प्राण! आता तेच जाणार असा विचार करून त्याच्या अंगावर काटे उभे राहिले. तो काही क्षणांसाठी थरथरला. जीवनात पहिल्यांदा त्याला त्याच्या आई-वडिलांचा तिरस्कार वाटायला लागला. त्यांचा त्याला खूप राग आला. काहीही झाले तरी चालेल पण आबाआजीला आपल्या घरून जाऊ द्यायचे नाही हे त्यानं ठरवलं.

''राम, झाली काय तयारी? चल, तुले शाळेत पोहचवून देतो अन् तिकडच्या तिकडे गावाले जातो.

रामचे बाबा काही कामानिमित्त तीन चार दिवस बाहेरगावी जाणार होते.

रामची आई आता खूष दिसत होती. तिला सासूसासऱ्यांचे करणं आवडत नव्हतं. तिला राजाराणीचा संसार हवा होता. राम लहान असेपर्यंत त्यांची खूप मदत झाली होती. पण आता तिला ते नको होते. आता तिला पूर्ण स्वातंत्र्य पाहिजे होतं.

सायंकाळचे चार वाजले होते. तिचा मोबाईल वाजला. तिकडून तिच्या आईचा घाबरलेला आवाज तिला ऐकू आला.

'' रेखा,काय कराव बाई तूच सांग आता. त्वाल्या वईनीनं सकाळी सकाळी आमच्याशी भांडन केलं. अन् रमेशले, त्वाल्या भावाले, खन्नावून बजावलं की आम्हां म्हाताऱ्यायले वृद्धाश्रमात पाठवा म्हनून. आता म्हातारपनात आम्हांले खरी गरज हाये सहाऱ्याची, पोराच्या प्रेमाची, सोबतीची, नातवंडायले जीव लाव्याची, त्यायच्या सहवासात बालपन अनुभवन्याची. अन् त्वाला भाऊ अन् त्वाली वईनी म्हन्ते की आम्ही वृद्धाश्रमात जावं म्हनून. तुमच्यासाठी आम्ही काय नाई केलं! आमच्या इच्छाआकांक्षा, मन मारून तुम्हांले पायजे ते देलं. कर्ज काढून तुम्हांले शिकोलं. म्हनून तुम्ही दोघंबी आज चांगल्या पदावर आहात. सुखी आहात. आमच्या कष्टांच्यानं आम्हांले सुख भेटलं नाई. आता सुख आलं तर त्या सुखाले पारखं करायले पाहतात. याचसाठी मुलांसाठी खस्ता खाल्ल्या काय की म्हातारपनी त्यायनं आम्हांले दूर लोटावं! कोनत्या मायबापाले आपल्या कायजाच्या तुकड्यांपासून दूर जावं वाटील! पोराले आपल्या मायबापापासून तोडणऱ्याचं पाप सुनेनं करू नाई. तू तरी करशील का असं सांग बरं?'' आईनं असं म्हटलं अन् शीतल शांतच झाली. तिच्या वहिनीचा तिला खूपच राग आला. फोन करून तिला खूप झापणार होती ती. पण आईच्या शेवटच्या वाक्याने ती हादरलीच. सकाळीच तिने तिच्या नवऱ्याला सासू सासऱ्यांना जेठाकडे पाठवण्यास बजावले होते.

''आई, तू कायजी नको करू. मी रामचे बाबा गावाहून आले की येतो तिकडे. आपुन त्यातून मार्ग काढू. नाहीतर तू बाबाले घिऊन माल्या घरी ये. अठीच राहा.'' असं तिनं म्हटलं तर खरं पण तिच्या शब्दांत जोर नव्हता.

''नाई वं,बाई. त्वाल्याघरी त्वाले सासूसासरे हायेत. आमची त्यात भर कशाले? त्वाले सासूसासरे नशीबवान हायेत. त्यायले जीव लावनारी, कायजी घेनारी त्वाल्यासारखी सून भेटली. आमचं तर नशीबच फुटकं! जाऊ दे. जातो आम्ही वृद्धाश्रमात. तू आमची काई चिंता करू नको.'' आई रडायला लागली. त्या फोनवरील आवाजानं तिलाही रडू आलं. त्या आवाजानं तिचे सासूसासरे हॉलमध्ये आले.

''काय झालं,सूनबाई? तू रडून का रायली?'' त्यांनी काळजीनं विचारलं. तिनं त्यांना सर्व सांगितलं.

''तू काई कायजी करू नको. त्वाले सासरे सकाऊनच जातील त्वाल्या माहेरी. त्वाल्या भावाले अन् वईनीले समजावून सांगतील. सर्व बरोबर होईल.'' सासूनं असं म्हटलं. ती सासूच्या गळ्यात पडून रडू लागली. तेवढ्यात मोबाईलची रिंग वाजली. तिकडून एक माणूस बोलत होता. जाधव साहेब आहेत का?'' ''नाई. ते बाहीरगावी हायेत. तुम्ही कोन अन् तुमचं काय काम हाये?''

''तुमचा मुलगा राम आमच्या ताब्यात आहे. त्याला जीवंत पाहिजे असेल तर दहा लाख घेऊन या व आपल्या मुलाला घेऊन जा. पोलिसांना सांगितले तर मुलाला आम्ही ठार मारून टाकू.''

समोरून आवाज बंद झाला आणि ती धपकन सोफ्यावर पडलीच.

''शीतल, काय झालं? तू त लयच भेदरलेली दिसतं!'' सासूनं विचारलं.

'' सासूबाई, आपल्या रामचं कोनंतरी अपहरन केलं. ते गुंड दहा लाख रुपये मांगून राह्यले. नाईतर ते रामले.....''

ती जोरजोरात रडू लागली. तशी सासू पण घाबरली. तिच्याही डोळ्यांत पाणी आलं. तिनं नवऱ्याकडे पाहिलं.

''तुम्ही दोघीबी शांत बसा आधी. आपुन थंड डोक्यानं यावर तोडगा काढू. रामले काईच होनार नाई.''

''पन मामाजी, रामचे बाबा तर तीन चार दिवसानं येतील. तठी तर मोबाइलची रेंज बी नाई. त्यायले हे कसं समजील?'' ती परत रडू लागली.

''माला दोस्त आंधी पोलीस खात्यात अधिकारी होता. सीआयडीत. मी त्याले फोन करून पायतो काई होते काय म्हनून.

''पन पोलीसायले फोन कऱ्याचा नाई अशी धमकी देल हायनं.''

''त्यायले माहीत पळनार नाई.''

सासऱ्यांनी फोन केला. त्यांच्या संभाषणाकडे ती कान देऊन ऐकत होती. त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारे भाव पाहून ती किंचीत निश्चिंत झाली. पण तिच्या मनात धाकधूक होतीच. तिचा एकुलता एक मुलगा तिच्यापासून दूर होता. तिच्या जीवाची तगमग, तडफड फक्त तिची तिलाच माहीत होती. शेवटी ती एक आई होती!

रात्री कुणीच झोपलं नाही. कुणाचीच जेवणाची इच्छा नव्हती. पण सासूबाईंनी स्वयंपाक केला, तिला धीर दिला व जबरदस्तीनं तिला थोडं खायला लावलं. तिच्या घशातून घास खाली उतरत नव्हता. सासूसासरे तिच्याजवळून रात्रभर हलले नाहीत. संपूर्ण रात्र बेचैनीत निघाली.

मोबाईलची रिंग वाजली की तिच्या मनात धस्स व्हायचं. प्रत्येक कॉल तिला अपहरणकर्त्यांचा वाटत होता. कंपनीच्या कॉलचीही तिला आता भीती वाटायला लागली होती. त्यात तिच्या पतीला फोन लागत नव्हता. तिला जीवनात पहिल्यांदा असहाय वाटत होतं. तिचे सासू सासरे होते म्हणून बरं. नाईतर तिचं काई खरं नव्हतं.''

दोन दिवसांनी राखी पौर्णिमा होती. पण आईच्या फोनमुळे तिला भावाला राखी बांधू नये असे वाटत होते. तिचा सख्खा भाऊ आई-वडिलांना वृद्धाश्रमात ठेवायला निघाला होता. त्यात इकडे हे प्रकरण. तिचा जीव कासावीस झाला. पहिल्यांदा ती नात्यांचे महत्त्व समजत होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता तिच्या अंगणात पोलिसांची गाडी थांबली. तिच्या काळजात चर्रर झालं. पोलीस कोणती बातमी सांगतात अशी भीती तिच्या मनात निर्माण झाली.

पोलिसांच्या गाडीतून पोलीस इन्स्पेक्टर बाहेर पडले. त्यानंतर दोन हवालदार उतरले. नंतर तिचा राम गाडीतून उतरला. तिनं आवंढा गिळला. रामला पाहून तिला झालेला आनंद कसा व्यक्त करावा हेही तिला समजेना. तिचे ओठ व गाल थरथरायला लागले व तिच्या डोळ्यांतून अश्रूंच्या अखंड धारा सुरू वाहू लागल्या. ती पळतच अंगणात गेली. तिनं रामला आपल्या छातीशी धरले व ती त्याच्या गालाचे पटापटा मुके घेऊ लागली. तिच्या तोंडातून शब्द फुटत नव्हता. पोलिसांनी सांगितले की शाळेच्या बाहेरूनच रामचे अपहरण करण्यात आले होते. अपहरणकर्ते पकडल्या गेले होते. सीआयडी इन्स्पेक्टरनं त्याचं काम खूप चलाखीने पार पाडलं होतं.

एक संकट टळलं. आता दुसरं संकट बाकी होतं. तिचे आईबाबा वृद्धाश्रमात जात आहेत असं चित्र तिच्या डोळ्यांसमोर राहून राहून येत होतं.

''मामाजी, मी रक्षाबंधनाले माहेरी जानार नाई.'' तिनं सासऱ्याला सांगितले. नवरा घरी असता तर त्याला सांगितले असते.

''का? असं नसते, बेटा. पान्यात काठी मारली तर पानी अलग होत नसते. रक्ताचं नातं अनमोल असते. ते पैशानं विकत घेता येत नाई. असं कर, तू रक्षाबंधनाले जाय माहेरी. त्वाला भाऊ ओवाळनी टाकील तर म्हनजो की ''मले ही ओवाळनी नाई पायजे. तू आई-बाबाले अंतर देनार नाई हे वचन दे. तीच माली ओवाळनी असील.''

''अन् त्यानं ती ओवाळनी देली नाई तर?'' तिनं तिच्या मनातील शंका बोलून दाखवली.

''त्वाला भाऊ नाई म्हन्नारच नाई असा मले विश्वास हाये. त्वालं माहेर सुसंस्कृत हाये. सासऱ्यानं असं म्हटलं आणि तिनं हंबरडाच फोडला. ती सासऱ्याच्या छातीवर डोकं ठेवून रडायला लागली. तिचा तिलाच पश्चात्ताप होत होता. आता ती शेवटपर्यंत सासू सासऱ्यांसोबत राहणार होती.

सासऱ्यांनी वरच्या मजल्यावर जाऊन मोबाईल काढला आणि कॉल लावला, ''बेटा, तू घरी ये. सगळं व्यवस्थित झालं. काईच कायजी करू नको. फक्त एक कॉल त्वाल्या सासू सासऱ्याले व साळ्याले लाव अन् त्यायचे आभार मान. त्यायच्या सहकार्याच्यानं साऱ्या गोष्टी चांगल्या झाल्या. हे रक्षाबंधन विशेष राहील हे नक्की. त्वाल्या त्या सीआयडी वाल्या दोस्ताले धन्यवाद म्हन्जो. अन् हो, आपला राम लय हुशार हाये बरं!ही कल्पना त्याचीच होती.'' त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळीच चमक होती.''

# ‘जटाधरा’ चित्रपटाचा अंगावर काटा आणणारा टीझर प्रदर्शित



सोनाक्षी सिन्हाच्या ‘जटाधरा’ या नवीन चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला आहे. चित्रपटातील व्हीएफएक्सदेखील अद्भुत आहेत, ज्यांची झलक टीझरमध्ये दिसते. निर्मात्यांनी नुकतेच ‘जटाधरा’चे पोस्टर प्रदर्शित केले. त्यानंतर लोकांची चित्रपटाबद्दलची उत्सुकता वाढली आहे.‘जटाधरा’मध्ये सोनाक्षी सिन्हा आणि तेलुगू स्टार सुधीर बाबू हे मुख्य भूमिकेत आहेत. या चित्रपटात दोघेही एका नवीन अवतारात दिसणार आहेत. टीझरमध्ये सोनाक्षी आणि सुधीर बाबूदेखील एकमेकांशी टक्कर देताना दिसत आहेत.चित्रपटाची कथा पौराणिक असून, या कथेत स्वार्थीपणा आणि बलिदान यांमधील संघर्ष दिसतो. सोनाक्षी सिन्हा टीझरमध्ये एका शक्तिशाली आणि क्रूर देवीच्या रूपात दिसते. चेहऱ्यावरचा राग, डोळ्यांतील अंगार व भेदक आवाज या सगळ्यांमुळे सोनाक्षीचा लूक आजवरच्या चित्रपटांपेक्षा वेगळा ठरतोय. दुसरीकडे सुधीर बाबू शांत; पण दृढनिश्चयी योद्ध्याच्या रूपात आहे. सोनाक्षी आणि सुधीरमध्ये शेवटी युद्ध होताना पाहायला मिळतं.‘जटाधरा’ चित्रपटाच्या टीझरमध्ये सोनाक्षी सिन्हाचं रौद्र रूप चाहत्यांना आश्चर्यचकित करत आहे. या चित्रपटाद्वारे सोनाक्षी तेलुगू चित्रपटसृष्टीत पदार्पण करीत आहे. ‘जटाधरा’चं दिग्दर्शन वेंकट कल्याण आणि अभिषेक जयस्वाल यांनी केलं आहे.अद्भुत व्हीएफएक्स आणि एआयव्यतिरिक्त या चित्रपटात ॲक्शन, सस्पेन्स व मनोरंजनाचाही समावेश असेल. हा एक अलौकिक थ्रिलर आहे, जो संपूर्ण भारतात प्रदर्शित होणार आहे. ‘जटाधारा’चं बजेट १०० कोटी असल्याचं सांगितलं जात आहे. असंही म्हटलं जात आहे की, हा तेलुगू चित्रपटसृष्टीतील सर्वांत महागडा चित्रपट असेल. हा चित्रपट लवकरच सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.सोनाक्षी सिन्हा तिच्या व्यावसायिक आयुष्यामुळे कमी; पण खासगी आयुष्यामुळे कायम चर्चेत असते. अभिनेता झहीर इक्बाल याच्याबरोबर लग्न केल्यानंतर सोनाक्षी कायम तिच्या वैवाहिक आयुष्यामुळे चर्चेत राहिली आहे. सोशल मीडियावर झहीरबरोबरचे फोटो पोस्ट करीत सोनाक्षी नवऱ्यावर असलेलं प्रेम व्यक्त करताना दिसते.

# टॉयलेटमध्ये मोबाइल वापरल्याने होतोय ‘हा’ गंभीर आजार!

अनेकांच्या आयुष्यात मोबाईल ही आता एक महत्त्वाची वस्तू बनली आहे. अगदी लहानांपासून ते मोठ्यापर्यंत सर्वच जण मोबाईलवर व्यस्त दिसतात. काही मिनिटांसाठीदेखील ते मोबाईलपासून दूर राहू शकत नाही. यात अगदी टॉयलेटला जातानाही अनेक जण मोबाईल बरोबर घेऊन जातात, तिथे तासनतास बसून रील्स स्क्रोल करत बसतात, कोणाशी तरी कॉल किंवा मेसेजवर बोलत बसतात. अशाप्रकारे लोक मोबाईलमुळे गरजेपेक्षा अधिक वेळ टॉयलेटमध्ये बसून राहतात. पण, या सवयीमुळे तुम्हाला एका गंभीर आजाराचा सामना करावा लागू शकतो.आरोग्यतज्ज्ञांनी या टॉयलेटमध्ये मोबाईल वापरण्याच्या या सवयींबाबत तीव्र चिंता व्यक्त केली आहे. या सवयीमुळे पाईल्स अर्थात मूळव्याध होण्याचा धोका अनेक पटींनी वाढतोय.फोर्टिस हॉस्पिटल्सचे कन्सल्टंट सर्जिकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. प्रणव होन्नावरा श्रीनिवासन यांनी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सांगितले की, टॉयलेटमध्ये जास्त वेळ बसल्याने मूळव्याध होण्याचा धोका वाढू शकतो, विशेषतः जेव्हा जास्त वेळ बसण्याची सवय होते तेव्हा हा धोका अधिक वाढतो, कारण टॉयलेटमध्ये जास्त वेळ बसल्याने गुदाशय आणि गुदद्वाराच्या आजूबाजूच्या नसांवर सतत दाब येतो. या दाबामुळे या नसा सुजू शकतात, ज्यामुळे कालांतराने मूळव्याध होण्याची शक्यता असते.

## आकाश साप्ताहिकी




**दि.१० ते १६ ऑगस्ट २०२५**

### उल्का वर्षाव

निरभ्र रात्री आकाशात एखादी प्रकाशरेषा क्षणार्धात चमकून जाते, तिला काही लोक तारा तुटला असे म्हणतात पण याचा ताऱ्याशी संबंध नसतो तर ही एक उल्का असते.

पृथ्वी परिभ्रमण करतांना तिच्या कक्षेत आलेले अनेक सारे धुमकेतू, ग्रह, लघुग्रह इ.चे छोटेमोठे वस्तूकण पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणामुळे ओढले जाऊन ते घर्षणामुळे वातावरणात पेटतांना दिसतात.वर्षातील काही ठराविक वेळी बघता येतात.या १२ व १३ ला अवश्य बघावा.

✻अशी असेल आकाश स्थिती✻

दि.१०.चंद्र धनिष्ठा नक्षत्रात.

दि.११.चंद्र शततारका नक्षत्रात.बुध ग्रह मार्गी.

दि.१२.चंद्र पूर्व भाद्रपदात, शनी आणि चंद्र युती. ययाती तारका समूहातून उल्का वर्षाव, पहाटे पूर्वे स,दरताशी ९० उल्का.

याचवेळी सर्वात मोठा ग्रह गुरु आणि सर्वात तेजस्वी शूक्र ग्रह युती स्वरूपात अगदी जवळ बघता येतील.

दि.१३.चंद्र उत्तर भाद्रपदात, ययातीतून उल्का वर्षाव.

दि.१४.चंद्र रेवती नक्षत्रात.

पृथ्वी जवळ चंद्र अंतर ३,६९,३०० कि.मी .

दि.१५.चंद्र अश्विनी नक्षत्रात स्वातंत्र्यदिनी इंटरनॅशनल स्पेस स्टेशनची सलामी. पहाटे ५-१७ ते ५-२२ या वेळी फिरती चांदणी आकाश मध्या जवळून नैऋत्येकडून ईशान्येकडे नुसत्या डोळ्यांनी पाहता येईल.

दि.१६.चंद्र भरणी व नंतर कृत्तिका नक्षत्राच्या जवळ. सूर्य सिंह राशी समुहात.

## राशी-भविष्य

**मेष :** थोडे प्रयत्न करा. नशीब नक्कीच तुमच्या बाजूने असेल, कारण आज तुमचा दिवस आहे. आज तुम्हाला ऑफिसमध्ये काही काम करावे लागू शकते,

**वृषभः** तुम्ही तुमच्या कुटुंबासाठी तुमचा आनंद बलिदान द्याल. परंतु त्या बदल्यात तुम्ही काहीही अपेक्षा करू नये.

**मिथून :** तुमचा जोडीदार खरोखर तुमचा देवदूत आहे हे तुम्हाला माहिती आहे का? त्यांचे निरीक्षण करा आणि तुम्हाला ते स्वतः दिसेल.

**कर्क :** कुटुंबासाठी चांगले आणि उच्च ध्येय साध्य करण्यासाठी जागरूक मनाने थोडीशी जोखीम पत्करता येते. संधी गमावल्याची भीती बाळगू नका. हा दिवस यशाने भरलेला आहे.

**सिंह :** पालकांचे आरोग्य सुधारेल आणि ते तुमच्यावर प्रेमाचा वर्षाव करतील. तुमच्या प्रेमसंबंधात आज काही अडचणी येऊ शकतात.

**कन्या:** पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती किंवा आर्थिक फायदा मिळू शकतो. लपलेले शत्रू तुमच्याबद्दल अफवा पसरवण्यास उत्सुक असतील.

**तुळ :** तुमच्या शब्दांनी किंवा कामाने कोणालाही दुखावण्याचा प्रयत्न करू नका आणि कुटुंबाच्या गरजा समजून घ्या.

**वृश्चिक :** कामाच्या क्षेत्राबद्दल बोलताना, तुमच्या टीममधील सर्वात चिडखोर व्यक्ती खूप शहाणपणाचे बोलत असल्याचे दिसून येते.

**धनु :** येणाऱ्या काळात तुमच्या वाट्याला अनेक चांगल्या संधी येतील. अशा लोकांवर लक्ष ठेवा जे तुम्हाला दिशाभूल करू शकतात.


**मकर :** आज, फक्त निष्क्रिय बसण्याऐवजी, असे काहीतरी करा जे तुमचे उत्पन्न वाढवू शकेल. तुमच्या प्रियकराचा चंचल मूड तुम्हाला त्रास देऊ शकतो.

**कुंभ :** तुमची समस्या तुमच्यासाठी खूप मोठी असू शकते, परंतु तुमच्या सभोवतालचे लोक तुमचे दुःख समजून घेणार नाहीत. कदाचित त्यांना वाटेल की त्यांचा त्याच्याशी काहीही संबंध

**मीन :** अभ्यासाकडे कमी लक्ष दिल्याने किंवा घराऐवजी मित्रांसोबत जास्त वेळ घालवल्यामुळे मुले असंतोष निर्माण करू शकतात.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 127




### हे कोडे कसे सोडवाल

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्द:—**

**दोन अक्षरी**
- कट्टा
- चोर
- जावा
- डक
- तरू
- त्याग
- दळ
- दाम
- धाम
- धान्य
- पद
- पाणी
- पाल
- पूर
- मान
- मुख
- रवा
- रक्षा
- रीत
- वाट
- वाद
- वाली
- शाळा
- सट्टा
- सेतु
- हल
- हस्ती

**तीन अक्षरी**
- अडत्या
- अतीव
- अनाम
- खनन
- गजर
- जलज
- जलन
- तालीम
- नवस
- पाडस
- पारवा
- भेकड
- यमुना
- राखाडी
- वारस
- विरह
- सवय
- साधन
- साहस
- हलवा
- हळद

**चार अक्षरी**
- अवघड
- अनामिका
- इरसाल
- डीकदाणी
- तरतम
- तनमन
- ताडपत्री
- नाकारणे
- नासधूस
- पारखणे
- बाणेदार
- रटरट
- रडारड
- रगडणे
- रमजान
- रसायन
- सेनापती
- हस्तीदंत

**पाच अक्षरी**
- इम्रान खान
- जनान खाना
- दपटशाही
- नटसम्राट
- परीटघडी
- समाराधन

**अन्य अक्षरी**
साम दाम दंड भेद
हमरीतुमरी वर येणे


(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | खे | त | क | ळ | स | गा | वा | ल | व | ळ | स | ■ | ह |
| पू | री | ■ | फ | ■ | ब | ■ | रा | ख | ण | ■ | ■ | खे | प |
| र | ज | क | ■ | सु | र | भी | ■ | ■ | व | त | न | ■ | प |
| ■ | ■ | म | नो | र | म | ■ | सु | र | ण | ■ | श्व | ■ | च |
| के | स | र | ■ | स | ती | चे | वा | ण | ■ | ख | र | ■ | मा |
| क | म | ■ | के | ■ | ■ | ■ | स | गा | ■ | ल | ■ | ■ | ल |
| व | र | मा | य | ■ | पा | रे | ■ | ख | ■ | ■ | अ | भं | ग |
| ली | ■ | ल | ■ | भा | व | गी | त | ■ | स | म | र्थ | ■ | प |
| ■ | पा | ■ | भा | व | की | ■ | ■ | म | द | ■ | ■ | कृ | प |
| खे | च | र | ■ | ना | ■ | अ | व | ह | न | ■ | र | मी | ■ |
| द | र | वा | ज | ■ | वा | यु | ■ | ती | ■ | प | ट | ■ | नि |
| ज | ■ | न | ग | र | ■ | ध | ड | ■ | पा | त्र | ■ | स | रा |
| न | ■ | गी | र | ■ | ■ | ■ | ब | द | क | ■ | पा | ■ | म |
| क | ष्टी | ■ | ण | ■ | ■ | मु | के | श | ■ | ज | ल | म | य |

Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 508



**आडवी विधाने:—** 1) सेवानिवृत्तीनंतर प्रत्येक महिन्यास सदर संस्थेद्वारा मिळणारे उत्पन्न
5) पायाच्या नखापासून ते डोक्याच्या शेंडीपर्यंत
9) निरोप पोहचविणारा
12) धुंद, माजलेला
13) लहान मशाल
15) जवळ पैसा असला की कोणतेही कार्य सहज साध्य होते.
18) गुप्त ठेवण्यासारखे
20) देवाला ओवाळण्याचे दीपपात्र
22) विविध, अनेक
23) निशा, रजनी
24) विचार, अभिप्राय
26) यथायोग्य आदरसत्कार
28) साह्यभूत होणारे उपकरण
30) प्रयत्न, कष्ट
31) बारीक झणझण
33) नेहमी, ............ योग तुझा घडावा......
36) लाकूड
37) त्याचा किंवा तिचा (सं.)
39) गांवभर निरर्थक भटकणारी स्त्री
40) शिव धनुष्य
41) रामायणात साधुचे सोंग घेऊन सीतेचे हरण करणारा
42) बदक (इं.)
43) नाखुषी, असंतुष्टपणा
44) शौर्य, पराक्रम
45) मनास वाटणारी स्वस्थता
46) आंब्याचा रस
47) सांखळी
48) मनाला मोहून टाकणारे
50) आपल्या मनास वाटेल तसाच वागणारा
52) याला धर त्याला पकड अशी धामधुमीची परिस्थिती
53) विनाकारण, उगाचच
54) पुरुष
56) बारा महिन्यांचा कालावधी
57) लयास जाणे, मावळणे
58) रुची, द्रव
60) दुर्मीळता, अभाव
61) टीका, समीक्षण
63) निरोप, बातमी
65) चुरशीचा खेळ, झुंज
68) भान सुटलेला
70) तपशीलवार माहिती
71) नाही म्हणणे, नापसंती
73) पायदळ जाण्याचा मार्ग
75) मोरोपंतांनी रचलेल्या आर्या या नावाने प्रसिद्ध आहेत
77) निद्रा न घेता जागे राहणे
78) आपदा, विपत्ती
79) हवेतील गारवा
80) मध्यप्रदेशातून वाहणारी एक नदी
81) एक वृक्ष विशेष
82) अलंकारशास्त्रात वर्णिलेले नऊ रस
84) बाळंतिणीची सकुशल सुंटका करणारी सेविका
85) स्मृतिचिन्ह
86) सर्वत्र वाळूच वाळू असलेले स्थान, वाळवंट

**उभी विधाने:—** 1) अर्धवट गोरा
2) वर्तमानपत्र
3) बारा वर्षांचा कालावधी, चिंतन
4) कमळांचा समूह
6) खजिन्यावरील मुख्य अधिकारी 7) स्कंध
8) अंधःकार
9) पराभव, हार, ओळ
10) कागदाचा चतुर्थांश, स्तंभ
11) आकांक्षा, इच्छा
14) त्रेधा, धांदल
16) मस्तकविहीन शरीर
17) महाभारतातील नकुल सहदेवांची माता
19) पापी लोकांना यमाकडून मिळणारी भयंकर शिक्षा
21) उचलण्यास वजनी असलेले
25) मनाचे समाधान करुन घेणे, खातरजमा (उर्दू)
27) प्रशंसा, प्रार्थना
28) स्वातंत्र्यवीर वि. दा.चे आडनाव
29) तपकीर
32) आाडदांडपणे केलेले कार्य
34) दानशूर, उदार
35) छत्रपती शिवरायांचे राजकीय गुरु
36) काळ्या पाठीचा हरीण
38) ईश्वर
40) महाभारतात भीष्मांची उपाधी
41) लाकूड जळल्यावर उरणारे अवशेष
43) हाताची नाडी बघून रोग ओळखणे
45) पुष्प, फूल
46) मन वेधून घेणारे, ओढणे
47) हस्त, हात
49) सेवक 51) चिलखत
53) श्रीविठूमाऊलींचे एक परमभक्त संत
55) रचना करणारा
57) पैसा
59) एक चपळ पण भित्रा प्राणी
61) विचार विनिमयासाठी जमलेली मंडळी, बैठक
62) माशांचे चित्र असलेले निशाण ज्याचे आहे असा मदन
63) राष्ट्र संचालनासाठी तयार केलेले नियम
64) ओशाळलेला
66) तळहाताची मागची बाजू
67) देणारा, देण्यालायक
68) चहूबाजूंनी पाण्याने वेढलेला प्रदेश
69) देवादिकांचे अन्य रुपाने पृथ्वीवर येणे
72) युद्धातील डावपेंच
73) पारड्यातील विषमता काढून टाकण्यासाठी त्यात टाकलेला जिन्नस
74) प्रवासी, मार्गक्रमण करणारा
76) दूध, केळी मिश्रित एक पक्वान्न
77) मुलीचा पति
83) मोत्यांची माळ, जिंकणे

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| श्र | द्धां | ज | ली | ■ | सं | भा | व | ना | ■ | भां | ड | व | ल | ■ | हि |
| मि | ■ | ल | ■ | भा | ग | व | त | ■ | भ | ग | र | ■ | ■ | श | त |
| क | ■ | त | ■ | ग्यो | ■ | ज | न | र | व | ■ | का | न्हो | बा | ■ | क |
| ■ | शि | र | च्छे | द | ■ | य | ■ | ■ | न | व्हा | ळी | ■ | बा | जा | र |
| तो | र | ण | ■ | य | क्ष | ■ | न | स | ■ | ■ | ■ | प्र | सा | र | ■ |
| त | ■ | प | शु | ■ | णो | ■ | ज | म | द | ग्नी | ■ | ■ | हे | ■ | ब |
| या | ■ | टू | ■ | प | क्ष | का | र | ■ | त्त | ■ | क | ळं | ब | ■ | ग |
| ■ | चि | ■ | ध | र | णी | ■ | बं | ध | क | ■ | ल | ■ | आं | ध | ळा |
| पा | त्र | ता | ■ | भ | ■ | कै | दी | ■ | ■ | ल | क | ■ | बे | ■ | ■ |
| ■ | गु | ल | ■ | णी | ■ | ला | ■ | ख | ल | ब | त्ता | ■ | ड | का | र |
| ज | प्त | ■ | ■ | ■ | का | स | व | ■ | घु | ■ | ■ | न | क | ल | ■ |
| न्म | ■ | ■ | उ | र्व | शी | ■ | र्धा | ■ | ■ | ■ | प्र | ख | र | ■ | त |
| गा | ल | गु | च्चा | ■ | फ | ■ | प | ठा | र | ■ | ण | ■ | ■ | वि | मा |
| ठ | ■ | ■ | र | सा | ळ | ■ | न | ■ | ■ | ■ | ■ | त्रि | शु | ल | ■ |
| ■ | सा | ■ | ■ | ध्वी | ■ | न | दि | म | श्र | व | ण | ■ | क | क्ष | ■ |
| ज | य | हिं | द | ■ | ह | व | न | ■ | म | ध | ■ | ध | र | ण | ■ |

Uday Munde - 8446302691

**महत्त्वाचे**

## पाटणबोरीत दिवसाढवळ्या महिलेला लुटले

**झरी जामणी:** पाटणबोरी येथे शेतात एकट्या काम करणाऱ्या महिलेला चाकूचा धाक दाखवून दिवसाढवळ्या लुटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. दोन अनोळखी चोरट्यांनी तिचे मंगळसूत्र व कानातील दागिने हिसकावून नेले. दोन दिवसांतील दुसऱ्या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. शुक्रवारी, ८ ऑगस्ट रोजी ही घटना घडली. अन्नपूर्णा देविदास ढोरबावणे या पाटण बोरी येथील रहिवासी आपल्या शेतात काम करत होत्या. शेतात कोणी नसल्याची संधी साधून, दोन अनोळखी भामट्यांनी त्यांना घेरले आणि गळ्यावर चाकू ठेवून त्यांच्या अंगावरील सोन्याचे मंगळसूत्र व कानातील दागिने काढून घेतले. यानंतर चोरटे पसार झाले. अतिशय घाबरलेल्या अवस्थेत अन्नपूर्णा यांनी घरी येऊन घडलेला प्रकार सांगितला. याप्रकरणी पांढरकवडा पोलिस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ६ ऑगस्ट रोजी वासुदेव उपलेंचवार यांच्या घरीही दरोड्याचा प्रयत्न झाला होता. पाठोपाठ झालेल्या या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, पोलिस प्रशासनाने गस्त वाढवून चोरांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. पांढरकवडा पोलिस पुढील तपास करत आहेत.

## जिल्ह्यातील वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करा: जिल्हाधिकारी

**अकोला:** राज्य शासनाच्या हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानात ८ ते १५ ऑगस्ट दरम्यान हरित सप्ताह राबविण्यात येत असून जिल्ह्यातील वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी भरीव वृक्षलागवड व्हावी. सर्व यंत्रणांनी समन्वयाने हा उपक्रम यशस्वी करावा असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज दिले.

हरित सप्ताहाच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी वन विभाग, सामाजिक वनीकरण, स्थानिक स्वराज्य संस्था, महापालिका, जिल्हा परिषद, विविध यंत्रणांच्या कार्यवाहीचा ऑनलाइन आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. सर्व संबंधित यंत्रणांचे अधिकारी या ऑनलाइन बैठकीला उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री कुंभार म्हणाले की, जिल्ह्यात दोन लक्ष वृक्ष लागवड होणार असून आपापले विभागांना दिलेल्या उद्दिष्टानुसार हे काम पूर्ण होईल यासाठी सर्वंकष प्रयत्न करावे. अमृतवृक्ष ॲपवर फोटो अपलोड करावे. शिक्षण विभागाने शाळा, महाविद्यालयाचा सहभाग मिळवून देऊन मोहीम खेडोपाडी व्यापक स्वरूपात राबवली जाण्यासाठी सहकार्य करावे. वन व सामाजिक वनीकरण विभागाने रोपे उपलब्ध करून द्यावीत. सर्व विभागांनी उद्दिष्टानुसार झाडे लावली जातील याची दक्षता घेण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.

ते पुढे म्हणाले की, स्वातंत्र्य दिनानिमित्त घरोघरी तिरंगा मोहीम राबविण्यात येत आहे.

# नांदखेडा येथील शाळेच्या क्रीडांगणासाठी चोरीचा मुरुम

## वनविभागातून केली गौण खनिज चोरी

। फुलचंद भगत ।

**मंगरुळपीर, दि. ९ :** क्रिडांगण वार्षिक अनुदान योजना २०२४-२५ व्दारे जिल्हा वार्षीक क्रिडांगणावर विविध खेळाची मैदाने तयार करण्याच्या योजनेतुन मंगरुळपीर तालुक्यातील नांदखेडा येथील जि.प.शाळेत सुरु असलेल्या पटांगणाच्या कामाकरीता चोरीचे गौणखनिज वापल्याच्या तक्रारीनंतर महसुल विभाग आणी वनविभागाकडुन स्पॉट चौकशी करण्यात आली आहे.चौकशीअंती दोषीवर कायदेशीर कारवाई होणार असल्याची माहीती मिळाली आहे.

मौजा नांदखेडा ता.मंगरुळपीर येथील जि. प. प्राथमिक शाळा नविन इमारत च्या प्रांगणात (आवारामध्ये) गौण खनिज सदृश्य रॉ मटेरियल व तसेच गौण खनिज (मुरुम) आढळुन आल्याच्या तक्रारीनुसार चौकशी करण्यात आली आहे.मौजा नांदखेडा येथील जि. प्र. प्राथ शाळा नविन इमारतच्या आवारामध्ये असलेल्या गौण खनिज सदृश्य रॉ मटेरियलची तसेच गौण खनिज ची दिनांक- : ३०/०५/२०२५ रोजी मोक्यावर जाऊन मौका पाहणी केली असता नविन शाळेच्या आवारामध्ये गौण खनिज सदृश्य रॉ मटेरियल अदांजे १० ते १५ ब्रास वा तसेच इतर गौण खनिज प्रकार मुख्य अंदाजे ३५ ते ४० ब्रास मटेरियल अंदाजे आढळुन व दिसुन येत आहे या बाबत गावात स्थानिक चौकशी केली असता रॉ मटेरिअस बाबत मागिल काही दिवसा अगोदर आदेशाने नांदखेडा ग्रामपंचायत ने गावातील रोडवरील अतिक्रमण काढले व अविक्रमण मध्ये निघालेले रॉ मटेरिअल असल्याचे सांगण्यात आले व तसेच गौन खनिज (मुरुम) या बाबत स्थानिक चौकशी केली असता ग्राम विकास अधिकारी याच्या कडुन क्रिडागण विकास अनुदान योजना सन् २०२४- २५ जिल्हा वार्षिक क्रिडांगणावर विविध खेळाची मैदाने तयार करणे अशा आशयाचे जिल्हा क्रिडा अधिकारी वाशिम पत्र सादर केले व या कामानुसार प्रस्तावित असलेले काम संबधित ठेकेदार यांनी सदर प्रस्तापित कामा करिता गौण खनिज वापरले असे चौकशी अंती कळले असल्याचा अहवाल तहसिल कार्यालयाला सादर केल्याचे कळले.सबंधीत ठेकेदाराने सदर मुरुम कोठुन आणला?रॉयल्टी भरली आहे का?कीती ब्रासची रॉयल्टी आहे व कीती मुरुम सदर कामासाठी वापरला याची आता विस्तृत चौकशी होणार असुन दोषीवर कायदेशीर कारवाई होणार असल्याचे कळले आहे.




### महसूल विभागाच्या कारवाईकडे आता लक्ष

गौनखनिजाच्या तक्रारीची त्वरीत दखल घेवुन अधिकाऱ्यामार्फत स्पॉट चौकशी करण्यात आली आहे.या चौकशीवरुन आता सबंधित ठेकेदारावर की ग्रामपंचायतीवर कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### चोरीचा मुरूम वनविभागाच्या की महसूलच्या हद्दीतील?

नांदखेडा शाळेच्या आवारात सुरु असलेल्या कामासाठी वापरलेला मुरुम हा चोरीचा असल्याचा संशय बळावत आहे कारण जवळच असलेल्या वनविभागाच्या हद्दीलगतच गौण खनिज चोरी झाल्याचे पुरावे दिसतात.जिथुन मुरुम अवैधरित्या ऊत्खनन केला ती जागा वनविभागाची आहे का याचीही स्पॉटपाहणी करण्यात आली असुन वनविभागाच्या जागानिश्चीतीसाठी सबंधिताकडे अहवाल पाठवण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.सदर मुरुम चोरीचा स्पॉट महसुलचा नसेल तर वनविभागाचा असु शकतो हे चौकशीअंती कळेल परंतु सदर ठिकाणावरुन अवैध मुरुम ऊत्खनन झाले हे मात्र निश्चीत असल्याचे पुरावे आढळत आहेत.

## नवी अभ्यासिका मुलांच्या भविष्यास आकार देणारे ज्ञानमंदिर ठरणार-आ. किशोर जोरगेवार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**चंद्रपूर , दि. ९ :** श्री श्रीरामकृष्ण सेवा समितीने हाती घेतलेले हे स्वप्नवत कार्य आज पहिल्या टप्प्यात प्रवेश करत आहे. आपल्या परिसरात अभ्यासिका उभारण्याचा शुभारंभ होत आहे. ही केवळ चार भिंतींची इमारत नसून, आपल्या मुलांच्या आणि समाजाच्या भविष्यास आकार देणारे ज्ञानमंदिर ठरणार असल्याचे प्रतिपादन चंद्रपूर विधानसभा क्षेत्राचे आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

आमदार जोरगेवार यांनी कृष्णा नगर येथील श्री श्री रामकृष्ण सेवा समिती येथे अभ्यासिकेच्या बांधकामासाठी ५५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. सदर कामाचे भुमिपूजन आज त्यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी भारतीय जनता पार्टीचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, महामंत्री मनोज पॉल, सविता दंढारे, राष्ट्रीय परिषद सदस्य तुषार सोम, बलराम डोडाणी, मंडळ अध्यक्ष अधिवक्ता सारिका संदुरकर, सचिव विश्वजीत शाहा, रॉबिन बिश्वास, तपोष डे, प्रलय सरकार, आनंद रणशूर, सुधाकर राखडे, जितेश कूळमेथे, कृष्णा मंडळ, बलाई चक्रवर्ती, मदन शहा, संतोष चक्रवर्ती, सुशांत भद्रा, सुनील रॉय आदी मान्यवर उपस्थित होते.




पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करण्याचा संकल्प आपण केला आहे. ११ अभ्यासिकांचा आपला संकल्प होता; मात्र आता जवळपास २० अभ्यासिका आपण मतदारसंघात तयार करत आहोत. यातील काही अभ्यासिकांचे काम पूर्ण झाले असून, विद्यार्थी येथे अभ्यास करून स्वप्नांना पंख देत आहेत, असे ते म्हणाले.

ही अभ्यासिका विद्यार्थ्यांसाठी केवळ पुस्तक वाचण्याची किंवा अभ्यास करण्याची जागा नसेल, तर त्यांच्या विचारशक्तीचा, सर्जनशीलतेचा आणि स्वप्नांचा विस्तार करणारे केंद्र ठरेल. येथे होणाऱ्या वाचन-संवादातून, मार्गदर्शन सत्रांतून आणि विविध शैक्षणिक उपक्रमांतून अनेक तरुणाई आपले उद्दिष्ट पूर्ण करतील. केवळ शैक्षणिक प्रगतीच नव्हे, तर आपल्या संस्कृतीची आणि परंपरेची जपणूक हेही या अभ्यासिकेचे ध्येय असेल. आजच्या डिजिटल युगात वाचनाची आणि प्रत्यक्ष संवादाची गरज अधिक वाढली आहे. अशा वेळी, अशी सुविधा निर्माण होणे म्हणजे पुढच्या पिढ्यांसाठी अमूल्य ठेवा ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीरामपूरमधील व्यापाऱ्यांच्या दुकानात शिरले पाणी

### निकृष्ट नाली बांधकामाचा फटका, प्रशासकीय 'भिजत घोंगडे'

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पुसद, दि. ९ :** पुसद-बाणा रस्त्याच्या निकृष्ट आणि अर्धवट नाली बांधकामामुळे, श्रीरामपूर येथील व्यापाऱ्यांच्या दुकानात पाणी शिरून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. दरवर्षीच्या या समस्येकडे प्रशासन आणि लोकप्रतिनिधी डोळेझाक करत असल्याने, 'नुकसान भरपाई कोण देणार?' असा संतप्त सवाल व्यापारी विचारत आहेत.

पुसद-बाणा रस्त्याचे काम अनेक वर्षांपासून 'भिजत घोंगडे' बनले आहे. रस्त्याच्या कडेला बांधण्यात आलेल्या नाल्या एकतर निकृष्ट दर्जाच्या आहेत किंवा जागोजागी खंडित आहेत.



त्यामुळे, पावसाचे पाणी नाल्यांमधून वाहून न जाता, थेट रस्त्यावर येते आणि दुकानांमध्ये शिरते. शुक्रवारी (दि. ८) झालेल्या पावसात, श्रीरामपूर येथील एका दुकानात तब्बल पंधरा ते वीस फूट पाणी साचले होते. दुकानदाराला इंजिन लावून सहा ते सात तास पाणी उपसा करावा लागला, ज्यात त्याचे मोठे नुकसान झाले. जर नालीचे बांधकाम योग्य पद्धतीने झाले असते, तर ही वेळ आली नसती, अशी भावना व्यापारी व्यक्त करत आहेत. या गंभीर समस्येकडे शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी कोणीही लक्ष देत नसल्याने, नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे.

### 'हम करे सो कायदा?'

या रस्त्याचे बांधकाम आणि नालीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे. याकडे ना लोकप्रतिनिधी लक्ष देत आहेत, ना जिल्हा परिषद बांधकाम विभाग. त्यामुळे, 'आपले कोणीही काही वाकडे करू शकत नाही,' अशा अविर्भावात कंत्राटदार वागत आहेत. दुसरीकडे, श्रीरामपूर ग्रामपंचायतही रस्त्यावरील अतिक्रमणाकडे आणि त्यामुळे होणाऱ्या घाणीकडे दुर्लक्ष करत आहे. या अतिक्रमणामुळेही पाणी तुंबून व्यापाऱ्यांचे नुकसान होत आहे. सर्वच यंत्रणांनी डोळेझाक केल्याने, येथे 'हम करे सो कायदा' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

## पोडसा येथे मनोरंजन क्लबच्या नावाखाली जुगार अड्डा

**चंद्रपूर :** गोंडपिपरी तालुक्यातील पोडसा येथील मनोरंजन क्लबच्या नावाखाली सुरू असलेल्या अनधिकृत जुगार व्यवसायावर स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर आणि उप पोलीस स्टेशन लाठी यांच्या संयुक्त पथकाने धाड टाकून कारवाई केली. या कारवाईत जुगार साहित्य आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली असून, चालक, संयोजक आणि जुगार खेळणाऱ्या व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आज शनिवारी प्राप्त गोपनीय माहितीनुसार, स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूरचे पथक आणि उप पोलीस स्टेशन लाठी येथील अधिकारी व अंमलदारांनी पोडसा येथील राजीव समाधान मल्टीपरपज सोसायटी, हिरापूर ता. कोरपना जि. चंद्रपूर शाखा पोडसा (रजि. नं. एफ-००१४८११) या सार्वजनिक ठिकाणी कार्यरत मनोरंजन क्लबवर छापा टाकला.

## आ. खरात यांना बहिणींनी बांधले रक्षासूत्र



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मेहकर , दि. ९ :** मेहकर मतदारसंघातील लोकप्रिय आमदार सिद्धार्थ खरात यांच्या घरी राखी पौर्णिमेनिमित्त बहिणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला. पवित्र रक्षा बंधनाचा सण साजरा करण्यासाठी शिवसेना महिला आघाडी तालुका अध्यक्ष तारामती जायभाये, काँग्रेसच्या आरती देशमुख, जयाताई गायकवाड ,लता मोरे,मीना मोरे,साधना अवसरमोल,आशा भारशंकर, सुजाता अवसरमोल,जया भारशंकर,इंदु पाईकराव, सुनीता साळवे, कुसुम मोरे,पंचशीला अवसरमोल,रेखा भारशंकर (पिंपळनेर ता.लोणार)यांच्यासह अनेक महिलांनी आमदारांच्या निवासस्थानी हजेरी लावली. सर्वांनी प्रेमाने राखी बांधत, ''उद्धव साहेब पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत आणि आमचा लाडका भाऊ मंत्री व्हावा'' अशी सदिच्छा व्यक्त केली.

अल्पावधीतच मतदारसंघात भक्कम स्थान निर्माण करत जनतेच्या मनात घर करणारे, शांत, संयमी व उच्च शिक्षित अशा प्रतिमेचे आमदार खरात हे महिलांच्या दृष्टीने 'लाडका भाऊ' ठरले आहेत. या निमित्ताने बोलताना ते म्हणाले, ''मतदारसंघातील सर्व बहिणी माझी ताकद आहेत. निवडणुकीत तुम्ही दिलेली साथ मी कधीही विसरणार नाही. अडीअडचणीच्या काळात हा भाऊ नेहमी तुमच्या पाठीशी असेल.

## अंढेरा येथे दमदार पावसाने बळीराजा सुखावला

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अंढेरा , दि. ९ :** अंढेरा येथे शुक्रवारला रात्री बारा वाजेपासून दमदार पावसाची बॅटिंग सुरू झाली ती शनिवारी दुपारपर्यंत सुरू होती.या दमदार पावसामुळे बळीराजा सुखावला असुन ऐन पिके पाण्यावर आली असताना पावसाने हजेरी लावल्याने बळीराजा सुखावला आहे.यावर्षी जून महिन्यामध्ये तुरळक पाऊस पडला या तुरळक पावसाच्या भरोशावर उशिरा का होईना शेतकऱ्यांनी सोयाबीन,कपाशी,मका,तुर या पिकांची पेरणी केली.

याच पावसाच्या भरोशावर पिके बहरली परंतु दोन-चार दिवस कडक ऊन पडल्यामुळे हलक्या जमिनीवरील पिके सुकायला लागली होती.काही शेतकऱ्यांनी तर तुषार सिंचन वर पाणी देण्यास सुरुवातही केली होती.परंतु शुक्रवारी रात्री बारा वाजेपासून दमदार पावसाला सुरुवात झाली ती शनिवारी दुपारपर्यंत कायम होती. चहुकडे पाऊसच पाऊस झाला असल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण बघायला मिळाले. एक-दोन दिवस पाऊस आला नसता तर सोयाबीन पिकाला चांगलाच फटका बसला असता पहिलेच हुमनी आळीमुळे बऱ्याच शेतकऱ्यांची सोयाबीन हातातुन गेली असुन या झालेल्या पाऊसामुळे शेतकरी आनंदी झाला आहे.



### शेतकऱ्यांनी आपली काळजी घ्यावी

अंढेरा सह परिसरात पावसाने दमदार हजेरी लावली असुन शेतकरी बांधवांनी आपली गाय,बैल,म्हैस ही जनावरे सुरक्षित झाडाखाली न बांधता सुरक्षित ठिकाणी गोठ्यातच बांधावी तसेच शेतकऱ्यांनी सुरक्षित ठिकाणी थांबावे.दमदार पावसामुळे नदीला पूर आल्यास पुलावरुन पाणी असल्यास नागरिकांनी आपली वाहने मोटरसायकल तसेच फोर व्हीलर नेऊ नये असे आवाहन सिंदखेड राजा मतदार संघाचे आमदार मनोजभाऊ कायंदे यांनी केले आहे.

**कारवाई** | केंद्राच्या माध्यमातून ग्राहकांची आर्थिक लूट सुरू

# आपले सरकार : निर्धारित जागेवर केंद्र नसल्यास थेट कारवाई!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**वाशिम , दि. ९ :** आपले सरकार सेवा केंद्राच्या माध्यमातून गावातूनच शासकीय सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. यासोबतच या केंद्राच्या माध्यमातून ग्राहकांची आर्थिक लूट सुरू झाली आहे. काही केंद्र चालकांनी तर आपले सरकार सेवा केंद्र मूळ जागा सोडून इतरत्र हलविले आहे. या केंद्रात अनेक ठिकाणी असुविधाच पाहायला मिळत आहेत. अशा केंद्रांवर महाआयटी विभागाच्या माध्यमातून थेट कारवाई केली जाणार आहे. त्यामध्ये ऑनलाइन सेवा मान्यतेचा समावेश आहे.

आपले सरकार केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना प्रमाणपत्र, विविध प्रकारचे दाखले यासोबतच इतर सेवाही वाही पुरविल्या जातात. या सेवा पुरविताना काही केंद्रचालक अधिकचे पैसेही घेतात. अशा तक्रारींची संख्या वाढत आहे.




आपले सरकार सेवा केंद्रात जन्म, मृत्यू दाखले, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, जमिनीचे उतारे, सातबारा, आठ-अ आदी शासकीय योजनांसाठी अर्ज दाखल करता येतात. या केंद्रामध्ये सुधारित दर फलक, पिण्याचे पाणी, नागरिकांना बसण्याची व्यवस्था, सीसीटीव्ही, डिजिटल पेमेंट इत्यादी सुविधा असणे आवश्यक आहे.

आपले सरकार सेवा केंद्रामध्ये नागरिकांना मिळणारी सौजन्यपूर्ण वागणूक, डिजिटल पेमेंटला प्राधान्य दिले जाते का, ज्या ठिकाणी केंद्राला मंजुरी देण्यात आली, त्या ठिकाणी केंद्र सुरू आहे का, विविध दाखल्यांचे सुधारित दरफलक केंद्रात लावण्यात आले काय, ज्यांच्या नावे केंद्र मंजूर आहे ती व्यक्तीच केंद्र चालवीत आहे का, केंद्रात पिण्याचे पाणी, बसण्याची व्यवस्था या बाबींची पडताळणी करुन आपले सरकार सेवा केंद्रांचे मूल्यमापन केले जात आहे.

जिल्ह्यात काही ठिकाणी आपले सरकार सेवा केंद्र नियोजित ठिकाणी कार्यरत नसून, दुसऱ्याच ठिकाणी चालविण्यात येते. काही ठिकाणी निर्धारित दरापेक्षा अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत असल्याच्या तक्रारी आहेत. जिल्ह्यातील सातही तालुक्यात जवळपास ७११ आपले सरकार सेवा केंद्र आहेत. त्यासाठी केंद्रांना कुठल्या बाबी असाव्यात, यासंदर्भात प्रशासनामार्फत सूचना देण्यात आल्या आहेत.

■ जिल्ह्यातील आपले सरकार सेवा केंद्रांची संख्या दुप्पट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.त्याअनुषंगाने जिल्हा प्रशासनाने १९ ऑगस्टपर्यंत नव्याने अर्ज मागविले आहेत.

गतवर्षी सेवा केंद्राची मान्यता ज्या ठिकाणी आहे. तेथे सेवा केंद्र न चालविता दुसऱ्याच ठिकाणी चालविणाऱ्या २३ सेवा केंद्र चालकांचे परवाने रद्द करण्यात आली आहेत; तर ज्या सेवा केंद्र चालकांनी मान्यता घेतली मात्र कुठलेही ट्रान्झेशनच केले नाही. अशा ७३ केंद्र चालकांवर कारवाई करण्यात आली होती.


# बेजबाबदार मालकासह नगर परिषदेवर हत्येचा गुन्हा दाखल करा

## छगन शेडमाके : आरमोरी येथील इमारत दुर्घटना प्रकरण

### काँग्रेससह विविध पक्षांची मागणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**गडचिरोली, दि. ९ :** आरमोरी येथे जुनी इमारत कोसळून तीन जणांचा मृत्यू झाल्याच्या दुर्घटनेला सर्वस्वी बेजबाबदार इमारत मालक आणि नगर परिषद प्रशासन जबाबदार असल्याचा आरोप करत, त्यांच्यावर हत्येचे गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी काँग्रेस नेते छगन शेडमाके यांनी केली आहे. शेतकरी कामगार पक्ष आणि आझाद समाज पक्षानेही हीच मागणी उचलून धरल्याने, या प्रकरणाला आता राजकीय वळण लागले आहे.



आरमोरी येथे इमारत कोसळून तीन जणांचा मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले. ही इमारत मोडकळीस आल्याची कल्पना असूनही, मालकाने आणि नगर परिषद प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याने निष्पाप लोकांचा बळी गेला, असा आरोप छगन शेडमाके यांनी केला आहे. 'आरमोरी शहरात अनेक धोकादायक इमारती आहेत, पण त्याकडे लक्ष देण्याऐवजी नगर परिषद प्रशासन केवळ गृहकर वाढविण्यावर भर देत आहे,' असेही ते म्हणाले. शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई रामदास जराते, भाई श्यामसुंदर उराडे, जयश्री जराते आणि आझाद समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष राज बनसोड, धर्मानंद मेश्राम, विनोद मडावी यांनीही या दुर्घटनेला प्रशासनाला जबाबदार धरले आहे. याप्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करून, मृत आणि जखमींच्या कुटुंबीयांना तत्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी या सर्व नेत्यांनी केली आहे. या मागणीमुळे आता जिल्हा प्रशासन इमारत मालक आणि नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महत्वाचे

## डेव्हॉन कॉनवेचा शतकी धमाका!



**मुंबई :** न्यूझीलंडचा स्टार सलामीवीर डेव्हॉन कॉनवेने शुक्रवारी झिम्बाब्वेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात दमदार खेळी करत दोन खास पल्ले गाठले. त्याने २४५ चेंडूत १८ चौकारांसह १५३ धावांची खणखणीत खेळी केली. यासह त्याने कसोटी क्रिकेटमध्ये २,००० धावा आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ५,००० धावांचा टप्पा गाठला.कॉनवेचे हे सुमारे दोन वर्षांनंतरचे पहिले कसोटी शतक आहे. यापूर्वी त्याने जानेवारी २०२३ मध्ये पाकिस्तानविरुद्ध शतक झळकावले होते. कॉनवेने २९ कसोटी सामन्यांत ३९.२६ च्या सरासरीने २,०८१ धावा केल्या असून, त्यात पाच शतके आणि १२ अर्धशतकांचा समावेश आहे. त्याची सर्वोत्तम धावसंख्या २०० आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर ११९ सामन्यांत त्याने ४०.४३ च्या सरासरीने ५,०५४ धावा केल्या,

# शुबमन गिलच्या जर्सीवर लागली सर्वात मोठी बोली

**मुंबई : दि.९ प्रतिनिधी**

रोहित शर्माने कसोटी क्रिकेटला रामराम केल्यानंतर कर्णधारपदाची जागा रिकामी होती. ही जागा भरून काढण्याची जबाबदारी युवा फलंदाज शुबमन गिलकडे सोपवण्यात आली. इंग्लंड दौऱ्यावर तो भारतीय संघाचं नेतृत्व करताना दिसून आला. त्याच्या नेतृत्वाखाली खेळताना भारतीय संघाने पाच कसोटी सामन्यांची मालिका २-२ ने बरोबरीत समाप्त केली. केवळ कर्णधार म्हणून नाही तर फलंदाज म्हणूनही गिल इंग्लंडमध्ये चमकला. चार शतकांसह तो या मालिकेत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. मालिकेतील दहा डावात त्याने ७५४ धावा केल्या.

मैदानावर चमकणारा गिल मैदानाबाहेरही तुफान चर्चेत आहे. इंग्लंडमध्ये एका चॅरिटी ऑक्शनमध्ये गिलची जर्सी बोली लावण्यासाठी ठेवण्यात आली होती. ही जर्सी खरेदी करण्यासाठी क्रिकेट चाहत्यांमध्ये चांगलीच स्पर्धा रंगली.इंग्लंडमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या चॅरिटी ऑक्शनमध्ये गिलसह, जसप्रीत बुमराह , रवींद्र जडेजा, केएल राहुल आणि जो रूट यांची देखील जर्सी बोली लावण्यासाठी ठेवण्यात आली होती. पण सर्वाधिक भाव गिलच्या जर्सीने खाल्ला. गिलच्या जर्सीवर सर्वात मोठी बोली लागली. या जर्सीवर ५.४० लाखांची बोली लागली. ही तीच जर्सी आहे. तर जसप्रीत बुमराहच्या जर्सीवर ४.९४ लाख, रवींद्र जडेजाच्या जर्सीवर ४.९४ लाख, केएल राहुलच्या जर्सीवर ४.७१ लाख आणि जो रूटच्या जर्सीवर ४.७४ लाखांची बोली लागली.या ऑक्शनमधून मिळणारी रक्कम ही रूथ अँड स्ट्रॉस फाउंडेशनला दिली जाणार आहे. या फाउंडेशनद्वारे गरजू आणि जीवघेण्या आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना मदत केली जाते.




# अनाया बांगरने लिंगबदल शस्त्रक्रियेनंतर पहिल्यांदाच साजरे केले रक्षाबंधन

**मुंबई : दि.९ प्रतिनिधी**

आज सगळीकडेच बहिणी-भावांच्या अतूट बंधनाचा सण रक्षाबंधन साजरा केला जात आहे. या खास क्षणी अनाया बांगर हिने पहिल्यांदाच आपल्या भावाला राखी बांधली आहे. माजी भारतीय क्रिकेटपटू आणि प्रशिक्षक संजय बांगर यांची मुलगी अनया बांगर हिने लिंगबदल शस्त्रक्रिया केल्यानंतर धाकट्या भावाला राखी बांधली. याचे फोटो तिने शेअर केले आहेत.अनाया बांगर ही गेल्या काही दिवसांपासून चर्चे चा मोठा विषय ठरली आहे. भारताचे माजी क्रिकेटपटू आणि प्रशिक्षक राहिलेल्या संजय बांगर यांची ती मुलगी आहे. अनाया बांगर हिचं पूर्वीचं नाव आर्यन बांगर असं होतं. अनायाने लिंगबदल शस्त्रक्रिया केल्यानंतर आपलं नाव बदललं आहे.अनायाने यानंतर पहिल्यांदाच तिचा धाकटा भाऊ अथर्व बांगरला राखी बांधली.



## ३८ वी राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धा : क्रिशा जैन विजेता



**जळगाव :** शहरालगतच्या जैन हिल्सवरील अनुभूती मंडपम येथे सुरु असलेल्या ३८ व्या राष्ट्रीय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत देशभरातील ३९२ मुले आणि १७७ मुली सहभागी झाल्या होत्या. अखेरीच्या फेरीनंतर मुलींच्या गटात महाराष्ट्रातील क्रिशा जैन आणि मुलांच्या गटात दिल्लीतील आरित कपिल हे दोघे विजेते ठरले.विजेत्यांना जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, अखिल भारतीय बुद्धिबळ संघटनेचे सल्लागार तथा जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, अजितकुमार वर्मा, अखिल भारतीय बुद्धिबळ संघटनेचे सहव्यवस्थापकीय संचालक तथा जळगाव जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष अतुल जैन, ताजिकिस्तानचे ग्रँडमास्टर फारुक अमातोव, मुख्य ऑरबिटर देवाशीष बारुआ यांच्या हस्ते रोख रकमेची पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

# शाहीन आफ्रिदीची दमदार कामगिरी!

**मुंबई : दि.९ प्रतिनिधी**

पाकिस्तानचा संघ वनडे मालिका खेळण्यासाठी वेस्ट इंडिज दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका सुरू आहे. या सामन्यात पाकिस्तानचा वेगवान गोलंदाजी शाहीन आफ्रिदीने दमदार गोलंदाजी केली. पहिल्याच सामन्यात त्याने ५ गडी बाद करून भारतीय संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. ४ गडी बाद करताच त्याच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे.

या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या यजमान वेस्टइंडिजचा संपूर्ण डाव ४९ षटकात अवघ्या २८० धावांवर आटोपला. यादरम्यान पाकिस्तानच्या गोलंदाजांनी दमदार गोलंदाजी केली.




पाकिस्तानला हा सामना जिंकण्यासाठी २८१ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानने ४८.४ षटकात दिलेलं आव्हान पूर्ण केलं. यासह हा सामना ५ गडी राखून आपल्या नावावर केलाया सामन्यातील पहिल्या डावात गोलंदाजी करताना शाहीन आफ्रिदीने ८ षटक गोलंदाजी केली. यादरम्यान त्याने ५१ धावा खर्च केल्या आणि ४ गडी बाद केले. यासह वनडे क्रिकेटमध्ये त्याने आतापर्यंत ६५ सामन्यांमध्ये एकूण १३१ गडी बाद केले आहेत. यासह ६५ वनडे सामने खेळून सर्वाधिक गडी बाद करणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत शाहीन आफ्रिदी अव्वल स्थानी पोहोचला आहे.




**मुंबई : दि.९ प्रतिनिधी**

दिल्ली प्रीमियर लीग (डीपीएल) २०२५ च्या १२ व्या सामन्यात आउटर दिल्ली वॉरियर्सचा युवा फलंदाज प्रियांश आर्य याने ५६ चेंडूत ७ चौकार आणि ९ षटकारांसह १११ धावांची शानदार खेळी करत डीपीएलमध्ये अनेक शतके झळकावणारा पहिला फलंदाज ठरला.

ईस्ट दिल्ली रायडर्सविरुद्ध सलामीला फलंदाजी करताना त्याने ५२ चेंडूत शतक पूर्ण केले. मात्र, त्याच्या या खेळीवर ईस्ट दिल्ली रायडर्सने पाणी फेरले. त्यांनी४ चेंडू राखून २३१ धावांचा पाठलाग करत डीपीएलच्या इतिहासातील सर्वात मोठा विजय मिळवला. साउथ दिल्ली सुपरस्टार्सपासून वेगळे झाल्यानंतर प्रियांशने नव्या संघासाठी सुरुवातीच्या सामन्यांमध्ये २६, १६ आणि ८ धावा केल्या. पण ईस्ट दिल्लीविरुद्ध त्याने शानदार पुनरागमन करत शतक झळकावले.

आउटर दिल्लीची सुरुवात खराब झाली, सनत सांगवान लवकर बाद झाला.

त्यानंतर प्रियांशने करण गर्गसोबत ४६ चेंडूत ९२ धावांची भागीदारी करत संघाला सावरले.

१७ व्या षटकात त्याने शतक पूर्ण केले. त्याच्या खेळीच्या जोरावर आउटर दिल्लीने २० षटकात ७ बाद २३१ धावा उभारल्या. पण ईस्ट दिल्लीने हा डोंगराएवढा लक्ष्याचा पाठलाग करत सामना जिंकला.ईस्ट दिल्लीची सुरुवातही खराब झाली आणि संघ ५१ धावांत ३ बाद झाला.

पण अर्पित राणा आणि कर्णधार अनुज रावत यांनी चौथ्या गडीसाठी १३० धावांची शानदार भागीदारी करत सामन्याचा रंग पालटला.

अर्पित राणाने ४५ चेंडूत ८ चौकार आणि ४ षटकारांसह ७९ धावा केल्या, तर अनुज रावतने ३५ चेंडूत २ चौकार आणि ९ षटकारांसह ८४ धावांची तुफानी खेळी करत संघाला विजय मिळवून दिला.

> ■ २०२४ च्या घरेलू क्रिकेट हंगामात प्रियांशने ६७.५६ च्या सरासरीने आणि जवळपास २०० च्या स्फोटक स्ट्राइक रेटने ६०८ धावा काढल्या. या दमदार कामगिरीमुळे त्याने सर्वांचे लक्ष वेधले आणि २०२५ च्या आयपीएल मेगा लिलावात पंजाब किंग्सने त्याला संघात सामील केले. आयपीएल २०२५ मधील पदार्पणाच्या हंगामात त्याने १७ डावांत १७९.२५ च्या स्ट्राइक रेटने ४७५ धावा काढल्या. चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध १०३ धावांची शतकी खेळी आणि करिअरमधील सर्वोत्तम १४१ धावांची स्फोटक खेळी खेळत त्याने पंजाब किंग्सला अंतिम फेरीपर्यंत पोहोचवण्यात मोलाची भूमिका बजावली.

## आयर्लंडने पाकिस्तानच्या संघाला पाजले पाणी!

**मुंबई : दि.९ प्रतिनिधी**

पाकिस्तानचा महिला संघ आयलँड दौऱ्यावर होता. यामध्ये आयर्लंडच्या महिला संघाने पाकिस्तानच्या संघाला पराभूत करून मालिका नावावर केली आहे. या मालिकेमध्ये आयर्लंडच्या संघाने कौतुकास्पद कामगिरी केली. आयर्लंडच्या संघाने केलेल्या कामगिरीनंतर संपुर्ण जग चकित राहिले. आयर्लंड महिला संघाने पाकिस्तानला सलग दुसऱ्या टी-२० सामन्यात हरवले. बेलफास्ट येथील सिव्हिल सर्व्हिस क्रिकेट क्लब येथे झालेल्या या सामन्यात पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करत यजमानांना विजयासाठी १६९ धावांचे लक्ष्य ठेवले. धावांच्या या पाठलागात आयर्लंडने जोरदार झुंज दिली, संघाला शेवटच्या चेंडूवर ४ धावांची आवश्यकता होती, त्यानंतर सादिया इक्बालने षटकार मारून संघाला विजय मिळवून दिलाच, शिवाय मालिकेत २-० अशी अजिंक्य आघाडीही मिळवून दिली. आयर्लंडच्या संघाने पाकिस्तानला टी-२० मालिकेत पराभूत करण्याची ही सलग दुसरी वेळ आहे. त्याच वेळी, दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत खेळल्या गेलेल्या ५ मालिकांमध्ये आयर्लंडने तिसऱ्यांदा पाकिस्तानला पराभूत केले आहे.नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी केल्यानंतर, पाकिस्तानने निर्धारित २० षटकांत ६ गडी गमावून १६८ धावा केल्या. सर्व फलंदाजांनी संमिश्र योगदान दिले. शवाल झुल्फिकारने सर्वाधिक ३३ धावा काढल्या.

## मुकेश अंबानी यांनी सलग पाचव्या वर्षी घेतला शून्य पगार



रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड चे चेअरमन आणि आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्ती मुकेश अंबानी यांनी सलग पाचव्या वर्षी म्हणजेच आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्येही कसलाही पगार न घेण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती कंपनीच्या वार्षिक अहवालातून समोर आली आहे. अंबानी यांनी करोना महामारीच्या काळात पगार आणि इतर लाभ न घेण्याचा निर्णय स्वेच्छेने घेतला होता, जो त्यांनी पुढे कायम ठेवला आहे. ६७ वर्षीय अंबानी यांनी आर्थिक वर्ष २०२१ पासून कसलाही पगार घेतलेला नाही. आर्थिक वर्ष २००९ आणि २०२० या काळात त्यांनी वार्षीक पगार हा स्वेच्छेने १५ कोटी रुपये ठेवला होता.

अंबानी यांनी त्यांना मिळणारे वेतन जरी पूर्णपणे सोडून दिले असले तरी त्यांना मिळणारा (लाभांश) म्हणजेच कंपनीच्या भागधारकांना कंपनीला झालेल्या नफ्यातील वाटून मिळालेला भाग हा त्यांच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत राहिला आहे. अंबानी यांच्याकडे वैयक्तीकरित्या रिलायन्सचे १.१६ कोटी शेअर्स आहेत,

# ट्रम्प कर-धक्क्याने विकासदर ६ टक्क्यांपर्यंत आक्रसण्याची भीती

**नवी दिल्ली, दि.९ प्रतिनिधी**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या घोषणेप्रमणे येत्या २७ ऑगस्टपासून ५० टक्के कर लागू झाल्यास भारताचे सकल देशांतर्गत उत्पादनातील (जीडीपी) वाढ सुमारे ३० आधारबिंदूंनी आकुंचन पावत ६ टक्क्यांपर्यंत कमी होण्याची शक्यता मूडीज रेटिंग्जने शुक्रवारी व्यक्त केली.

अमेरिकेकडून तूर्तास २५ टक्के आयातशुल्क लादले गेले असले तरी देशांतर्गत दमदार मागणी आणि सेवा क्षेत्राची ताकद भारतीय अर्थव्यवस्थेवरील ताण कमी करेल, असे मूडीजने म्हटले आहे. अमेरिकेच्या वाढीव आयात शुल्कामुळे विकासदर, महागाई आणि बाह्य स्थितीवर निश्चितच परिणाम होईल, असे त्यांनी सांगितले.अमेरिकेने सर्व भारतीय आयातीवर ६ ऑगस्टपासून २५ टक्के आयात कर लागू केला, या व्यतिरिक्त २५ टक्के असा एकूण कर ५० टक्क्यांपर्यंत कर वाढविला जाणार आहे. भारताने रशियाकडून खनिज तेल आयात सुरूच ठेवल्याने त्यावर दंडात्मक कारवाई करत असल्याचे अमेरिकेने म्हटले आहे. याचा परिणाम म्हणून २०२५-२६ मध्ये देशाचा विकासदर ०.३ टक्के कमी होऊन ६.३ टक्क्यांवरून ६ टक्क्यांपर्यंत घसरण्याची शक्यता मूडीजने व्यक्त केली आहे.भारत आणि अमेरिकेमध्ये मार्चपासून व्यापार करारावर वाटाघाटी सुरू आहेत. ज्याचा उद्देश २०३० पर्यंत वस्तू आणि सेवांचा द्विपक्षीय व्यापार सध्याच्या १९१ अब्ज डॉलरवरून ५०० अब्ज डॉलरपर्यंत करणे असा आहे. आतापर्यंत, चर्चेच्या पाच फ ेऱ्या पूर्ण झाल्या असल्या तरी सहमती होऊ शकलेली नाही. सहाव्या फेरीसाठी, अमेरिकी शिष्टमंडळ २५ ऑगस्टपासून भारत दौऱ्यावर येत आहेत. या वर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबरपर्यंत कराराचा पहिला टप्पा पूर्ण करण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. वर्ष २०२२ पासून, भारताने रशियाकडून स्वस्त दरात खनिज तेलाची आयात वाढविल्यामुळे, एकूण तेल आयात खर्च घटण्यासह, त्याचा महागाईला रोखणारा परिणामही दिसला आहे. शिवाय चालू खात्यावरील तूट देखील कमी झाली आहे, असे मूडीजने म्हटले आहे. रशियन तेलाच्या सर्वात मोठ्या खरेदीदारांपैकी भारत एक आहे. रशियन तेलाची आयात २०२१ मधील २.८ अब्ज डॉलरवरून, २०२४ मध्ये ५६.८ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे.



## आयटी क्षेत्राला घरघर! एआयशी निगडित ट्रेंडची सुरुवात

# तब्बल पाच लाख कर्मचारी नोकऱ्या गमाविणार?

**नवी दिल्ली, दि.९ प्रतिनिधी**

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीची कंपनी असलेल्या टीसीएसने सुमारे २८३ अब्ज डॉलरचा महसूल असलेल्या आयटी क्षेत्रात मोठ्या बदलांचे संकेत दिले आहेत. कृत्रिम प्रज्ञा अर्थात एआय-चालित परिवर्तनामुळे आयटी क्षेत्रात अनेक सुधारणा होत आहेत.

टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसने १२,००० हून अधिक नोकऱ्या कमी करण्याचा निर्णय घेतल्याने एआयशी निगडित ट्रेंडची सुरुवात झाली आहे, ज्यामुळे पुढील दोन ते तीन वर्षांत २८३ अब्ज डॉलरच्या क्षेत्रातून सुमारे पाच लाख नोकऱ्या कमी होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. एआय-संबंधित कामांचे वाढते कार्यादेश आणि त्यातुलनेत कर्मचाऱ्यांमधील कौशल्य विसंगतीमुळे टीसीएसने २ टक्के कर्मचाऱ्यांना कमी करण्याचा निर्णय घेतला. ही खासगी क्षेत्रातील कंपनीकडून करण्यात येणार मोठी कर्मचारी कपात आहे. यामुळे टीसीएसमधील सुमारे १२,२०० मध्यम आणि वरिष्ठ श्रेणीतील कर्मचारी नोकऱ्या गमावतील. भारतात मध्यमवर्ग निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या या उद्योगात मूलभूत कोडिंगपासून ते मॅन्युअल चाचणी आणि ग्राहक समर्थनापर्यंत सर्व गोष्टींसाठी एआयचा वापर वाढत्या प्रमाणात होत आहे.मार्च २०२५ पर्यंत या क्षेत्राकडून ५६.७० लाखांहून अधिक लोकांना रोजगार मिळाला आणि भारताच्या जीडीपीमध्ये आयटी क्षेत्राचा ७ टक्क्यांहून अधिक वाटा आहे. जगातील पाचव्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नोकऱ्या निर्माण करणारे मोठे क्षेत्र असल्याने त्याचा इतर क्षेत्रांवर होणार परिणाम मोठा आहे.ऐतिहासिकदृष्ट्या, भारतातील बहुतेक अभियंत्यांना तंत्रज्ञानाने सामावून घेतले आहे, परंतु वाढत्या एआय वापरामुळे अधिक कार्यक्षमता निर्माण होत असल्याने आणि सध्याच्या अनेक कर्मचाऱ्यांनी ते नवीन कौशल्यांची आत्मसात केले नसल्याने बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळत आहे.




■ टीसीएस, इन्फोसिस, एचसीएलटेक, टेक महिंद्र, विप्रो, एलटीआयमाइंड्ट्री आणि कॉग्निझंट एकत्रितपणे १३ ते २५ वर्षांचा अनुभव असलेल्या ४,३०,००० हून अधिक कामगारांना रोजगार देतात, असे स्टाफिंग फर्म एक्सफेनो सांगितले.

# नवीन अमेरिकन व्हिसा संबंधित नियम बदलले

**नवी दिल्ली, दि.९ प्रतिनिधी**



अमेरिकन व्हिसा पासपोर्टच्या संकलन प्रक्रियेत मोठा बदल करण्यात आला आहे. नवी दिल्लीतील अमेरिकन दूतावासाने माहिती दिली आहे की १ ऑगस्ट २०२५ पासून कोणताही व्हिसा अर्जदार कोणत्याही तिसऱ्या व्यक्ती किंवा प्रतिनिधीमार्फत त्यांचा पासपोर्ट किंवा कागदपत्रे गोळा करू शकणार नाही. आता सर्व अर्जदारांना त्यांचे कागदपत्रे स्वतः गोळा करावी लागतील.मुलांसाठी एक विशेष तरतूद आहे की १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या अर्जदारांचे पासपोर्ट फक्त त्यांचे पालक किंवा कायदेशीर पालकच घेऊ शकतात, परंतु त्यासाठी दोन्ही पालकांनी स्वाक्षरी केलेले मूळ संमती पत्र आणणे आवश्यक असेल. स्कॅन केलेले किंवा ईमेलद्वारे पाठवलेले संमती पत्र स्वीकारले जाणार नाहीत. जे लोक स्वतः येऊन पासपोर्ट घेऊ शकत नाहीत त्यांच्यासाठी दूतावासाने ₹१,२०० शुल्क आकारून घरपोच किंवा ऑफिस डिलिव्हरीचा पर्याय देखील सुरू केला आहे. तुमच्या प्रोफाइलवर ऑनलाइन जाऊन हे सेट करता येते.

## महत्वाचे

### 'हर घर तिरंगा' अभियान राबवा

**नागपूर :** केंद्र सरकारच्या सूचनेप्रमाणे जिल्ह्यात देशभक्तीचे तिरंगामय वातावरण व्हावे, या उद्देशाने १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत 'हर घर तिरंगा'अभियान यशस्वी करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिले. 'हर घर तिरंगा' अभियानाचा आढावा घेताना त्यांनी जिल्हा प्रशासनातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना संबोधित केले. जिल्ह्यात मागील तीन वर्षांपासून 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येत आहे यावर्षी अभियान तीन टप्प्यात राबविण्यात येत आहे. या अभियानानंतर्गत दुसरा टप्पा ९ ते १२ ऑगस्ट आणि तिसरा टप्पा १३ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. शासनाच्या निर्देशाप्रमाणे सर्व संबंधित विभागाने अभियानाची अंमलबजावणी करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. इटनकर यांनी केल्या. यावेळी सर्व संबंधित विभागाचे अधिकारी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

### रोजगार मेळावा बुधवारी

**नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील उमेदवारांना रोजगाराच्या रांधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नागपूर, मॉडेल करिअर रॉटर नागपूर, नूतन आदर्श कला, वाणिज्य आणि श्रीमती म.ह. वेगड विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने १३ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे हा मेळावा नूतन आदर्श कला, वाणिज्य आणि श्रीमती ग.ह. वेगड विज्ञान महाविद्यालय हिरव्या तलावाजवळ, मंगळवारी पेठ उमरेड जि. नागपूर येथे होत आहे. मेळाव्यात आठपेक्षा जास्त कंपन्यामार्फत ३५० पेक्षा जास्त जागांसाठी दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर, आटीआय, डिप्लोमा इत्यादी पात्राताधारक उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेवून उमेदवारांची निवड केली जाणार आहे. सोबतच राष्ट्रीय स्तरावरील रोजगारांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे जास्तीत जास्त उमेदवारांनी रोजगार मेळाव्यामध्ये उपस्थित राहून रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त सुनंदा बजाज यांनी केले आहे.

### रानभाजी महोत्सव उद्या

**नागपूर :** जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवाचे आयोजन ११ ऑगस्ट रोजी दुपारी बारा वाजता रामनगर मैदान येथे करण्यात आले आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते उद्घाटन पार पडणार आहे. कार्यक्रमाला वित्त व नियोजन राज्यमंत्री आशीष जयस्वाल, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी विभागीय कृषी सहसंचालक नागपूर विभाग उमेश घाटगे, प्रकल्प संचालक आत्मा डॉ. अर्चना कडू, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रविंद्र मनोहरे आदी उपस्थित राहणार आहेत. नागरिकांनी रानभाजी महोत्सवाला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## युद्धांतील शूरवीरांची साकारणार वीरगाथा

### संरक्षण विभागाकडून प्रशासकीय मान्यता, टेकडी रोडवर घेता येणार शौर्याचा अनुभव

नागपूर, दि. ९ प्रतिनिधी

**महानगरपालिकाच्या अमृत महोत्सवानिमित्त स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या चार प्रमुख युद्धात प्राणांची आहुती देणाऱ्या तसेच शौर्य गाजविणाऱ्या शूरवीरांची वीरगाथा साकारणारे युद्ध स्मारक टेकडी रोडवरील संरक्षण विभागाच्या जागेवर उभारण्याच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.**



या युद्ध स्मारकामध्ये सन १९६२ मधील चीनसोबतचे युद्ध, सन १९६५ चे पाकिस्तानसोबतचे युद्ध, सन १९७१ मधील बांगलादेशाशी युद्ध आणि १९९९ मधील पाकिस्ताने घडवून आणलेलया कारगिल युद्धातील वीरांची गाथा साकारण्यात येणार आहे. सध्याच्या आणि भावी पिढीला देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या विरांच्या शौर्याची माहिती व्हावी, त्यांना देशभक्तीची प्रेरणा मिळावी, या हेतूने महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी पुढाकार घेतला आहे. अभिनव अशा युद्ध स्मारकाला संरक्षण विभागाने विनामूल्य भूखंड देण्यास सहमती दर्शविली आहे. 'नागपूर २०२५' या स्वयंसेवी संस्थेने युद्ध स्मारकाची डिझाईन करण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेला दिला आहे. संस्थेच्या प्रमुख आर्किटेक्टसौम्या पांडे यांनी विनामूल्य सेवा देण्याची तयारी दर्शविली आहे. डॉ. अभिजीत चौधरी यांनी यासंदर्भात संरक्षण विभागाचे मेजर जनरल एस. के. विद्यार्थी यांच्याशी पत्रव्यवहार केला. यानंतर या अभिनव प्रकल्पासाठी महानगरपालिकाला २९ हजार चौरस फूट जागा देण्यास संरक्षण विभागाने सहमती दर्शविली आहे. संरक्षण विभागाचे या संदर्भातील 'ना हरकत पत्र'ही प्राप्त झाले आहे. नव्या पिढीला प्रेरणादायी स्वातंत्र्यानंतर देशाने चार प्रमुख युद्ध लढले आहेत. यात चीन युद्ध (१९६२), पाकिस्तान युद्ध (१९६५), बांगलादेश युद्ध (१९७१) व कारगिल युद्धाचा (१९९९) समावेश आहे. या चारही युद्धात अनेक शूरवीरांनी बलिदान देत भारत माताचे रक्षण केले आहे. तसेच, अनेक वीरांनी आपल्या शौर्याने शत्रू राष्ट्राला धडा शिकविला आहे. या युद्धात देशाच्या वीर जवानांनी केलेल्या पराक्रमाची गाथा नव्या पिढीला माहित व्हावी, या प्रमुख उद्देशाने युद्ध स्मारक साकारले जाणार आहे. युद्ध स्मारकातील दृष्ये व माहिती नागरिकांना सहज दिसू शकेल, या पद्धतीने स्मारकाची रचना करावी, युद्ध स्मारक मुले तसेच तरुणांना देशासाठी शौर्य गाजविण्याची प्रेरणा मिळावी, तसेच स्मारकात सार्वजनिक हित तसेच जनतेच्या भावना दुखावणार नाही, याची काळजी स्मारकाचे डिझाईन तयार करताना घ्यावी, असे निर्देश स्वयंसेवी संस्थेला दिले आहे.

#### दहा कोटींचा निधी

**युद्ध स्मारकासाठी नागपूर महानगरपालिकाने १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यास तयारी दर्शविली आहे. यासंदर्भात दोन सामंजस्य करार होणार असून, जागेबाबत नागपूर महानगरपालिका व संरक्षण विभागांमध्ये करार होईल दुसरा सामंजस्य करार 'नागपूर २०२५' संस्थेशी करण्यात येईल. यासंदर्भातील प्रक्रिया प्रशासकीय पातळीवर सुरू आहे.**

## महिलेवर प्राणघातक हल्ला

**खापरखेडा, दि. ९:** बायकोला सोडचिठ्ठी दिल्यानंतर दुसऱ्या लग्नास नकार देणाऱ्या प्रेयसीच्या गळ्यावर प्रियकराने चाकूने गंभीर वार केले ही घटना खापरखेडा पोलिस ठाणे हद्दीतील गुमथी गावात घडली आहे. गंभीर जखमीवर खासगी रुग्णालयात उपचार असल्याची माहिती आहे. सदर तरुणी आणि प्रियकर रोशन सोनेकर एकाच गावातील असून, त्यांच्यात प्रेमसंबंध होते. दरम्यान रोशनचे अन्य मुलीशी लग्न पार पडले लग्नानंतर रोशनच्या बायकोला प्रत्यक्ष भेटून मी रोशनसोबत लग्न करणार असल्याचे तिने सांगितले होते. यानंतर रोशनने बायकोशी २०२३ मध्ये सोडचिठ्ठी घेतली. मात्र, तरुणीने प्रियकरासोबत लग्न करण्यास स्पष्ट नकार दिला. यावेळी तिने रोशनवर विनयभंगाची तक्रार नोंदविली होती. बायकोसोबत सोडचिठ्ठी घेण्यास भाग पाडले, नंतर लग्नास नकार दिला, ठाण्यात गुन्हाही दाखल केला, या सर्व प्रकारामुळे रोशन प्रेयसीवर संतापला होता. याच रागातून त्याने एका मंदिरात प्रेयसीच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार करून तिला गंभीर जखमी केल्याचे सांगण्यात येते.

## रामटेक तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील कामांना प्राधान्य द्या

### वित्त राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांचे निर्देश

नागपूर, दि. ९ प्रतिनिधी

रामटेक तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील कामांना प्राधान्याने वेळेत पूर्ण करण्यावे, असे निर्देश वित्त राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांनी दिले आहे. रामटेक तिर्थक्षेत्र विकास आराखड्यातील (टप्पा-दोन) कामांना गती देण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते.



विदर्भातील पर्यटन आणि तीर्थक्षेत्रात रामटेकचे अनन्य साधारण महत्त्व आहे स्थानिकांना रोजगार निर्मितीची विविध संसाधने उपलब्ध होण्यासाठी रामटेक तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार केला असून, रोप-वे, सुविधायुक्त यात्री निवास, स्थानिक उत्पादनांना प्राधान्य देणारी गडमंदिर परिसरात नियोजनबद्ध दुकानांची गाळे, भव्य पार्किंग आदींचा यात समावेश आहे कामांना काही निधी उपलब्ध करून दिल्याचेही मंत्र्यांनी सांगितले. वनविभाग, राष्ट्रीय महामार्ग विभाग, राज्य व केंद्र शासनाचे पुरातत्व विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी परस्पर समन्वयातून तत्काळ संबंधित कामांना प्राधान्याने गती द्यावे, असेही त्यांनी सूचित केले पर्यटन विकासाच्या दृष्टीने रामटेक येथे पूर्ण क्षमता आहेत. श्री चक्रधर स्वामी मंदिर, श्रीराम मंदिर, अंबाडा तलाव, शांतीनाथ जैन मंदिर, खिंडसी तलाव आदी नैसर्गिक साधनसंपती विपुल प्रमाणात आहे. सर्व क्षेत्राच्या विकासासाठी नियोजनबद्ध एकत्रित विकास आराखडा तयार आहे ज्या कामांना शासकीय निधी उपलब्ध आहे, अशा कामात कोणत्याही परिस्थितीत दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## गणेशोत्सवानिमीत्त आढावा बैठक

**नागपूर, दि. ९ :** पुढील काही दिवसांत गणेशोत्सव सुरू होणार असून, या उत्सवाबाबत नागपूर पोलिस दलाच्या वतीने महत्त्वाची बैठक पार पडली. पोलिस आयुक्त रविंद्र कुमार सिंगल बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. यंदा गणेशोत्सव शांततेत, आनंदी आणि पर्यावरणपूरक वातावरणात पार पडावा यासाठी उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली मागील वर्षातील उणिवा आणि अडचणी लक्षात घेत यंदाच्या उत्सवात त्या पुन्हा उद्भवू नयेत यासाठी संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. बैठकीत सहपोलिस आयुक्त, महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी, विविध पोलिस विभागांचे अपर आयुक्त, अग्निशमन विभाग, परिवहन विभाग, नॅशनल हाय-वे अथॉरिटी ऑफ इंडिया, विद्युत विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## अल्पसंख्याक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेवर चर्चा

### समित्या स्थापन करण्याचे निर्देश

नागपूर, दि. ९ प्रतिनिधी

अल्पसंख्याक शाळांचे संस्थाचालक, मुख्याध्यापक व संबंधित अधिकाऱ्यांची विशेष बैठकीत शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली समित्या स्थापन करण्यात याव्यात संबंधित शासन निर्णयाची अंमलबजावणी लवकरात लवकर करण्याचे निर्देश आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी दिले

शासन निर्णयानुसार प्रत्येक शाळेत शाळा व्यवस्थापन समिती, महिला तक्रार निवारण समिती, विद्यार्थी सुरक्षा समिती व भौतिक सुविधा विकसन समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. शाळा व्यवस्थापनात पारदर्शकता आणण्यासाठी आणि गैरप्रकार रोखण्यासाठी समित्या अत्यावश्यक आहेत. विद्यार्थ्यांची सुरक्षा ही कोणत्याही शाळेची प्राथमिक जबाबदारी आहे. सात दिवसांच्या आत सर्व अल्पसंख्याक शाळांनी आवश्यक समित्यांची स्थापना करून अहवाल शालेय शिक्षण विभागाला सादर करावा, अन्यथा कारवाई करण्यात येईल, असे श्री. खान म्हणाले. बैठकीत अनेक मुख्याध्यापकांनी शाळा संचालन, परीक्षा अडचणी, आणि भाषिक अल्पसंख्यांक शाळांसाठी निधीची मागणी मांडली. मुख्याध्यापकांनी मांडलेले प्रश्न योग्य आहेत. मी स्वत: मुख्यमंत्री व शिक्षण मंत्र्यांशी चर्चा करून निधी व धोरणात्मक अडचणी दूर करण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे श्री. खान म्हणाले. बैठकीला निखिल भोयर शिक्षणाधिकारी माध्यमिक, उपजिल्हाधिकारी सचिन गोसावी, अधीक्षक सचिन नाथ, शालेय शिक्षण विभागाचे जिल्हा बाल रक्षक समन्वयक प्रसनजीत गायकवाड, राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अधिकारी मुश्ताक पठाण, गणेश सुरवसे आदी उपस्थित होते. दरम्यान, अल्पसंख्याक आयोगातर्फे प्रलंबित तक्रारींवर सुनावणी घेण्यात आली. विदर्भातील अनेक प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष निर्णय देण्यात आले.

## 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत उपक्रम

नागपूर, दि. ९ प्रतिनिधी

महानगरपालिकाचे अमृत महोत्सवी वर्ष आणि 'हर घर तिरंगा'अभियानाअंतर्गत नागपूर शहरात विविध कार्यक्रम आयोजित केले आहे. स्वातंत्र्यदिनापर्यंत शहरातील विविध भागांमध्ये कार्यक्रम होणार आहेत.

विशेष अभियानात विवेकानंद स्मारक, अंबाझरी, सक्करदरा उड्डाणपुल, संविधान चौक, विविध उद्याने, फ्रिडम पार्क गार्डन, सुरेश भट सभागृह, मनपा इमारती, यशवंत स्टेडियम, मेट्रो, सिव्हिल लाईन, विधान भवन अशा सार्वजनिक ठिकाणी तिरंगा प्रकाश योजना व आकर्षक अशी सजावट करण्यात येणार आहे. याशिवाय घरोघरी तिरंगा उपलब्ध होण्यासाठी मनपाचे सर्व झोन कार्यालयात बचत गटाच्या माध्यमातून तिरंगा विक्री व वितरण करण्यात येणार आहे. १० ऑगस्ट रोजी विविध शाळा आणि महाविद्यालय, सांस्कृतिक सभागृह, नाट्यगृहात तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रम होत आहे. ११ ऑगस्ट रोजी 'हर घर तिरंगा' अभियानात फ्रिडम पार्क झिरो माईल येथे तिरंगा कॅनव्हॉसवर नागरिकांना देशभक्तीसंदर्भात विविध घोषणा लिहिण्याची संधी मिळेल. १२ ऑगस्ट रोजी 'रामगिरी' येथून 'तिरंगा मॅरेथॉन दौड' काढण्यात येईल. याच दिवशी 'तिरंगा ट्रिब्यूट'कार्यक्रमाअंतर्गत वसंतराव नाईक शासकीय समाज विज्ञान संस्था (मॉरिस कॉलेज) येथे स्वातंत्र्य सैनिक आणि शहीद जवानांचे स्मरण करण्यात येईल. स्वातंत्र्यसैनिक, वीर नारी तसेच सैन्यातील कार्यरत जवान यांचा सन्मान आणि सत्कार आयोजित आहे.

## नागपुरात ११ ईव्ही चार्जिंग स्टेशनची उभारणी

### अतिरिक्त आयुक्त वैष्णवी. बी यांच्याहस्ते भूमिपूजन

नागपूर, दि. ९ प्रतिनिधी

नागपूर महानगरपालिकातर्फे शहरात सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून ११ विविध ठिकाणी विद्युत वाहन 'चार्जिंग स्टेशन' उभारण्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला आहे. अतिरिक्त आयुक्त वैष्णवी. बी यांच्या हस्ते राहाटे कॉलनी चौक येथे भूमिपूजन पार पडले. कार्यकारी अभियंता राजेंद्र राठोड, सहायक अभियंता प्रमोद भस्मे, रिलायन्स बी.पी. इन्फ्रा लिमिटेडचे सचिन बोरेकर यांच्यासह मनपाचे इतर अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.



मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार शहरात ईव्ही वाहनसाठी 'चार्जिंग स्टेशन'च्या कामाची सुरुवात करण्यात आली आहे. रिलायन्स बी.पी. इन्फ्रा लिमिटेड मुंबई यांना कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

#### येथे नियोजन...

**जयताळा बाजार चौक (ऑरेंज स्ट्रीट), राहाटे कॉलनी चौक (पीकेव्ही जागेजवळ), दयानंद पार्क, पोलिस मोटर ट्रान्सपोर्ट सेक्शन काटोल रोड, पत्रकार भवनजवळील पार्किंग जागेमध्ये यशवंत स्टेडियमजवळ, वाडी नाका अमरावती रोड, फुटाळा रोड पोलिस चौकीजवळ, बुधवारी बाजार सक्करदरा पाणी टाकीजवळ, शांतीनगर मेन रोड पाणी टाकीजवळ, अंजुमन कॉलेजमागे मंगळवारी कॉम्प्लेक्स, सेंट्रल बाजार रोड तुली एम्पीरियर हॉटेलच्या पार्किंगच्या विरुद्ध बाजूला सदर स्टेशन उभारण्यात येणार आहे.**

## पोलिसांनी रेती तस्करी रोखली

रामटेक, दि. ९ प्रतिनिधी

रामटेक पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत रेतीतस्करी रोखली ही कारवाई गुरुवारी करण्यात आली

पोलिसांनी मांजकुसर रामटेक रोडवरील नवरगाव शिवारात एमएच-४०/सीटी १८१९ क्रमांकाच्या टिप्पर मधून क्षमतेपेक्षा जास्त रेती वाहतूक होत असल्याने तपासणी केली यावेळी वाहन चालक सतीश चिंधुजी बावणे याच्याकडे विचारणा केली असता वाळू वाहतुकीचा परवाना नसल्याचे कबूल केले. पंचांसमक्ष तपासणीत असता टिप्परमध्ये अंदाजे १० ब्रास वाळू आढळली. यावेळी रुपेश वसंतराव देशमुख हा वाहनाचा मालक असल्याचे आढळल्यानंतर पोलिसांनी मुद्देमाल जप्त केला. वाहन आणि रेतीसह एकूण जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत ३५ लाख ६० हजार इतकी आहे. चालक सतीश बावणे आणि मालक रुपेश देशमुख यांच्या विरोधात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला यात भारतीय दंड संहिता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, खान आणि खनिज अधिनियम, सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीस प्रतिबंधक अधिनियम आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम यांचा समावेश आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

**वैद्यकीय व्यवस्थापन** | प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मार्गदर्शन

## कीटकजन्य आजार हिवताप, हत्तीरोगसंबंधी कार्यशाळा

नागपूर, दि. ९ प्रतिनिधी

**कीटकजन्य आजार प्रतिबंधात्मक उपाययोजना व वैद्यकीय व्यवस्थापनाबाबत हिवताप आणि हत्तीरोगसंदर्भातील कार्यशाळा सार्वजनिक आरोग्य संस्था नागपूर येथे पार पडली.**




सार्वजनिक आरोग्य संस्थाचे संचालक डॉ.अजय डवले, उपसंचालक, आरोग्य सेवा डॉ. शशिकांत शंभरकर, सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (हत्तीरोग) डॉ. प्रेमचंद कांबळे पुणे, सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (हिवताप) डॉ. नयना दुफारे नागपूर, कनिष्ठ कीटक शास्त्रज्ञ डॉ. सोमाजी अनुसे, डॉ. अमित गंभीर, डॉ. पूजा धुळे, निलेश गोंधळी आदी उपस्थित होते. भंडारा,चंद्रपूर व गोंदिया जिल्ह्यातील उच्च जोखीम असलेल्या भागात कीटकजन्य आजारांचा प्रतिबंध आणि वैद्यकीय व्यवस्थापन धोरणे मजबूत करण्याकरीता प्रशिक्षण देण्यात आले. सदरील प्रशिक्षण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक, एम्स नागपूर येथील प्राध्यापक व कनिष्ठ कीटकशास्त्रज्ञ, पुणे व नागपूर यांनी प्रशिक्षण दिले. सदर प्रशिक्षणात २०२७ पर्यंत स्थानिक स्तरावरील हिवताप मुक्त करून २०३० पर्यंत भारतातून हिवतापाचे रुग्ण शून्य करून निर्मूलन करण्याचे मुख्य लक्ष्य ठेवून काम करण्यावर भर देण्यात आला. हिवताप, डेंगू, चिकनगुनिया, हत्तीरोग यासह अन्य कीटकजन्य आजाराचे वैद्यकीय व्यवस्थापन व उपाययोजना यावर भर देत जिल्ह्यात कीटकजन्य आजाराने मृत्यू होणार नाही याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यास मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळेत पुणे व नागपूर येथील कनिष्ठ कीटक शास्त्रज्ञांनी डासांचे जीवनचक्र व नियंत्रणात्मक कार्यवाहीबाबत मार्गदर्शन केले. जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.त्याडी यांनी प्रशिक्षणास आलेल्या अधिकारी/कर्मचारी वर्गाचे आभार मानले. भंडारा, चंद्रपूर व गोंदिया येथील वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

## आयटीआयमध्ये अल्पमुदतीचे २० नवे अभ्यासक्रम

### १५ सप्टेंबरपासून सुरू होणार

नागपूर, दि. ९ प्रतिनिधी

राज्यातील आयटीआयमध्ये अल्पमुदतीचे (शॉर्ट टर्म) २० नवीन अभ्यासक्रम १५ सप्टेंबरपासून सुरू करण्यात येत आहेत. तांत्रिक शिक्षणासोबत इतर अनुषंगिक व्यक्तिमत्व विकासाचे अभ्यासक्रमही सुरू होणार आहेत.

विद्यार्थ्यांना रोजगार मिळविण्यासाठी अधिक कौशल्य प्राप्त होतीलख असे सांगण्यात येत आहे आयटीआयमध्ये व्यवस्थापन क्षेत्रातील बिझनेस ॲनालिटिक्स (चार महिने), मार्केटिंग मॅनेजमेंट (तीन महिने), प्रॉडक्शन मॅनेजमेंट (साडे तीन महिने), फायनान्शियल मॅनेजमेंट (तीन महिने), बिहेव्हियरल मॅनेजमेंट (साडे तीन महिने) अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. सॉफ्ट स्किल्समध्ये ॲडव्हान्स्ड कम्युनिकेटिव इंग्लिश ॲण्ड प्रोफेशनल स्किल्स ट्रेनर (तीन महिने),फंडामेंटल्स ऑफ कॅन्टेन्ट रायटिंग (तीन महिने),कम्युनिकेटिव्ह इंग्लिश ट्रेनर (तीन महिने),पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट ॲण्ड ग्रूमिंग (साडे तीन महिने), कस्टमर रिलेशनशिप मॅनेजमेंट (तीन महिने) असे अभ्यासक्रम सुरू होतील. सेवा क्षेत्रातील अभ्यासक्रम ॲडव्हान्स्ड कोर्सेस इन गार्डनिंग (साडे तीन महिने), इलेक्ट्रिशियन ॲण्ड प्लम्बिंग (तीन महिने),नर्सिंग (तीन महिने), फ्रंट डेस्क को-ऑर्डिनेटर (तीन महिने), हाउसकीपिंग सुपरवायझर (साडे तीन महिने) असे अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. काळानुरूप विशेष अभ्यासक्रमामध्ये एआयमशीन लर्निंग डेव्हलपरचा (तीन महिने), सोलर पॅनल इन्स्टॉलेशन ॲण्ड मेंटेनन्स साडे (तीन महिने),ड्रोन टेक्नॉलॉजी ॲण्ड ऑपरेशन्स (तीन महिने), ईव्ही मेकॅनिक (साडे तीन महिने), इंडस्ट्रियल रोबोटिक्स ॲण्ड डिजिटल मॅन्युफॅक्चरिंग टेक्निशियन (चार महिने) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. स्थानिकांच्या मागणीनुसार अन्य पाच अभ्यासक्रमही संबंधित आयटीआयना निवडण्याची मुभा देण्यात आली आहे. अर्बन सिटी एरियाज- को-ऑप. हाऊसिंग सोसायटी मॅनेजमेंट कोर्स,कोस्टल रिजन -फिश प्रोसेसिंग,ऑर्नामेंटल फिशरिज,ॲग्रिकल्चरल बेल्ट -ॲग्रो प्रोसेसिंग, फूड प्रोसेसिंग टेक्निशियन असे देखील अभ्यासक्रम सुरू होणार असल्याची माहिती देण्यात आली.

अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, रविवार, दि. १० ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com

OM COACHING CLASSES
COMPUTER SCIENCE
11th & 12th
Behind Tathod Mangal Karyalaya,
Shastri Nagar, Akola,

## महत्त्वाचे

### धनादेश अनादरप्रकरणी दोन वर्षांचा कारावास

**अकोला :** धनादेश अनादरप्रकरणी अकोल्यातील अंकित पंचमीया याला ११वे मुख्य न्यायदंडाधिकारी एन. डी. जाधव यांनी दोन वर्षांच्या कारावासाची व ३ लाख ९८ हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे. दंड न भरल्यास सहा महिन्यांच्या अतिरिक्त कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. तक्रारदार रवी प्रकाश अग्रवाल यांनी हुंडीचिठ्ठीद्वारे दिलेल्या १ लाख ९९ हजार रुपयांच्या ठेव रकमेच्या परतफेडीसाठी पंचमीयाने धनादेश दिला होता; मात्र बँकेत सादर केल्यानंतर अपुरी शिल्लक असल्याने धनादेश परत आला. न्यायालयीन सुनावणीदरम्यान आरोपीविरुद्ध याआधीही अनेक खटले प्रलंबित असल्याचे उघड झाले. या प्रकरणात तक्रारदारांची बाजू विधिज्ञ सुमित महेश बजाज यांनी मांडली, तर अधिवक्त्या वर्षा सदार, अमोल भोसले आणि दीपाली वर्मा यांनी सहकार्य केले.

### गुटख्यासह मुद्देमाल जप्त

**अकोला :** जिल्ह्यात अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या ऑपरेशन प्रहार मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखा व अन्न सुरक्षा विभागाच्या संयुक्त पथकाने पळसोद फाटा येथे कारवाई करून शासनाने बंदी घातलेला पान मसालागुटखा व दुचाकीसह एकूण १ लाख १८ हजार ६९६ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.१५ वाजता गुप्त माहितीनुसार पळसोद फाटा येथे आरोपी नदीम खान रहमान शहा ( २८), रा. टाकळी रोड, चोहट्टा बाजार) याच्यावर छापा मारण्यात आला. पंचासमक्ष झालेल्या या कारवाईत ३८ हजार ६९६ रुपयांचा पानमसाला गुटखा व ८० हजार रुपयांची दुचाकी असा एकूण १ लक्ष १८ हजार ६९६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

### अवैध दारू विक्री: दोन आरोपींना अटक

**अकोला :** पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या निर्देशानुसार ८ ऑगस्ट २०२५ रोजी हिवरखेड हद्दीतील ग्राम तलई येथे गुप्त माहितीच्या आधारे पंच व पोलीस पथकाच्या मदतीने छापा टाकण्यात आला. कारवाईत आरोपी कालूराम नेमा धारवा (रा. ग्राम तलई) यांच्या ताब्यातून मोहमाच सडवा अंदाजे ७५ किलो११ हजार २५० व १५ लिटर गावठी हातभट्टी दारू, १ हजार ५०० असा एकूण १२ हजार ७५० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# भूखंड ताब्यात घेण्याची कार्यवाही रखडली

## महापालिका प्रशासन उदासीन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ९ :** महापालिकेच्या स्वतःच्या मालकीचे भूखंड ताब्यात घेण्याची कार्यवाही रखडल्याने तसेच निवासी ताबा असलेल्या भूखंडाची लीज संपूनही त्याचे नूतनीकरण झाले नसल्याची परिस्थिती आहे. सदर जागा ताब्यात घेण्यासाठी महापालिका प्रशासन उदासीन असल्याचे चित्र आहे. बहुतांश भूखंडांचा निकाल न्यायालयातून महापालिकेच्या बाजूने लागला असतानाही सदर भूखंड ताब्यात घेण्यासाठी महापालिकेकडून कुठलीही कार्यवाही करण्यात आली नाही. मोक्याच्या ठिकाणी असलेले भूखंड व्यावसायिकांच्या ताब्यात आहेत. सदर भूखंड महापालिका कधी स्वतःच्या ताब्यात घेणार, असा सवाल उपस्थित होत आहे. काही भूखंडांवर व्यावसायिकांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले आहे.

दरम्यान, मनकर्णा प्लॉट, शेलार फैल व नगर परिषद कॉलनी येथील महापालिकेच्या जागा भाडेपट्ट्यावर देण्यासाठी प्रशासनाने प्रसिद्ध केलेली ई-लिलाव प्रक्रिया रद्द करण्यात आली होती. मनकर्णा प्लॉट, शेलार फैल या परिसरातील काही प्लॉट बड्या व्यावसायिकांच्या ताब्यात असून, यामध्ये मोठे आर्थिक व्यवहार झाल्याचे समजते. मनकर्णा प्लॉट येथील ४ हजार चौरस मीटरचे ५० प्लॉट, शेलार फैल येथील ९ हजार ८७६ चौरस मीटरचे १६ प्लॉट तसेच नगर परिषद कॉलनीतील १११ प्लॉट तत्कालिन नगर परिषदेने ३० वर्षांच्या भाडेपट्ट्यावर दिले होते. सन १९५३ मध्ये हा करारनामा नगर परिषदेने केला होता. त्यामध्ये ३० वर्षांनंतर नूतनीकरण करण्याचे नमूदही केले होते; मात्र यामधील केवळ ८ भाडेपट्टेधारकांना मनपा प्रशासनाने



सन २०१४ मध्ये लिज वाढवून दिली. १५ ते २० भाडेपट्टेधारकांनी अनधिकृत खरेदी-विक्रीचे व्यवहार करून सदर प्लॉट विकल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास येताच त्यांच्यावर एफआयआर दाखल करण्यात आले होते. त्यानंतर प्रशासनाने या जागा भाडेपट्ट्यावर देण्यासाठी ई-लिलाव प्रक्रिया राबविण्याचे ठरवून भाडेपट्टेधारकांना नोटीस बजावल्या होत्या; मात्र ही प्रक्रिया पूर्णपणे बारगळली आहे. दरम्यान, मनकर्णा प्लॉट, शेलार फैल व नगर परिषद कॉलनी येथील महापालिकेचे भूखंड याशिवाय नगर परिषद कॉलनी व मनकर्णा प्लॉट येथील जागांची लीज संपल्यानंतर तत्कालीन आयुक्त कविता द्विवेदी यांनी सुनावणी घेऊन रेडिरेकनर दरानुसार भाडे आकारण्याचे आदेश काढले होते; मात्र त्यानंतर काहीही झाले नाही.

# करवाढ याचिकेवरील सुनावणी शेवटच्या आठवड्यात

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ९ :** मालमत्ता करवाढीबाबत अकोला महापालिकेने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सुनावणी होणार आहे. या याचिकेवर २७ किंवा २९ ऑगस्ट रोजी सुनावणी होणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. दरम्यान, दीड महिन्यापूर्वी सुनावणी होऊ शकली नाही.

अकोला महानगरपालिकेने २०१७ मध्ये लावलेल्या मालमत्ता कराविरुद्ध माजी नगरसेवक डॉ. झिशान हुसेन यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने ९ ऑक्टोबर २०१९ रोजी मालमत्ता करवाढ रद्द करण्याचा निर्णय दिला होता. तथापि, महानगरपालिकेने या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. सर्वोच्च न्यायालयाने १३ ऑक्टोबर २०२० रोजी उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती दिली. त्यानंतर या प्रकरणाची सुनावणी अजूनही सुरू असून, निकाल प्रलंबित आहे. दरम्यान, महापालिकेने थकबाकीदार करदात्यांकडून दंडासह कर वसूल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. वाढीव कर लागू होईल की तो कायमचा रद्द केला जाईल, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. करवाढ प्रकरणाची सुनावणी २७ किंवा २९ ऑगस्ट रोजी होणार आहे. या सुनावणीसाठी अकोला महापालिकेचे एक पथक उपस्थित राहणार असल्याचे महापालिका विधी अधिकारी श्याम ठाकूर यांनी सांगितले.

# रुग्णाच्या नाश्त्यात 'पालीचे मुंडके'!

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ९ :** स्वच्छतेच्या नावाखाली मोठमोठे दावे करणाऱ्या हॉटेल व्यावसायिकांचा आणि रुग्णालय प्रशासनाचा बेपर्वाईचा प्रकार अकोल्यात उघड झाला आहे. जिल्हा सर्वोपचार रुग्णालयातील एका रुग्णाला बाहेरून आणलेल्या पोह्यांच्या ताटात 'पालीचे मुंडके' आढळून आले. हा धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर रुग्णाची प्रकृती बिघडली आणि नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जिल्हा रुग्णालयातील एका रुग्णाने बाहेरून 'अग्रवाल हॉटेल' मधून पोहे मागवले होते. नाश्ता करत असताना त्याला पोह्यांमध्ये काही तरी विचित्र जाणविले. नीट पाहिले असता ते 'पालीचे मुंडके' असल्याचे समोर आले. हा प्रकार पाहताच रुग्णाने जेवण थांबविले; मात्र त्यानंतर लगेचच उलटी, मळमळ सुरू झाली.

या प्रकरणाने सोशल मीडियावरही जोर पकडला आहे. नागरिकांनी संबंधित हॉटेलवर कठोर कारवाईची मागणी केली असून, रुग्णालय प्रशासनालाही जबाबदार धरण्याची भूमिका घेतली आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाने या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी होत आहे.

आरोग्याच्या नावाखाली नागरिकांना अशा प्रकारे अस्वच्छ आणि असुरक्षित अन्न देणे हा गंभीर गुन्हा असल्याचे आरोग्यतज्ज्ञांचे मत आहे. रुग्णांप्रमाणे सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांवर कठोरात कठोर कारवाई व्हावी, असा सूर सध्या शहरभर आहे. अकोल्यातील या धक्कादायक घटनेने अन्नसुरक्षा व रुग्णालयातील अन्नपदार्थांच्या तपासणी यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. आता अन्न व औषध प्रशासनाची प्रतिक्रिया आणि कारवाई याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ऑटोचालकांना बांधल्या राख्या...



नवीन बस स्थानकासमोरील मदनलाल धिंग्रा चौकात रक्षाबंधनानिमित्त महिला वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांनी ऑटोचालकांना राखी बांधून मिठाई वाटप केली. यावेळी त्यांना वाहतूक नियमांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. ( छाया. संजय ताथुरकर )

# २२ वर्षीय युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ९ :** खदान परिसरातील जेतवन नगर येथे राहणाऱ्या २२ वर्षीय युवकाने झाडाला गळफास घेऊन जीवनयात्रा संपविल्याची धक्कादायक घटना शनिवारी सकाळी उघड झाली. या प्रकरणी खदान पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जेतवन नगर येथील रहिवासी नवनीत श्रीराम सौंदळे हा युवक शुक्रवारी रात्री नऊ वाजल्यापासून घरातून बेपत्ता होता. कुटुंबीय, नातेवाईक व मित्रांनी शोध घेतला, मात्र तो कुठेच सापडला नाही. शनिवारी सकाळच्या सुमारास दहा वाजता खदान येथील खदानीच्या काठावर असलेल्या झाडाला त्याने नाईट पॅन्टचा वापर करून गळफास घेतलेला आढळला. या घटनेची माहिती मिळताच परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली. मृतकाचा मोठा भाऊ सुरज रौंदळे यांच्या फिर्यादीवरून खदान पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकले नसून, पोलीस तपास सुरू आहे.

# पातूरमध्ये अनधिकृत वैद्यकीय व्यवसायाचा भंडाफोड



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ९ :** पातूर तालुक्यातील रामनगर (ग्रामपंचायत शिरला) येथे परवान्याविना वैद्यकीय व्यवसाय सुरू ठेवणाऱ्या एका ६० वर्षीय व्यक्तीविरुद्ध पोलिसांनी कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई आरोग्य विभागाच्या टीमने २३ जुलै २०२५ रोजी केली असून, ९ ऑगस्ट २०२५ रोजी पातूर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ कलम ३३(२) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला. फिर्यादी डॉ. गजानन वामनराव इंगळे (५६) रा. खडकी बु., अकोला यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या आदेशानुसार ग्रामीण रुग्णालय चातारीच्या अधीक्षक डॉ. रेखा गवई, अधिपरिचारिका एस. बी. शेख, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अझरुद्दीन (२६) व आरोग्यसेवक सांगळे (२५) यांच्या पथकाने रामनगर येथे तपासणी मोहीम राबवली. तपासादरम्यान नंदू गावंडे (६०), रा. रामनगर पातूर हे रुग्ण तपासत असल्याचे आढळून आले. वैद्यकीय डिग्री व नोंदणी प्रमाणपत्राची विचारणा केली असता त्यांनी कोणतेही दस्तऐवज सादर केले नाहीत. शासन परिपत्रकानुसार ही कृती बेकायदेशीर असल्याने त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. यापूर्वी मार्च २०२५ मध्ये मृत्यू पावलेल्या गरोदर महिलेवर गावंडे यांनी उपचार केले असल्याचे नातेवाइकांच्या तक्रारीत नमूद होते.

### तपासात आढळलेली सामग्री

कारवाई वेळी गावंडे यांच्या ठिकाणी वजन काटा, दोन बाकडे, दोन कॉटन बंडल, एक छोटी डेटॉल बाटली, मिडल बॉक्स, तसेच तपासणीसाठी आलेले तीन महिला व एक पुरुष रुग्ण आढळले.

# धारदार शस्त्राने मारहाण करून गंभीर जखमी करणाऱ्या आरोपीची निर्दोष सुटका

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ९ :** धारदार शस्त्राने मारहाण करून फिर्यादीला गंभीर जखमी करणाऱ्या आरोपी महिलेची न्यायालयाने आरोपी वकिलांचा प्रभावी युक्तीवाद ग्राह्य धरून निर्दोष सुटका केली. बोरगाव मंजू येथील रहिवासी आरोपी सताबाई गुलाबराव वारके यांनी प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी त्यांच्या शेजारी राहणाऱ्या दोन इसमांवर भांडणात धारदार शास्त्राने हल्ला करून त्यांना जखमी केले होते . तर एकाच्या डोक्यात वीट मारली होती, तसेच हाताला चावा घेऊन हाताचा लचका तोडला होता. त्यामुळे फिर्यादी गंभीर जखमी होऊन मोठा रक्तस्त्राव झाला होता . त्यानंतर आरोपी सताबाई वारके यांनी फिर्यादींना उभे जाळून टाकून जीवाने मारण्याची धमकी दिली होती. याबाबत सदरची फिर्याद बोरगाव मंजू पोलीस स्टेशन येथे २६ जानेवारी रोजी दाखल करण्यात आली होती . त्यानंतर आरोपीच्या विरुद्ध दखलपात्र आणि गैरजमानती भादंविनुसार कलम ३२४, ५०४, ५०६ असा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर आरोपीला अटक करून जेलमध्ये रवानगी करण्यात आली होती. काही दिवसानंतर आरोपीची जामीनावर सुटका करण्यात आली . त्यानंतर सदर खटला हा पोलिसांनी चार्जशीट दाखल करून आरोपपत्र दाखल करून न्यायालय समक्ष ठेवला होता . या खटल्यात आरोपीच्यावतीने विधीज्ञ शाम गजानन बामणकर, विधीज्ञ संजय कमल अशोक देशमुख आणि विधीज्ञ विकास शेषराव आठवले यांनी कायदेशीर, मुद्देसूद आणि प्रभावी युक्तिवाद करून तसेच विविध केस लॉ आणि सायटेशन देऊन विद्यमान चौथ्या प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी मोनिका चेके यांच्या न्यायालयात आरोपी निर्दोष असल्याची बाजू मांडली होती. विद्यमान न्यायालयाने आरोपींच्या वकिलाचा युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपीची निर्दोष सुटका केली.

## विकास | चार महिन्यांनंतर डीपीसीला तीस टक्के निधी प्राप्त

# कामांचा मार्ग मोकळा: जिल्हा नियोजनच्या तिजोरीत १०१ कोटी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ९ :** जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना (डीपीसी) चा पहिला टप्प्यातील तीस टक्के म्हणजेच १०१ कोटींचा निधी राज्य शासनाकडून नुकताच प्राप्त झाला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील विकास कामांचा मार्ग आता मोकळा झाला आहे. चार महिन्यांपासून निधी नसल्याने विकासकामे रखडली होती.

सन २०२५-२६ या वर्षात जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत जिल्ह्यासाठी ३३३ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत मात्र, शासनाकडून अद्याप निधी वितरीत करण्यात आला नव्हता. त्यामुळे विकास कामे रखडली होती. दरम्यान आता राज्य शासनाकडून ३३३ कोटींपैकी १०१ कोटींचा निधी जिल्हा प्रशासनाला देण्यात आला आहे.त्यामुळे विकासकामांचा मार्ग प्रशस्त झाला आहे.निधीचे शासकीय यंत्रणांना वितरण, नियोजन पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा नियोजन समितीकडून करण्यात येते.निधीतून विकासकामे होत असल्याने विविध शासकीय यंत्रणांना या निधीची प्रतीक्षा असते.पायाभूत व आरोग्य सुविधांसह अन्य विकास कामांसाठी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत जिल्ह्यासाठी निधी प्रस्तावित करण्यात येतो. हा निधी शासनाकडून जिल्हा नियोजन समितीला (डीपीसी) देण्यात येतो.




❑ सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी जिल्ह्याला ३३३ कोटी रुपये मंजूर आहेत. यापैकी पहिल्या टप्प्यातील निधीची प्रतीक्षा होती.यातील ३० टक्के म्हणजेच १०१ कोटी रुपये डीपीसीला प्राप्त झाले आहे.

**- राजेश सोनखासकर**
जिल्हा नियोजन अधिकारी, अकोला

### अशी आहे जिल्हा वार्षिक योजना

- एकूण योजना ३३३ कोटी
- प्राप्त निधी १०१ कोटी १ लाख
- प्रशासकीय मान्यता १० कोटी ६५ लाख

### आमदारांची पाटी कोरीच

आमदारांना आपल्या मतदारसंघातील विविध विकास कामे करण्यासाठी शासनाकडून पाच कोटींचा स्थानिक विकास निधी दिला जातो.हा निधी मतदारसंघातील विविध कामांवर आमदार वापरतात.मात्र सन २०२५-२६ या वर्षात आर्थिक वर्षाला चार महिने उलटूनही निधीची प्रतीक्षा आहे.

### प्राणघातक हल्ला प्रकरण: जामीन फेटाळला

**अकोला :** तेल्हारा तालुक्यातील निंबोळी शेतशिवारात कुऱ्हाड व लाठ्यांनी प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी अटक असलेल्या तिन्ही आरोपींचा जामीन अर्ज अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश वी.एम. पाटील यांनी नामंजूर केला.

आरोपी मोतीराम पोहरकर (८०), संजय पोहरकर (५२) व अक्षय पोहरकर (२८) हे १९ जुलैपासून अकोला कारागृहात आहेत. सरकारी वकील अजित देशमुख यांनी प्रकरण गंभीर स्वरूपाचे असून, आरोपी जामिनावर सुटल्यास साक्षीदारांवर दबाव आणू शकतात, असा युक्तीवाद केला.

या हल्ल्यात राम भारसाकळे गंभीर जखमी होऊन सध्या दैनंदिन हालचालीही करू शकत नाहीत. तपास अपूर्ण असून, गुन्ह्यात जन्मठेपेची तरतूद असल्याने न्यायालयाने तिन्ही आरोपींचा जामीन फेटाळला.

## अनैतिक मानवी वाहतूक कक्षाची यशस्वी कारवाई

# अपहरण पीडित मुलगी पुण्यातून सुखरूप परत

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ९ :** जिल्ह्यातील अनैतिक मानवी वाहतूक कक्षाने अपहरण गुन्ह्यातील एका पीडित मुलीचा शोध घेऊन तिला सुखरूप तिच्या कुटुंबीयांच्या ताब्यात दिले. या प्रकरणासह या कक्षाने आजपर्यंत एकूण १२० गुन्ह्यांची उकल केली आहे.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी व उपविभागीय पोलीस अधिकारी सतिश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही करण्यात आली. सिव्हिल लाइन पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या कलम ३६३, ३७० भादंवि अंतर्गत गुन्ह्याच्या तपासादरम्यान पीडित मुलगी नाशिक, सातारा, मुंबई येथे सापडली नाही. दरम्यान, गुप्त माहितीच्या आधारे ती पुण्यातील दगडुशेठ हलवाई गणपती मंदिर परिसरात असल्याचे समजताच पथकाने पुणे गाठले. विश्रामबाग पोलीस ठाण्याच्या सहकार्याने शनिवारा मंडई रोड, एसपी कॉलेज चौक परिसरात शोध घेतल्यानंतर मुलगी बसस्थानकावर सापडली. तिच्या वडिलांनी तिला ओळखले. चौकशीत तीच अपहरण पीडित असल्याचे स्पष्ट झाल्यावर तिला सुखरूप ताब्यात घेऊन अकोल्यात आणण्यात आले.

या कारवाईत सपोनि. कविता फुसे, सपोउपनि. सुरज मंगरूळकर, पोहेकाँ. प्रदीप उंबरकर, पोहेकाँ. विशाल मोरे, पोहेकाँ. दिनेशकुमार सिरसाट, मपोहेकाँ. अनिता टेकाम, मपोहेकाँ. वैशाली रणविर, मपोहेकाँ. शिल्पा मगर, मपोहेकाँ. पुनम बचे, वाहन चालक पोकाँ. भागवत काळे व प्रदीप खरात यांनी मोलाचे योगदान दिले.

अजिंक्य भारत
# आपलं अकोला / वाशिम
अकोला, रविवार, दि.१० ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com


## महत्त्वाचे

### अल्पवयीन मुलगी शाळेत गेली अन् परतलीच नाही!

**मानोरा :** मानोरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका गावातील १४ वर्षांची मुलगी ६ ऑगस्ट रोजी शाळेसाठी बाहेर गेली; मात्र ती सायंकाळी घरी परतलीच नाही. याप्रकरणी तिच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून मानोरा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भादंवि कलम १३७ (२) (बी) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित मुलगी इयत्ता दहावीत शिक्षण घेत होती. ती रोजच्या प्रमाणे ६ ऑगस्ट रोजी शाळेत गेली होती. मात्र, सायंकाळी उशीर होऊनही घरी परतली नाही. पालकांनी तिचा परिसरात शोध घेतला, पण ती सापडली नाही. अखेर ७ ऑगस्ट रोजी मुलीच्या आईने मानोरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

### रिसोड तालुक्यात ७ प्रकल्प तुडुंब; जलसाठा ७५ टक्के

**वाशिम :** रिसोड तालुक्यात मृद व जलसंधारण विभागाचे १६ आणि पाटबंधारे विभागाचे ९ असे एकूण २५ प्रकल्प असून, त्यातील ७प्रकल्प तुडूंब झाले आहेत; मात्र उर्वरित १८ प्रकल्प अद्याप भरले नसल्याने विशेषतः शेतकऱ्यांमधून चिंता व्यक्त होत आहे. जिल्ह्यातील इतर तालुक्यांशी तुलना केल्यास रिसोडची स्थिती चांगली असल्याचे दिसत आहे. या तालुक्यात जलसंधारण विभागाच्या १६ प्रकल्पांमध्ये ७७.३९ जलसाठा झाला असून विदर्भ पाटबंधारे मंडळाच्या ९ ७० प्रकल्पांची पातळीही टक्क्यांपेक्षा अधिक झाली आहे. मोरगव्हाण, वाकद येथील तलावांमधून शेतकरी सिंचनासाठी पाण्याचा वापर करित असल्याचे दिसत आहे. रिसोड तालुक्यात जलसंपदा विभागाच्या अखत्यारितही १५ लघुप्रकल्प असून त्यातील ७ प्रकल्पांची पातळी १०० टक्क्यांवर पोहोचली आहे.

### अंगणवाडी सेविकेची दिरंगाई; सेवासमाप्तीची कारवाई

**वाशिम :** एकात्मिक बालविकास सेवा योजना कार्यालय, मालेगावअंतर्गत येणाऱ्या वरदरी खुर्द येथील अंगणवाडी सेविका दमयंती नारायण पाखरे यांनी कर्तव्यात वारंवार दिरंगाई व कसूर केल्याचे निदर्शनास आल्यानंतर, महिला व बालकल्याण विभागाने ७ ऑगस्ट रोजी त्यांच्यावर सेवा समाप्तीची कारवाई केली. अंगणवाडी केंद्राच्या माध्यमातून बालकांना पूर्वप्राथमिक शिक्षणाचे धडे दिले जातात. तसेच लाभार्थींना विविध वरदरी खुर्द येथील अंगणवाडी सेविकेने कर्तव्यात दिरंगाई व कसूर केल्याचे समोर आले होते. या प्रकरणात मालेगावचे बालविकास प्रकल्प अधिकारी मदन नायक यांनी महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद वाशिम यांच्याकडे सेवा समाप्तीचा प्रस्ताव सादर केला होता.

# पुंडा परिसरात ढगफुटीसदृश पाऊस

## पंचनामे करण्याची शेतकऱ्यांची मागणी




**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोट, दि. ९ :** तालुक्यातील पुंडा येथे सुमारे आज १०:३० वाजता पासून ते १२ वाजे पर्यंत ढगफुटी सदृश पाऊस झाला. त्या मुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे अतोनात नुकसान झाले. पुंडा परिसरातील बांबर्डा येथे संततधार पावसाने हजेरी लावली .त्या मुळे शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचले आहे आणि पिके पाण्याखाली गेली आहेत तर काही पिके अक्षरशः दिसेनासे झाली आहेत.

**❑ गेल्या काही दिवसांपासून शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा होती .पिकांसाठी पाऊस आवश्यक होता.मात्र आज झालेल्या जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांचा अपेक्षाभंग झाला आहे.जोरदार पावसामुळे पिकांना त्याचा फटका बसला असून शेतातील सखल भागातील पिके पावसाच्या पाण्याखाली आली आहेत.त्यामुळे अशी पिक सडण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत.**

शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचले सकाळपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे परिसरातील काही लहान-मोठ्या नद्या-नाले दुथडी भरून वाहत आहेत.या नुकसानीमुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असून,त्यांना तातडीने आर्थिक मदतीची गरज आहे. प्रशासनाने पाऊले उचलून शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे या गंभीर परिस्थितीमुळे बाधित शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.

❑ पिकांना पावसाची आवश्यकता होती कारण कपाशीवर मोठ्या प्रमाणात मर रोगाचे आक्रमण होते. त्याने कपाशीची वाढ सुद्धा खुंटली होती.मात्र शुक्रवारी सकाळी झालेल्या पावसाने पिके पाण्याखाली गेली व या पावसाने नक्कीच कपाशीस फटका बसला यात शंका नाही.त्यामुळे त्यापिकांची शासन स्तरावरून पंचनामे व्हावेत आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत घ्यावी.

**- शरद पाठक,** शेतकरी पुंडा.

❑ एकदम आलेल्या धोधो पावसाने नाले वाहू लागलेत. यावर्षीच्या पावसाळ्यातील कमी वेळात सर्वात जास्त पाऊस याच दिवशी आला.पिकांना पावसाची गरज होतीच मात्र एकदम आलेल्या पावसाने पिके पाण्याखाली गेलीत.

**- संदीप धर्माले,** शेतकरी बांबर्डा.

# सावरगाव फॉरेस्टमधील शेतीचे पुराच्या पाण्याने नुकसान

## प्रशासनाने नुकसानाची चौकशी करण्याची बाधित शेतकऱ्यांची मागणी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**मानोरा, दि. ९ :** शनिवारी झालेल्या प्रचंड पावसाने अनेक गावातील नदी, नाले, ओढे दुथडी भरून वाहत असून काही गावातील धरणे फुटण्याच्या अवस्थेत आहेत कुठे कालवे फुटले आहेत. काही गावात कोसळलेल्या मोठ्या पावसाने नद्यांचे पाणी शेत शिवारात घुसल्याने शेतातील उभे पीक आडवे झाल्याने शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागले आहे.

सावरगाव फॉरेस्ट परिसरात आज मुसळधार आणि अखंड पाऊस दोन ते तीन तास सकाळी बरसल्याने या गावातील ओढ्याला आलेल्या पुराचे पाणी अनेक शेतकऱ्यांच्या शेतशिवारात घुसून शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. स्थानिक शेतकऱ्यांच्या २५ ते ३० एकर शेत शिवारात ओढ्याचे पानी घुसून शेतीला या पुराच्या पाण्याने नाल्यात रूपांतरित केल्याने पिकासह माती वाहून गेली आहे, ज्यामुळे अनेक शेतशिवारांना अक्षरशः नाल्याचे रूप प्राप्त झालेले असून या शेतांमध्ये केवळ दगड धोंडे मागे राहिलेले दिसून येत आहे. पियुष अरुण राठोड, तुकाराम रामदास पवार, श्याम बळीराम पवार, बळीराम रामदास पवार, पुरुषोत्तम उत्तमराव राठोड, युवराज उत्तम राठोड, नारायण हनुमंत टाले, राजेश भीमराव राऊत, प्रकाश उखंडा राऊत, गजानन ऊकंडा राऊत, सुखदेव किसन राठोड, किसन राठोड, गजानन जयराम राऊत, विश्वनाथ ठाकरे, रामी जयसिंग पवार आदी शेतकऱ्यांना या पुराचा फटका सहन करावा लागला आहे. नुकसानग्रस्त सावरगांव फॉरेस्ट येथे नेमणुकीला असलेल्या ग्राम महसूल अधिकारी वृत्त लिहीपर्यंत घटनास्थळी पोहोचले नव्हते.

# रक्षाबंधनानिमित्त मुलींना दिले राखी बनविण्याचे प्रशिक्षण


**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**मूर्तिजापूर, दि. ९ :** येथील आदर्श कन्या विद्यालय व कला कनिष्ठ महाविद्यालय मुर्तीजापुर येथे रक्षाबंधन निमित्त मुलींना राखी बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षक प्रकाश निरखे यांनी राखी बनवण्याबद्दल मुलींना मार्गदर्शन केले. टाकाऊ वस्तू, तसेच विविध झाडांच्या बियांपासून राख्या बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली.या उपक्रमाचा उद्देश रक्षाबंधनाच्या निमित्ताने पर्यावरणाचे रक्षण आपणास करता येईल. मुलींनी वृक्षांनाच, आपले भाऊ मानले, ते झाडांची चांगल्या प्रकारे निगा राखतात,बनवलेल्या राख्या ह्या आपल्या भावाला, शाळेतील प्रत्येक झाडांना बांधल्या ,त्याचा उद्देश हाच की पर्यावरणाचे रक्षण, व झाडांची काळजी घेणे. झाड आपणास ऑक्सिजन व सावली भेट स्वरूपात आपल्या बहिणींना देतात. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सुवर्णा गावंडे यांनी राखीचे महत्त्व व त्यामागचा उद्देश समजून सांगितला. संस्थेचे अध्यक्ष सुहास तिडके व सचिव शिरीष तिडके यांनी या उपक्रमाचे कौतुक केले व मुलींच्या कलागुणांना वाव मिळतो व सुप्त गुण हे बाहेर येतात त्यांच्यामुळे असे उपक्रम राबवील्याबद्दल शाळेचे कौतुक केले. यावेळी कार्यक्रमाचे संचालन प्रमोद पोळकट यांनी केले तर आभार प्रदर्शन शीला सरोदे यांनी केले. यावेळी कार्यक्रमाचे यशस्वीतेकरता राष्ट्रपाल गायकवाड, पूजा मारवाल, वैशाली रगडे,पवन तायडे,वैष्णवी डवंगे, वैष्णवी जोगी, यांनी परिश्रम घेतले.

# १६० पैकी २३ प्रकल्पांतील जलसाठा १०० टक्के!

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**वाशिम, दि. ९ :** जिल्ह्यात विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या ताब्यात २ मध्यम व ७५ लघु, तर मृद व जलसंधारण विभागाकडे ८५ लघु प्रकल्प आहेत. जुलै महिना उलटूनही त्यातील १३८ प्रकल्पांची तहान अद्याप पूर्णतः भागली नसून केवळ १ मध्यम व २३ लघु प्रकल्प १०० टक्के भरले आहेत.

जिल्ह्यात विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आणि मृद व जलसंधारण विभागाच्या अखत्यारित एकूण १६२ प्रकल्प आहेत. त्यातील फक्त सोनल हा एकमेव मध्यम प्रकल्प पूर्णतः भरला आहे; तर वाशिम शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या एकबुर्जी मध्यम प्रकल्पात केवळ ५२.३० टक्के पाणीसाठा झाला असून, ही बाब चिंताजनक मानली जात आहे. मृद व जलसंधारण विभागाकडे ८५ लघुप्रकल्प असून, त्यामधील जलपातळीत समाधानकारक वाढ नाही. विभागीय आकडेवारीनुसार, बहुसंख्य तालुक्यांतील पाणीसाठा ५० टक्क्यांच्या आत आहे. दरम्यान, एकूण स्थिती पाहता जिल्ह्यातील काही भागात पावसाचे प्रमाण जरी समाधानकारक असले, तरी अनेक ठिकाणी पावसाचा पुरेसा और नसल्याने दोन्ही विभागांकडील अधिकांश प्रकल्पांतील उपलब्ध जलसाठ्चांची स्थिती चिंताजनक बनली आहे. परिणामी, खरीप हंगामासह पाणीपुरवठा योजनांवरही त्याचा मोठा परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. जिल्ह्यात १ ते ६ जुलै या सहा दिवसांमध्ये केवळ १ दिवस ५.४ मिलीमीटर पाऊस कोसळला आहे. प्रकल्पांची पातळी वाढण्यास ही स्थिती प्रतिकुल ठरत असून खरीपात भागेल; पण रब्बी हंगामात काय होणार, या प्रश्नाने शेतकऱ्यांना ग्रासले आहे. प्रत्येक वर्षी जून-जुलै महिन्यांत जिल्ह्यातील सर्व लघुप्रकल्प ७० ते ८० टक्के क्षमतेने भरले जातात; मात्र यंदा जुलै संपून ऑगस्टचा पहिला आठवडा उलटल्यानंतरही फक्त २३ लघुप्रकल्पच तुडुंब भरले आहेत, हे विदारक चित्र जिल्ह्यातील पावसाच्या असमानतेमुळे दिसून येत आहे.

# वाडेगाव येथे महसूल विभागाकडून महाराजस्व अभियान

## सेतुमधील उत्पन्न,जातीचे व इतर दाखले असे ११० दाखल्यांचे वितरण

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**बाळापूर , दि. ९ :** तहसिल कार्यालय बाळापुर मार्फत उपविभागीय अधिकारी जावळे, तहसिलदार वैभव फरतारे, नायब तहसिलदार सागर भागवत,महसुल नायब तहसिलदार सैय्यद एहसानोउद्दीन यांच्या मार्गदर्शनाखाली दि १ ते ७ ऑगस्ट हा आठवडा महसुल सप्ताह तसेच महाराजस्व अभियान म्हणुन राबविला जात आहे. यावरून मौजा वाडेगाव येथील ग्रा पं कार्यालय येथे आज सकाळी ११ वाजता दि ४ रोजी महाराजस्व अभियान राबविण्यात आले.यावेळी ग्रा पं सरपंच मेजर मंगेश तायडे, तंटामुक्ती अध्यक्ष सागर सरप, महसुल मंडळ अधिकारी सी सी बोळे, ग्राम महसुल अधिकारी शैलेश इंगळे,लोपमुद्रा कोठुळे, राम लंगोटे, भावसिंग रबडे,कोतवाल नारायण घाटोळ, नारायण मानकर यांच्या उपस्थितीत उत्पन्न व जातीचे दाखले वाटप करणे व राशन दुकानदार श्रीधर भटकर व चेतन कारंजकर यांनी आधार कार्ड ची के वाय सी करून इतर तक्रारींचे निवारण करणे तसेच पात्र असणाऱ्या कुटुंबांना सदर अतिक्रमीत जागांचे पट्टे वाटप करणे, पाणंद शिवर रस्त्यांची मोजणी करून दुतर्फा झाडे लावणे बाबत मार्गदर्शन, विषेश सहाय्य योजनेतील डिबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना मार्गदर्शन करून डिबीटी करून घेणे, शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे निष्काशित करणे बाबत उपस्थित नागरीकांना महसुल मंडळ अधिकारी सी सी बोळे यांनी सखोल माहीती देवुन विषद केले. तसेच शेत रस्त्यांच्या बाबत वाद निर्माण होऊ नयेत म्हणुन ग्राम महसुल अधिकारी शैलेश इंगळे, राम लंगोटे, लोपमुद्रा कोठुळे यांनी शेतकऱ्याना मार्गदर्शन केले, तसेच ग्राम महसुल अधिकारी यांनी त्यांच्या कडे येत असलेल्या शेत शिवारात वृक्ष लागवड केली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते दिनेश धाडसे, प्रमोद जंजाळ, विजय डोंगरे, दत्ता मानकर, प्रेम तायडे, सर्व सेतु संचालक तसेच पत्रकार इतर असंख्य शेतकरी तथा नागरीक उपस्थित होते.

**सशक्त सेवा** | विकास, सुरक्षा व गतीसाठी जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाची हाक

# सर्व विभागांना समन्वयाने कार्य करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**दै. अजिंक्य भारत ।** प्रतिनिधी



**वाशिम, दि. ९ :** जिल्ह्याचा सर्वांगीण विकास, अपघात नियंत्रण, नैसर्गिक आपत्ती निवारण आणि नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देणे हा प्रशासनाचा ठरलेला अजेंडा असल्याचे जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी स्पष्ट केले. त्यांनी सर्व विभागांनी परस्पर समन्वय व नियोजनबद्ध पद्धतीने कार्य करण्याचे निर्देश दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात पार पडलेल्या जिल्हा समन्वय समितीच्या बैठकीत जिल्ह्यातील विकास आराखडा, प्रलंबित प्रकल्प आणि सुरू असलेल्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीस जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण,आरडीसी विश्वनाथ घुगे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख प्रत्यक्ष तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी होते.

बैठकीत पूरग्रस्त भागातील मदतकार्य, रस्त्यांची युद्धपातळीवरील दुरुस्ती, अपघातप्रवण ठिकाणांचे पुनरावलोकन, वाहतूक व्यवस्थापन, चेतावणी फलक आणि सिग्नल बसविणे यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर विशेष भर देण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभागांना तातडीने कृती आराखडा तयार करण्याचे आदेश दिले.

तसेच, जमीन भूसंपादन, सौर कृषी पंप योजना, कौशल्य विकास, भूमी अभिलेख, जिल्हा नियोजन, सार्वजनिक बांधकाम, नवोदय विद्यालय, जलसंधारण व जलसंपदा आदी विभागांच्या कामकाजाचा आढावा घेऊन प्रलंबित प्रकल्प लवकर पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. अपूर्ण पुलांची कामे, रस्त्यांचे पुनर्बांधणी प्रकल्प आणि इतर पायाभूत सुविधा विकासासाठी जलद गतीने पावले उचलण्याचे आदेश देण्यात आले. जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस म्हणाल्या, प्रत्येक विभागाने आपल्या जबाबदाऱ्या स्पष्टपणे ओळखून वेळेत व नियोजनबद्ध पद्धतीने काम केले, तर नागरिकांना दिलासा मिळेल आणि जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधता येईल.

# गब्बर टॅक्स विरोधात अकोट नगरपालिकेवर प्रहार जनशक्ती पक्षाचा मोर्चा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोट, दि. ९ :** अकोट शहरातील अन्यायकारक आणि अवास्तव मालमत्ता गब्बर टॅक्स कमी करण्यासाठी प्रहार जनशक्ति पक्षा कडून भव्य आंदोलन करण्यात आले. खालील प्रमुख मागण्या अश्या प्रकारे आहेत १) अवाजवी टॅक्स कमी करण्यात यावा २) कर योग्य मूल्य आधारित (भाडे मूल्य दर)३)करनिर्धारण अधिकारी आशिष वानखेडे यांनी निर्धारीत केलेले दर लागु करावे ४) हरकती आणि आक्षेप यांची मुदत वाढवावी किमांन३० दिवसांची मुदतवाढ देण्यात यांवी ५) झालेला सर्वे मध्ये झोन १व २ मध्ये टाकल्या मालमत्ता ह्या ३ व ४ झोन घ्या आहेत ६) अकोट शहरात मुंबई.पुणे महानगरपालिका सारखा टॅक्स आकारण्यात आला आहे ७) थकित टॅक्स चा भरणा अनिवार्य न करता हरकतीचे अर्ज कोणतेही अटी व शर्ती न लावता स्वीकारण्यात यावे ८) दलित वस्ती व झोपडपट्टी भागातील टॅक्स खुप मोठा प्रमाणावर आलेला आहे.

अकोट शहराची आर्थिक औद्योगिक व नागरी परिस्थिती त्यामुळे अशा महानगरांना लागु असणाऱ्या दरानुसार कर आकारणे अन्यायकारक आहे अकोट सारख्या लहान शहरासाठी स्थानिक परिस्थितीनुसार कर आकारणी करण्यात यावी.निवेदन देतेवेळी सुशील पुंडकर (प्रहार युवा जिल्हाध्यक्ष अकोला) कुलदीप वसु प्रहार पक्ष जिल्हाध्यक्ष अकोला , संजय गवारगुरु ,ज्ञानेश्वर दहिभात, भैय्यासाहेब डिकर ,प्रहार पक्ष शेतकरी आघाडी जिल्हा अध्यक्ष अकोला गणेश गावंडे अविभाऊ घायसुंदर जिवन खवले विशाल भगत अचल बेलसर शेखर बेंडवाल ओम घारोडे मुन्नाभाऊ साबळे सचिन काळे यांची उपस्थिती होती.

## महत्त्वाचे

### विभागीय आयुक्तालयात सोमवारी लोकशाही दिन

**वाशिम :** विभागीय लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या दुस-या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार येत्या सोमवारी (दि. ११ ऑगस्ट) रोजी सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात लोकशाही दिनाच्या आयोजन करण्यात आले आहे. विभागीय लोकशाही दिनासाठी यापूर्वी प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्यात येईल. विभागीय लोकशाहीदिनात तक्रार नोंदविण्यासाठी नागरिकांनी, तसेच महिलांनी आपले अर्ज (तालुका, जिल्हा किंवा महापालिका लोकशाहीदिनानंतर) विहित नमुन्यात १५ दिवस आधी दोन प्रतीत पाठविणे आवश्यक असते.

### रानडुकराच्या हल्ल्यात १६ वर्षीय तरुण गंभीर

**शेलूबाजार :** नागी येथील आदीत्य गजेंद्र गोंडकार (१६) हा युवक शेतात काम करत असताना त्याच्यावर रानडुकराने अचानक हल्ला केला. त्यात त्याच्या पोटाला गंभीर दुखापत झाली. ही घटना ६ ऑगस्ट रोजी घडली. अलिकडच्या काळात नागी परिसरात रानडुकरांच्या संख्येत वाढ झाली असून शेतकरी व शेतमजूर सततच्या हल्ल्यांमुळे धास्तावले आहेत. अशात ६ ऑगस्ट रोजी शेतात काम करणाऱ्या आदीत्यवरही रानडुकराने अचानक हल्ला चढवून त्यास गंभीर जखमी केले. त्यास तातडीने शेलूबाजार आरोग्यवर्धिनी केंद्रात नेण्यात आले. मात्र दुखापत अधिक असल्याने पुढील उपचारासाठी अकोला जिल्हा रुग्णालयात, आणि नंतर खासगी रुग्णालयात हलविण्यात आले.

### घर बांधण्यासाठी दहा लाख रु.ची मागणी; विवाहितेचा छळ

**मंगरूळपीर :** घर बांधण्यासाठी माहेरहून दहा लाख रुपये आणावेत, यासाठी विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी, मंगरूळपीर पोलिसांनी पतीसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. निकिता ज्ञानेश्वर परडे (वय २७, रा. खवले वेताळ मालेगाव, सध्या मंगरूळपीर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या पतीसह सासरच्यांनी घर बांधणीसाठी दहा लाख रुपये माहेरहून आणण्याची मागणी केली होती; मात्र त्यांनी पैसे न आणल्याने त्यांचा शारीरिक व मानसिक छळ करण्यात आला. तक्रारीनुसार, आरोपी सविता परडे हिने फिर्यादीचे केस धरून भिंतीवर डोके आपटले, तर पती ज्ञानेश्वर परडेने कंबरेच्या पट्ट्याने बेदम मारहाण केली. तसेच सुनील परडे व रामदास परडे यांनीही लाथाबुक्क्यांनी मारहाण करून छळ केल्याचे नमूद आहे. या प्रकरणी मंगरूळपीर पोलिसांनी विविध कलमान्वये पती ज्ञानेश्वर परडे याच्यासह चार आरोपींविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# जबरी चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## चार गुन्ह्यांची कबुली: दोन आरोपींना अटक

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. ९ :** वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीमध्ये तीन ठिकाणी व वाशिम शहरात एका ठिकाणी जबरी चोरी करणाऱ्या चोरट्यांचा शोध लावून त्यांना जेरबंद करण्यात वाशिम पोलिसांना यश प्राप्त झाले आहे. राजू तुळशीराम कांबळे ( रा. पंचशिल नगर वाशिम) , प्रसिक युवराज जाधव (रा. सुकळी पैसाळी, ता. बार्शीटाकळी जि. अकोला) असे अटक केलेल्या दोघांची नावे आहेत.

पोलीस अधीक्षक अनुज तारे, अपर पोलीस अधीक्षक लता फड, सहायक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनात वाशिम पोलिसांची अवैध धंदे, सराईत गुन्हेगार यांच्यावर सतत पाळत ठेवून चोरी, घरफोडीच्या गुन्ह्याची उकल करून गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रयत्न सतत सुरू असताना ८ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ६.०० वा ते ८.०० वा दरम्यान वाशिम शहर, वाशिम ग्रामीण हद्दीमध्ये एकूण ४ ठिकाणी जबरी चोरी झाल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानंतर वाशिम शहर, वाशिम ग्रामीण, स्थानिक गुन्हे शाखा व उपविभागीय पोलीस अधिकारी यांची टिम घटनास्थळी पोहोचून फिर्यादी यांना घटनेची माहिती घेतली असता ३ आरोपींनी यामाहा आर १५ रेसर बाईकवर येवुन चाकुचा धाक दाखवून पैसे व मोबाइल जबरीने चोरी केल्याचे सांगितले. त्यावरून चारही ठिकाणच्या फिर्यादींनी आरोपीचे सारखेच वर्णन सांगितल्याने आरोपींचे वर्णन घेऊन गंभीर स्वरूपाचे गुन्हे असल्याने पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेताच विलंब न करता पोलीस स्टेशन वाशिम ग्रामीण हद्दीमध्ये ०३ ठिकाणी घटना घडल्याने व वाशिम शहरात ०१ ठिकाणी जबरी चोरीच्या घटनेसंदर्भाने वेगवेगळ्या टिम तयार केल्या. त्यानंतर घटनेतील आरोपींच्या वर्णनाप्रमाणे सीसीटिव्ही फुटेज व आरोपींचा मागोवा घेण्यासाठी टिम तयार केल्या.

यामध्ये स्थानिक गुन्हे शाखा वाशिम सपोनि. योगेश धोत्रे व टिम, वाशिम ग्रामीण येथील सपोनि श्रीदेवी पाटील व त्यांच्या टिम, वाशिम शहर येथील सपोनि. नाईक व त्यांची टिम असे वेगवेगळ्या भागात आपआपल्या माहितीप्रमाणे आरोपींच्या शोधकामी रवाना झाल्या. त्यामध्ये वाशिम ग्रामीणच्या ठाणेदार सपोनि. श्रीदेवी पाटील यांना मिळालेल्या माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि. धोत्रे पोउपनि. मास्कर, वाशिम शहरचे सपोनि. नाईक अशा टिम अकोला जिल्ह्यातील आरोपी असल्याचे प्राथमिक माहिती घेऊन रवाना झाल्यावरून बार्शीटाकळी तालुक्यातील सुकळी पैसाळी गावातील आरोपी असल्याच्या प्राथमिक माहितीवरून पोनि. धुमाळ बार्शीटाकळी यांचे पथक सोबत घेऊन माहितीप्रमाणे गावातील गाडी व आरोपींचा शोध घेत असताना माहितीप्रमाणे गाडी एका घरामध्ये उभी दिसल्याने सदर आरोपी याचे घरचे असावे, वरील टिमने घरास वेढा घेऊन घरात प्रवेश केला. त्याच क्षणी एक आरोपी हा घरातून पळून जाण्यास यशस्वी झाला तर इतर दोन आरोपी यांना टिमने ताब्यात घेऊन त्यांना त्यांचे नाव, गाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव राजू तुळशीराम कांबळे रा. पंचशिल नगर वाशिम, प्रसिक युवराज जाधव (रा. सुकळी पैसाळी ता. बार्शीटाकळी जि. अकोला) असे सांगितल्यावर त्यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, त्यांनी वरील सर्व घटनेची कबुली दिली. गुन्ह्यातील जबरी चोरी गेलेले मोबाइल ०५ व नगदी रोख रक्कम जप्त करण्यात आले. सदर गुन्ह्याचा तपास पोउपनि. संतोष शेटे वाशिम ग्रामीण हे करीत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अनुज तारे, अपर पोलीस अधीक्षक लता फड, सहा. पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, पोलीस निरीक्षक देवेंद्रसिंह ठाकूर, सपोनि. श्रीदेवी पाटील, सपोनि. योगेश धोत्रे, अमोल पुरी, सपोनि. बाळासाहेब नाईक, पोउपनि. शेखर मास्कर, पोउपनि. राहुल गंधे, पोलीस अंमलदार संदीप गायकवाड, नीलेश घुगे, प्रवीण राऊत, प्रवीण सिरसाट, प्रशांत वाढणकर, ज्ञानदेव मात्रे, अमोल इरतकर, संदिप दुतोंडे, दिपक घुगे, महोदव भिमटे, उमेश देशमुख सायबर टिम व वाशिम जिल्हा पोलीस यांनी केली.

## केशवनगर सोमठाणा परिसरातील सांडपाणी अडविल्याने घरात घुसले पाणी



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ९ :** मानोरा येथील केशवनगर सोमठाणा लागून नवीन लेआउट तयार झाले आहे. हे लेआउट दिग्रस येथील मधुसूदन अग्रवाल यांनी डेव्हलप केले . परंतु यापूर्वी या लेआउटला एक मोठा नाला होता. त्या नाल्यावर छोटे पाईप टाकून पाणी दाबण्याचा प्रयत्न दिग्रस येथील बिल्डर मधुसूदन अग्रवाल यांनी केल्याने नाल्यात दोन छोट्या प्रकारचे पाईप टाकून थातुर मातुर काम केले. परिणामी या परिसरातील ग्रामस्थांना मोठ्या प्रमाणावर पुराचा सामना करावा लागत आहे.

९ ऑगस्ट रोजी सकाळी झालेल्या मोठ्या प्रमाणात पावसामुळे पावसाचे पाणी केशवनगर सोमठाणा येथील ग्रामस्थांच्या घरामध्ये घुसल्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. येथील सर्व ग्रामस्थ त्या पुलाचे काम पूर्ण करावे अन्यथा लोकशाही पद्धतीने सर्व सोमठाणा परिसरातील तहसील कार्यालय येथे आंदोलन करणार आहेत. सर्व ग्रामस्थांच्या वतीने तहसीलदार येवलेकर यांना केशवनगर सोमठाणा परिसरात भेट देण्यासाठी विनंती केली.

## व्हॉलिबॉल स्पर्धेसाठी मंगळवारी जिल्हास्तरीय निवड चाचणी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ९ :** आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा महासंघ (आय.एस.एफ.) आयोजित 'वर्ल्ड स्कूल व्हॉलीबॉल (अंडर-१५ बॉईज अँड गर्ल्स) चॅम्पियनशिप' स्पर्धेसाठी भारतीय संघाची निवड करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील निवड चाचणीचे आयोजन २५ ते ३० ऑगस्ट २०२५ दरम्यान श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे येथे करण्यात येणार आहे.

राज्यस्तरीय निवड चाचणी ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात पुण्यात होणार असून, त्यासाठी खेळाडू निवडण्यासाठी विभागीय निवड चाचणी १३ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता जिल्हा क्रीडा संकुल, माडी रोड, तपोवन गेटजवळ, अमरावती येथे होणार आहे.

या विभागीय निवड चाचणीसाठी वाशिम जिल्ह्यातील प्रत्येकी ५ उत्कृष्ट मुलगे व मुली (अंडर-१५) खेळाडूंची निवड करण्यासाठी जिल्हास्तरीय निवड चाचणी १२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता जिल्हा क्रीडा संकुल, वाशिम येथे आयोजित करण्यात आली आहे.

## शेतकऱ्यांना धमकावून केले रस्त्याचे बांधकाम

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मानोरा, दि. ९ :** तालुक्यातील नागरिकांना दर्जेदार पायाभूत सुविधा मिळाव्या, यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत बांधले जात असलेले ग्रामीण रस्ते या विभागाचे अधिकारी आणि ज्यांच्याकडून हे रस्ते निर्माण करण्यात येतात ते कंत्राटदार यांच्या आर्थिक साठेलोट्यांमुळे रस्ते दर्जाहीन व ज्या भागात या रस्त्यांची निर्मिती झाली त्या भागातील शेतकऱ्यांवर अन्याय करून वेडेवाकडे रस्ते बांधून स्थानिक शेतकरी व शासनाची फसवणूक होत असल्या संदर्भात असोला येथील संदीप फुलसिंग चव्हाण या शेतकऱ्याने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद करून शासन निर्णय व निकषाप्रमाणे उपरोक्त रस्ता तयार करण्याची मागणी केली आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मंजूर -६३ देवठाणा ते आसोला खुर्द हा रस्ता निकृष्ट वाळू,खडी, सिमेंट व इतर दर्जाहीन गौणखणीज वापरून बांधण्यात आले असून रस्ता बांधकाम करताना आवश्यक तेवढ्या प्रमाणात पाण्याचा वापर करण्यात आला नाही, रस्त्यासोबतच पुलांची निर्मिती सुद्धा निकृष्ट बांधकाम साहित्याचा वापर करून करण्यात आल्यामुळे हा रस्ता दर्जाहीन व बांधकाम झाल्यापासून किती काळ टिकेल यासंदर्भात तक्रारकरत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

आसोला व देवठाणा या दोन गावांना जोडणारा हा रस्ता तयार करताना शेतकऱ्यांच्या शेतीच्या बांधावरून बांधणे अपेक्षित असताना काही शेतकऱ्यांच्या शेतीच्या मध्यभागातून तर काही प्रभावी शेतकऱ्यांच्या शेताच्या दुरूनच हा रस्ता बांधून विचारणा करणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय व गुन्हे दाखल करण्याची धमकी देऊन निकृष्ट रस्ता बांधल्याची आपबीती शेतकरी संदीप चव्हाण यांनी मांडून न्यायाची अपेक्षा जिल्हा प्रशासनाकडून केली आहे.

## विठोली शाळेच्या डागडुजीस अखेर प्रारंभ

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ९ :** राज्याचे माजी मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक यांनी ज्या प्राथमिक शाळेत शिक्षण घेतले त्या विठोली येथील शाळा इमारतीची दुरवस्था झाली आहे. देखभाल व दुरुस्ती अभावी जिर्णावस्थेत पोहोचल्याने या शाळेची दुरुस्ती आणि सौंदर्यीकरण करण्याची मागणी अखिल भारतीय तांडा सुधार समितीच्या वतीने करण्यात आली होती यासाठी ८ ऑगस्ट पासून बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले होते.

वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री आणि उपोषणकर्ते यांच्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस कृष्णकुमार राठोड यांच्या यशस्वी शिष्टाईमुळे कामास प्रारंभ झाल्याने उपोषणकर्त्यांनी उपोषण स्थगित केले आहे. अ. भा. तांडा सुधार समितीचे प्रदेश महासचिव नामा बंजारा यांच्या मार्गदर्शनात संघटनेचे तालुका अध्यक्ष डॉ.गणेश राठोड, उपाध्यक्ष रामराव चव्हाण व पदाधिकारी आणि परिवर्तन शेतकरी संघटनेचे प्रवर्तक मनोहर राठोड हे उपोषण बसले होते. संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजनेअंतर्गत मंजूर झालेली २० लक्ष रुपयाची निधी या शाळेच्या दुरुस्ती व सौंदर्यकरणावर तातडीने खर्च करून जीर्णावस्था प्राप्त झालेल्या इमारतीची अवहेलना थांबवण्यासाठी आमरण उपोषण आरंभिले होते. ना. इंद्रनील नाईकांनी पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याशी बोलून प्रदेश पदाधिकारी कृष्णकुमार राठोड यांच्या मध्यस्थीने सदरील उपोषण यशस्वीरित्या सोडविले. या वेळी माजी पंचायत समिती सदस्य गोपाल भोयर, गट विकास अधिकारी डॉ प्रफुल भोरखडे,स्वप्नील पाटील, माजी ग्राम पंचायत सदस्य गणेश राठोड, सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी वानखडे, आदी उपस्थित होते.

## तलावाची भिंत क्षतिग्रस्त...



मानोरा तालुक्यातील पिंपरी हनुमान येथील गाव तलावाची भिंत क्षतिग्रस्त झाली असून असाच पाऊस आला तर भिंत फुटण्याची शक्यता नाकारता येत नाही.परिणामी तलावा खाली येणारी २०० एकर शेतीचे नुकसान होईल. संबधित विभागाने या कडे तातडीने लक्ष देऊन दुरुस्ती करावी अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे. (छाया : संजय अलदर, तालुका प्रतिनिधी, मानोरा)

## शुभ वार्ता

### लाडकी बहीण पतसंस्था: महिलांसाठी बचत व व्यवसायाचे नवे व्यासपीठ

# महिला आर्थिक विकास महामंडळाची नवी योजना सुरू होणार

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ९ :** राज्य शासनाची महत्त्वाकांक्षी योजना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणास चालना देण्यात येणार आहे. यासाठी त्यांच्याच सहभागातून महिला नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करून नोंदणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महिलांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन माविमच्या जिल्हा समन्वय अधिकारी वर्षा खोब्रागडे यांनी केले आहे.



शासनाच्या ८ मार्च २०१९ च्या परिपत्रकानुसार निकष पूर्ण करणाऱ्या संस्थांची नोंदणी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यामध्ये महिलांसाठी वॉर्ड प्रभाग तसेच सभासद संख्या निश्चित केली आहे. नगरपालिका क्षेत्रात सभासद संख्या ५०० असून नोंदणीच्या वेळी भांडवल पाच लाख असणे आवश्यक आहे. गाव कार्यक्षेत्र असलेल्या ठिकाणी प्राथमिक सभासद संख्या २५० असून नोंदणीच्या वेळी भांडवल दीड लाख रुपये आहे. तालुका कार्यक्षेत्र प्राथमिक सभासद संख्या पाचशे असून भाग भांडवल पाच लाख रुपये आहे.

जिल्हास्तरावर प्राथमिक सभासद संख्या दीड हजार असून भभांडवल दहा लाख रुपये आहे. या नुसार नोंदणी केली जाणार आहे.

लाडक्या बहिणीच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी शासनाने आणखी एक पाऊल पुढे टाकले असून महिला पतसंस्था नोंदणीचा निर्णय घेतला आहे. लाडकी बहीण योजनेतून मिळणाऱ्या अनुदानाचा योग्य उपयोग व्हावा, महिलांना बचतीची सवय लागावी आणि उद्योग-व्यवसायासाठी खेळते भांडवल सहज उपलब्ध व्हावे, यासाठी राज्य सरकारने प्रत्येक जिल्ह्यात 'लाडकी बहीण पतसंस्था' सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. वाशिम जिल्ह्यातही महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (माविम) माध्यमातून ही योजना सुरू होणार आहे. अनेक महिलांना बँक खाते उघडणे, कर्ज मिळविणे किंवा व्यवसाय सुरू करताना आर्थिक नियोजन करणे कठीण जाते. अशा महिलांसाठी 'लाडकी बहीण पतसंस्था' हे एक विश्वासार्ह आणि सोयीचे व्यासपीठ ठरणार आहे. या संस्थेमुळे महिलांना केवळ बचत करण्याची संधीच नाही, तर स्वावलंबनाची नवी दिशा मिळणार आहे. या पतसंस्थेत 'लाडकी बहीण' योजनेतील लाभार्थींसोबतच बचत गटातील महिला, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता आणि दिव्यांग महिलांनाही सामावून घेतले जाणार आहे. महिलांच्या बचतीची सवय वाढविणे आणि त्यांना कमी व्याजदरात त्वरित कर्ज उपलब्ध करून देणे, हा या योजनेचा उद्देश आहे.

#### महिला व बालविकास विभागाकडून घेणार यादी

सहकार विभागाने नावीन्यपूर्ण योजना तयार केली आहे. महिलांना व्यवसाय करता यावा, या उद्देशाने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. पतसंस्था तयार करताना सहकार विभाग महिला व बालविकास विभागाची मदत घेणार आहे. महिला व बालविकास विभागाकडून यादी प्रमाणित करून घेतली जाणार आहे.

## उच्च महाविद्यालयास शिक्षण संचालकाची भेट

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वनोजा, दि. ९ :** वनोजा येथील ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था संचालित श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालयात ४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी भेट दिली. शेलुबाजारजवळील चिखली (झोलेनाथ) येथे सुरू असलेल्या शासनाच्या मॉर्डन डिग्री महाविद्यालयाच्या कामाची पाहणी करण्याच्या अनुषंगाने ते वनोजात आले होते. या दौऱ्यात त्यांनी श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालयात भेट देऊन परिसर, शैक्षणिक सुविधा आणि महाविद्यालयीन उपक्रमांची माहिती घेतली. यावेळी अमरावती विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. केशव तुपे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यापीठ अभियंता रोडे व प्रशासन अधिकारी राम राठोड उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे यांनी स्वागत केले. डॉ. देवळाणकर यांनी ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची प्रशंसा केली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय करत असलेल्या प्रयत्नांविषयी त्यांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी सुभद्राबाई पाटील महाविद्यालय, मानोरा येथील प्राचार्य डॉ. नंदकिशोर ठाकरे, पी. डी. जैन महाविद्यालय, अनसिंग येथील प्राचार्य डॉ. विवेक गुल्हाने, तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

**महत्त्वाचे**

## पर्यावरणपूरक राखी बनविणे कार्यशाळा संपन्न



**मूर्तिजापूर:** गाडगे महाराज महाविद्यालय गृहअर्थशास्त्र विभागाकडून घरच्याघरी पर्यावरण पूरक राखी बनविणे कृतिशाळा घेण्यात आली. प्रमुख अतिथी डॉ. अनिल ठाकरे, कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. मनिषा यादव, प्रशिक्षक डॉ. कांचन मिसाळ हे होते. प्रास्ताविक डॉ. नरेश बनसोड यांनी केले. यावेळी डॉ. अनिल ठाकरे यांनी मार्गदर्शन केले. कृतिशाळेत गृहअर्थशास्त्र विभागाच्या डॉ. कांचन मिसाळ यांनी कापूस, लोकर, बदाम बियाची टरफले, रेशीम कापड, विविध वृक्षांच्या बिया यांचा वापर करून पर्यावरणपूरक राखी कशी बनवावी, हे कृतीतून शिकविले. शिवाय कापूस, इतर वस्तूंचा पूनर्वापर करता येतो. त्यातून मनोरंजन व एक व्यावसायिक होऊ शकतो, हा आत्मविश्वास विद्यार्थ्यांना आला आहे. कृतिशाळेतून विद्यार्थ्यांनी राखी बनविणे हे कौशल्य आत्मसात केले. राखी महाभारतातील दौपदी कृष्णाला बांधते. ती साडीची पट्टी असते; पण कृष्ण रक्षणाची हमी देतो. बळीराजाच्या कथेत राखीचा सदर्भ येतो. आताच्या काळात बहीण-भाऊ दोघांनी एकमेकांचे संरक्षण केले पाहिजे, असे प्रतिपादन अध्यक्ष राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मनिषा यादव यांनी केले.

# उद्या धारगडात घुमणार ‘हर्ऽऽ बोला महादेव’चा जयघोष

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोट, दि. ९ :** तालुक्यातील सातपुड्याच्या कुशीत वसलेल्या ऐतिहासिक श्री.क्षेत्र धारगड येथे श्रावण सोमवारी असलेली शिवयात्रा यंदाही पारंपरिकपणे मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे.उद्या, रविवार १० ऑगस्ट सकाळी ८ वाजता ते सोमवार ११ ऑगस्ट दुपारी ३ वाजेपर्यंत ही यात्रा होणार असून, यामध्ये वन विभागाच्या अटी-शर्तीनुसार ठराविक वेळेपर्यंतच शिवभक्तांना जंगलात प्रवेश मिळणार आहे. त्यानुसार सोमवारी धारगडात ‘हर्ऽऽ बोला महादेव’ चा जयघोष घुमणार आहे.

धारगड हे अकोटपासून जवळ असलेले पौराणिक शिवतीर्थस्थान असून, दरवर्षी

## वन विभागाकडून मर्यादित प्रवेश



श्रावणातील तिसऱ्या सोमवारी येथे भव्यदिव्य मोठ्या प्रमाणात यात्रा भरते.

धारगड हे मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या सीमेवर असल्याने येथे जाण्यासाठी वन विभागाच्या खटकाली व पोपटखेड तपासणी नाक्यांमार्फत सोमवार दुपारी ३ वाजेपर्यंतच प्रवेश दिला जातो. भाविकांसाठी विशेष बसची व्यवस्था धारगड यात्रेदरम्यान अकोला व अमरावती जिल्ह्यांच्या पोलिसांकडून योग्य व चोख बंदोबस्त करण्यात येणार आहे. शिवाय यात्रेसाठी अकोट एसटी डेपोमधून विशेष बसेस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. अकोट शहरातही रविवारी शिवभक्तांसाठी चहा, फराळ, स्टॉल्सचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेसाठी रविवारीच विविध मार्गांनी शिवभक्त डोंगरदऱ्यांतून,पावसाच्या सरी झेलत हरऽऽ हर महादेवच्या गजरात, महादेवाची गाणी म्हणत धारगडकडे निघतात. सोमवारी सकाळपासून शिवभक्त धारगड गुहेसमोरील पवित्र धारेखाली स्नान करून मोठ्या आणि लहान शिवलिंगाला जलाभिषेक करून पूजा-अर्चना करतात.

### किल्ल्यावर महाप्रसादाचे आयोजन

धारगड परिसरातील व्यवस्था आणि नियोजन यासाठी श्री.क्षेत्र धारगड सेवा समिती (अकोट) तसेच स्थानिक स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल यांच्यावतीने भव्यदिव्य महाप्रसादाचे वाटप होणार असून, नरनाळा किल्ल्यावर श्री.हनुमान गड सेवा समितीतर्फेदेखील प्रसाद वितरणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

### असा राहील यात्रेचा प्रवास माग

श्री.क्षेत्र धारगड यात्रेकरिता शिवपूर–कासोदपर्यंत बससेवा सुरु राहील. पायदळ यात्रेचा मार्ग अमोना मार्गे धारगड गुफा शिवलिंग दर्शन ते नरनाळा किल्ला असा असून, हनुमान मंदिर येथे महाप्रसादाची व्यवस्था नरनाळा सेवा समितीकडून करण्यात आली आहे. नरनाळा किल्ला ते शहानूर पायदळ येऊन शहानूर येथून अकोटकरिता बससेवा उपलब्ध आहे. मोटरसायकल व चारचाकी वाहनाने अकोट पोपटखेड मार्गे खटकाली गेट वन विभागाचा तपासणी नाक्यावरुन श्री.क्षेत्र धारगड टी पॉइंटपर्यंत मोटारसायकल व चारचाकी खासगी वाहनांना प्रवेश देण्यात येणार असून, यासाठी पार्किंग शुल्क लागणार आहे.

# पुराचे पाणी शिरले शेतात; बहरलेल्या पिकांचे नुकसान!

## महसूल विभागाने पंचनामे करून आर्थिक मदत देण्याची मागणी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**मालेगाव, दि. ९ :** तालुक्यात शुक्रवारी सकाळी मुसळधार पावसामुळे नदी-नाल्यांना पूर आला. यामुळे तालुक्यातील परिसरातील शेतात पुराचे पाणी शिरल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. महसूल विभागाने तत्काळ पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

सुमारे पंधरा दिवसांच्या विश्रांतीनंतर ८ ऑगस्टच्या रात्री पावसाने दमदार हजेरी लावल्यामुळे कोमेजत चाललेल्या पिकांना संजीवनी मिळाल्याचे समाधान शेतकऱ्यांना वाटत होते; मात्र दुसऱ्याच दिवशी सकाळी पावसाने अचानक रौद्ररूप घेतले. अगदी तासाभरातच नदी-नाले दुथडी भरून वाहू लागले. परिणामी, ओढ्याच्या काठावर असलेल्या शेतांमध्ये पाणी घुसले. रणजित मोहळे यांचे शेत हे रिधोरा-राजुरा मुख्य रस्त्यालगत आहे. मागील वर्षभरात सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्यावरील पुलाचे काम करत असताना, मोहळे यांच्या शेजारील नाल्यावरून मोठा गाळ काढून छोट्या आकाराच्या नळ्या बसविण्यात आल्या. मोहळे यांनी संभाव्य पुराच्या पावसाचे शेतात साचलेल्या पाण्याने संपूर्ण पिकांचे नुकसान झाले आहे. धोका लक्षात घेऊन विभागाला वेळोवेळी लेखी पत्रव्यवहार करून सतर्कतेचा इशारा दिला होता.

मात्र कंत्राटदारासह संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्यामुळे आज त्यांच्या संपूर्ण शेतात पुराचे पाणी साचून मोठ्या आर्थिक नुकसानीचे चित्र निर्माण झाले आहे. महसूल प्रशासनाने तत्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य ती आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

२ फूट ते अडीच फूट शेतात पाणी साचले होते. रणजित मोहळे आणि रामप्रसाद सोनोने यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. प्रशासनाने त्वरित पंचनामे करून मदतीची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटीतर्फे मुलींसाठी विशेष कार्यक्रम

## जागृती माध्यमिक,उच्च माध्यमिक विद्यालय येथे बालिकेच्या सन्मानार्थ ‘चलो सोच बदले’ कार्यक्रम






**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ९ :** तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटीतर्फे प्रत्येक बालिकेच्या सन्मानार्थ ‘चलो सोच बदले’,हा संकल्प घेऊन ८ ऑगस्ट २०२५ रोजी जागृती माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालय रणपिसे नगर, अकोला येथे मुलींना त्यांच्या हक्काबद्दल जागृत करून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी आणि मुली स्वयंसिद्ध व्हाव्यात, यासाठी कार्यक्रम घेण्यात आला.

तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फ ेअर सोसायटी संस्थेचे अध्यक्ष तथा प्रसिद्ध उद्योजक डॉ. सुगत वाघमारे व उपाध्यक्ष सौ.तनुजा सुगत वाघमारे यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनानुसार ‘चलो सोच बदले’ या कार्यक्रमातून मुलगी वयात येताना सुरू होणारी मासिक पाळी त्याबद्दलच्या श्रद्धा-अंधश्रद्धा, समज-गैरसमज, समस्या व त्यावरील उपाययोजना या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटीच्या सदस्य सुचिता घोगरे यांनी केले. तर विषयाला धरून मार्गदर्शन सपना म्हात्रे यांनी केले, यावेळी शाळेतील मुलींनी पाळीच्या संदर्भातील येणाऱ्या वेगवेगळ्या समस्या व त्यावरील उपायांबाबत माहिती विचारली. त्यावर तिक्ष्णगतच्या महिला सदस्यांनी त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सुवर्णा कोळमकर उपस्थित होत्या. शाळेच्या शिक्षिका मेघा देशमुख यांनी कार्यक्रमाचे संचालन केले व संस्थेबद्दल माहिती दिली. यांच्यासोबत माधुरी पुंडकर उपस्थित होत्या.

अजिंक्य भारत NEWS & MALABAR GOLD & DIAMONDS CELEBRATE THE BEAUTY OF LIFE Presents भक्तीमय श्रावण

वाचा अजिंक्य भारत जिंका चांदीचे नाणे





**करन तुनवाल,** तेल्हारा



**जयश्री देशमुख,** अकोला



**राजेश एकनाथ मगर**
देऊळगाव माळी,मेहकर



**देवांश पल्लवी विशाल राखोंडे**



**संध्या मगर** दे.माळी,तालुका मेहकर



**ध्रुवांश उमेश हरमकर**
इंजिनीअर्स कालीनी,मोठी उमरी,अकोला



**क्षितिजा ओमराजे साकरकार**
तेलीपुरा चौक,आगर



**किशोर संदीप भोंडेकर**
तळेगांव बाजार ता. तेल्हारा जि.अकोला



**संतोष कोकरे,** मलकापूर,अकोला



**शिवांश शुभांगी सागर राखोंडे**
कान्होबा चौक,पातूर

वरील छायाचित्रांमधून एकास लकी ड्रॉ द्वारे मलाबार गोल्ड अँड डायमंड्स,रतनलाल प्लॉट, अकोला यांचे तर्फे एक चांदीचे नाणे भेट दिल्या जाणार आहे.
तसेच प्रकाशित होणाऱ्या सर्व छायाचित्रांमधून एक मेगा लकी ड्रॉ द्वारे एका विजेत्यास मोठे चांदीचे नाणे मिळवण्याची संधी आहे.
सहभागी होण्याकरीता फोटो, नाव व पत्ता दिलेल्या मोबाईल नंबर वर पाठवावे +91 85309 73259

अजिंक्य भारत
# आपलं बुलडाणा
बुलडाणा, रविवार, दि.१० ऑगस्ट २०२५



## महत्वाचे

### वाहत्या नदित आढळला अनोळखी मृतदेह

**दे.माळी :** सकाळी काही लहान मुले नदीत खेळण्यासाठी गेली असता त्यांना पाण्यात वाहून आलेला व एका ठिकाणी थांबलेला मृतदेह दिसला. त्यांनी तात्काळ गावात येऊन ही माहिती दिली. गावचे पोलीस पाटील, सरपंच आणि तंटामुक्ती समिती सदस्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली आणि लगेचच डोणगाव पोलीस स्टेशनला दूरध्वनीद्वारे कळवले.माहिती मिळताच ठाणेदार नागरे साहेब आणि त्यांची टीम घटनास्थळी दाखल झाली. मृतदेहाची पाहणी करून ओळख पटवण्याचा प्रयत करण्यात आला, मात्र तो अज्ञात असल्याने मृतदेह मेहकर ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आला.या घटनेचा पुढील तपास डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार नागरे साहेब व त्यांची टीम करत आहेत.

### शेती विक्रीच्या वादातून दगडाने वार एक जखमी

**डोणगाव:** पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या ग्राम घाटबोरी येथे दि. ७ ऑगस्ट ला दुपारी १वाजताच्या दरम्यान शेती विक्रीच्या कारणावरून जिवे मारण्याच्या उद्देशाने डोक्यावर दगडाने वार करून एकास जखमी केल्याची घटना घडली. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार घाटबोरी येथे फिर्यादी मनिषा संतोष अवसरमोल हीचे पती संतोष विठ्ठलराव अवसरमोल याना आरोपी समाधान उर्फ बंडू विठ्ठल अवसरमोल यांनी शेती विक्रीच्या कारणावरून जिवे मारण्याच्या उद्देशाने डोक्यावर दगडाने वार करून गंभिर जखमी केले आहे त्यांचे डोक्याला जास्त मार लागल्याने त्यांना सरकारी दवाखाना मेहकर येथे ईलाजाकामी नेले असता त्यांना बुलडाणा समान्य रुग्णालयात उपचारासाठी रेफर केले असून त्याचा ईलाज सुरू आहे फिर्यादी सौ. मनिषा संतोष अवसरमोल ही च्या तक्रारी वरून आरोपी समाधान उर्फ बंडू विठ्ठल अवसरमोल विरूद्ध कलम १०९ (१) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी ला अटक करण्यात आली आहे पुढील तपास ठाणेदार अमरनाथ नागरे करीत आहेत.

### शिवाजी नगर पोस्टेचे ठाणेदार पितांबर जाधव यांची बदली

**खामगाव :** बुलढाणा जिल्हा पोलिस दल आस्थापना मंडळाच्या काल ८ ऑगस्ट २५ रोजी आयोजीत बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार पोलिस अधिक्षक निलेश तांबे यांनी एका आदेशान्वये शिवाजी नगर पोस्टेचे ठाणेदार पितांबर सोव्हालाल जाधव यांची शेगाव ग्रामीण पोस्टेचे ठाणेदार म्हणुन बदली करण्यात आली आहे. त्यांच्याकडे श्री संत गजानन महाराज मंदीर सुरक्षेचा अति. कार्यभार देण्यात आला आहे. तर शिवाजी नगर पोस्टेचे ठाणेदार म्हणुन नियंत्रण कक्ष बुलढाणा येथील सुरेंद्र शत्रुघ्न अहेरकर रुजु होणार आहेत. अहेरकर यांच्या समोर अवैध धंदे आव्हान असेल.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १६३५ - २४५० |
| गहू | २४२५ - २६२५ |
| तुर | ३७०० - ६७२५ |
| हरभरा | ४३०० - ६१०५ |
| सोयाबीन | ४००० - ४८६० |
| तीळ. | ७८०० - ८२०० |
| उडीद. | ४९०० - ४९०० |
| धने. | ५६०० - ५६०० |
| भुईमूग. | ४७७५ - ५६०० |
| बाजरी. | १९०० - २१०० |

# नागपूर-पुणे वंदे भारतला एक्सप्रेसला शेगावतही थांबा

## बुलडाणा जिल्ह्यातील प्रवाशांना पुणे-नागपूर प्रवास झाला सोईचा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.९ :** माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १० ऑगस्ट २०२५ रोजी अजनी (नागपूर) पुणे वंदे भारत एक्सप्रेस ट्रेनला हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास माननीय रेल्वे, माहिती व प्रसारण तसेच इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव आणि इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

महाराष्ट्रासाठी ही १२ वी वंदे भारत एक्सप्रेस असणार आहे आणि वर्धा मनमाड या आतापर्यंत वंदे भारत सेवा नसलेल्या भागाला पहिली वंदे भारत ट्रेन मिळणार आहे. नागपूर आणि पुणे हे दोन्ही वेगाने वाढणारे महानगरे असून येथे लघु व मध्यम उद्योग, शिक्षण संस्था, वैद्यकीय सेवा, ऐतिहासिक व धार्मिक स्थळे तसेच पर्यटन स्थळे मोठ्या प्रमाणात आहेत.

**नागपूर शहर:** नागपूर हे ''संत्री नगरी'' तसेच ''हेल्थ केअर सिटी'' म्हणून ओळखले जाते. भारतरत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडित दीक्षाभूमी हे बौद्ध धर्मीयांचे प्रमुख तीर्थक्षेत्र येथे आहे. याशिवाय राम टेकसारखा पौराणिक महत्व असलेला राम मंदिर आणि विविध धार्मिक स्थळेही येथे आहेत. आणि इतर नामांकित वैद्यकीय संस्था येथे असून संपूर्ण विदर्भातील रुग्ण येथे उपचारासाठी येतात. नागपूर ''टायगर कॅपिटल ऑफ इंडिया'' म्हणूनही ओळखले जाते कारण या परिसरात अनेक वन्यजीव अभयारण्ये आहेत. **पुणे शहर:** पुणे हे महाराष्ट्राची ''सांस्कृतिक राजधानी'' मानले जाते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे वास्तव्य असलेले लाल महाल, जन्मस्थान शिवनेरी किल्ला आणि पेशव्यांचे निवासस्थान शनिवार वाडा यांसारख्या ऐतिहासिक स्थळांसह पुणे हे अनेक शैक्षणिक संस्था आणि धार्मिक स्थळांचे केंद्र आहे. दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर, आलंदी, जेजुरी इत्यादी धार्मिक स्थळे पुणे परिसरात आहेत. **सेवेचे महत्व:** अजनी (नागपूर) पुणे वंदे भारत एक्सप्रेसमुळे प्रवाशांना काम, व्यवसाय, शिक्षण व पर्यटनासाठी जलद व आरामदायक प्रवास उपलब्ध होणार आहे. व्यापारी, विद्यार्थी, नोकरदार आणि पर्यटक यांना ही सेवा उपयुक्त ठरेल आणि व्यापार, पर्यटन व उद्योगवाढीस चालना मिळेल. **भारतामधील सर्वांत लांब वंदे भारत सेवा:** ही एक्सप्रेस ८८१ किलोमीटरचे अंतर कापणारी देशातील सर्वांत लांब वंदे भारत ट्रेन असेल. महाराष्ट्रातील १२ वी वंदे भारत ट्रेन असून वर्धाअकोलाशेगावभुसावळजळगावमनम



ाड आणि पुणतांबा दौंड भागात ही पहिली वंदे भारत ट्रेन आहे. नागपूरपुणे दरम्यानची ही सर्वात जलद ट्रेन असून सरासरी वेग ७३ किमी/तास आहे. ट्रेनला १० प्रमुख ठिकाणी थांबे असणार आहेत. उद्घाटन विशेष ट्रेन गाडी क्र. ०१००१, नागपूर-पुणे वंदे भारत विशेष (एकमार्गी) दिनांक: १० ऑगस्ट २०२५ रोजी नागपूर येथून सकाळी १०:५० वाजता सुटेल आणि पुणे स्थानकावर २२:५५ वाजता पोहचेल. **वंदे भारत एक्सप्रेस ट्रेनची नियमित सेवेची सुरुवात खालीलप्रमाणे आहे:** गाडी क्रमांक २६१०२ अजनी ते पुणे वंदे भारत एक्सप्रेस अजनी येथून दिनांक १२.०८.२०२५ पासून दररोज (सोमवार वगळता)०९.५० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी २१.५० वाजता पुणे येथे पोहोचेल. गाडी क्रमांक २६१०१ पुणे ते अजनी वंदे भारत एक्सप्रेस पुणे येथून दिनांक ११.०८.२०२५ पासून दररोज (मंगळवार वगळता) ०६.२५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी १८.२५ वाजता अजनी येथे पोहोचेल. **वंदे भारत एक्सप्रेस विशेष वैशिष्ट्ये: प्रवासी सुविधा:** वातानुकूलित डबे, आपोआप तापमान नियंत्रण, दीर्घ प्रवासासाठी आरामदायक बसण्याची व्यवस्था, एलईडी व वातानुकूल प्रकाशव्यवस्था, आपोआप उघडणारे दरवाजे, मोठी पारदर्शक खिडकी, बायो-वॅक्युम शौचालये **सुरक्षा सुविधा:** अग्निसुरक्षा यंत्रणा, सीसीटीव्ही प्रणाली, आपत्कालीन संवादासाठी इंटरकॉम, ऊर्जा बचतीसाठी पुनरुत्पादक ब्रेकिंग सिस्टम, ड्युअल सस्पेन्शन प्रणाली. **मेक इन इंडिया' उपक्रमाचा अभिमान:** वंदे भारत एक्सप्रेस ही भारतात तयार झालेली आधुनिक रेल्वेगाडी आहे, जी भारताच्या आत्मनिर्भरतेचे आणि तंत्रज्ञान प्रगतीचे प्रतीक आहे. भारतीय रेल्वेच्या १४४ वंदे भारत सेवा सध्या २४ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये चालू असून येत्या ३ वर्षात २०० हून अधिक वंदे भारत ट्रेन सेवा सुरू करण्याचे नियोजन आहे. ही सेवा महाराष्ट्रातील संपर्क, उद्योग, पर्यटन आणि शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी महत्वपूर्ण टप्पा ठरेल.

**थांबे**

- अजनी १०:५५ वाजता आगमन / १०:५७ वाजता प्रस्थान
वर्धा ११:४० वाजता आगमन / ११:४२ वाजता प्रस्थान
बडनेरा १३:०३ वाजता आगमन / १३:०५ वाजता प्रस्थान
अकोला १४:०० वाजता आगमन / १४:०२ वाजता प्रस्थान
शेगाव १४:२३ वाजता आगमन / १४:२५ वाजता प्रस्थान
भुसावळ १५:५५ वाजता आगमन / १६:०० वाजता प्रस्थान
जळगाव १६:२६ वाजता आगमन / १६:२८ वाजता प्रस्थान
मनमाड १८:२५ वाजता आगमन / १८:३० वाजता प्रस्थान
कोपरगाव १९:२० वाजता आगमन / १९:२२ वाजता प्रस्थान
अहमदनगर २०:३५ वाजता आगमन / २०:३७ वाजता प्रस्थान
दौंड कॉर्ड लाईन २१:४३ वाजता आगमन

## एनएचएआय कार्यालयास शिवसेना (उबाठा) चे निवेदन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मलकापूर दि.९ :** नॅशनल हायवे क्रं ५३ वरील सी.सी.टी.व्ही तसेच उड्डाणपुलाखालील सर्व सर्विस रोड, निंबोळा देवी रस्ता, नाली दुरुस्ती आणि कट पॉईंट व्यवस्थित करण्याची मागणी शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर सह पदाधिकाऱ्यांनी प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण जळगाव (खां)यांच्याकडे दि.०८ ऑगष्ट रोजी एका निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात नमूद केले आहे की मलकापूर तालुक्यातील टोल प्लाजा दसरखेड ते वडनेर भोलजी पर्यंतच्या उड्डाणपुला खालील सर्व्हिस रोड रस्त्यांची अत्यांत दुरावस्था झाली असून त्यांची तात्काळ दुरुस्ती व दसरखेड ते वडनेर दरम्यान सि.सी.टी.व्ही कॅमेरे बंद असल्यामुळे अनेक वेळा अपघात होऊन अज्ञात वाहने निघून जात असल्याने अपघातग्रस्तांना नाहक त्रास होतो,सि.सी.टि.व्हि कॅमेरे तात्काळ दुरुस्त करणे तसेच निंबोळा देवी येथे जाणाऱ्या सर्विस रोडला लागून अपूर्ण नाली बनली असून त्या नाली चे पाणी रस्त्यावरुन वाहत असल्याने तो रस्ता उखडला असून तात्काळ दुरुस्त करण्यात यावा, चॅनल नंबर ३३१ व ३३२ +१०० जवळ कट पॉईंट असून पंधरा - विस गावांकरीता व निंबोळा देवी संस्थान कडे जाणाऱ्या कट पॉईंटवर झंपर लाईटची व्यवस्था नाही आणि कट पॉंइंट वर निशाणी बोर्ड सुद्धा लावलेला नाही सदर व कट पॉईंट वर नियमाप्रमाणे लांबी-रुंदी सहित निशाणी बोर्ड, झंपर लाईट लावून व्यवस्थित करण्यात यावा, वरील सर्व कामे आवश्यक जरुरीचे असून सदरहू कामे करीत पूर्ण करण्यात यावे अन्यथा शिवसेनेच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनावर शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, शिवसेना शहर प्रमुख हरीदास गणबास,किसान सेना शहर प्रमुख सै. वसीम सै.रहीम सह आदी पदाधिकार्यांच्या स्वाक्षऱ्या नमूद आहे.

## एस.डब्ल्यू.डी. इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये रक्षाबंधन उत्साहात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि.९ :** एस डब्ल्यू डी इंग्लिश मीडियम स्कूल, खामगाव येथे दिनांक ८ ऑगस्ट २०२५ रोजी पारंपरिक उत्साहात रक्षाबंधन साजरा करण्यात आला. भाऊ-बहिणीच्या नात्याचे प्रतीक असलेला हा सण, विद्यार्थ्यांमध्ये प्रेम, एकता आणि सामाजिक सौहार्द निर्माण करणारा ठरला.

कार्यक्रमाला शाळेच्या संचालिका सौ. शितलताई देशमुख व मुख्याध्यापक आकाश खरपाडे प्रमुख उपस्थित होते. विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांच्या हातावर राख्या बांधत, परस्पर प्रेम, सुरक्षा आणि नात्याची दृढता याचे सुंदर दर्शन घडवले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी रक्षाबंधनावर आधारित गाणी, नृत्ये आणि भाषणे सादर करून रसिकांची मने जिंकली. शाळेच्या संचालिका सौ. शितल देशमुख यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''रक्षाबंधन हे नुसते सण नाही, तर हे एक सामाजिक मूल्य आणि बंधनाची भावना जपणारे पवित्र नाते आहे. विद्यार्थ्यांनीही आपल्या कुटुंबातील आणि समाजातील प्रत्येक नातं जपायला शिकलं पाहिजे.'' या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या शिक्षकवृंदांनी विशेष परिश्रम घेतले. त्यामध्ये शिक्षिका सौ. सुषमा भालतिलक, प्रतीक्षा बारगळ, पूजा वानखडे, वैष्णवी तायडे, सौ. प्रीती अकोटकर, वृषाली चोपडे, कल्पना भोपळे व श्रीमती संगीता ताई जोध यांचा विशेष सहभाग होता.

## डोणगाव येथे रस्त्यावर पाणी;बसस्थानकपरीसरात नाल्यांची आवश्यकता

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**डोणगाव दि.९ :** डोणगाव हे नागपूर ते मुंबई राज्य महामार्गोवर असणारे गाव असून सध्या येथील राज्य महामार्गोवर बसस्थानक परीसरात वारंवार रस्त्यावर खड्डे पडत आहे सदर खड्डे बुजविले ही जात आहे पण रस्त्याच्या दोन्ही बाजूने नाल्या नसल्याने डोणगाव राज्य महामार्गोवर सदैव पाणी वाहून मोठे खड्डे पडत आहे. तर राज्य महामार्गोलगत असणारे हॉटेल चालक ही चक्क रस्त्यावर पाणी सोडत असल्याने रस्त्यावर वारंवार खड्डे पडत असून यामुळे अपघात वाढत आहे. तर डोणगांव बसस्थानकपरीसरात अतिक्रमण काढून रस्त्यालगत दोन्ही बाजूने नाल्या करणे आवश्यक आहे नाहीतर वारंवार रस्त्यावर येणारे पाणी यामुळे रस्ता खड्डेमय होत आहे याकडे राष्ट्रीय रस्ते वाहतूक विभाग व स्थानिक प्रशासनाने लक्ष देऊन तरित नाल्या कराव्यात अशी मागणी वाहनधारकातून होत आहे.

## महसूल सप्ताहानिमित्त प्रशासन लाभार्थ्यांच्या घरी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**देऊळगाव राजा दि.९ :** राज्यभरात सध्या महसूल सप्ताह साजरा केला जात असून या सप्ताहाच्या निमित्ताने देऊळगाव राजा तालुक्यात महसूल प्रशासन समस्यांचा निपटारा करण्यासाठी थेट लाभार्थ्यांच्या घरी दाखल झाले आहे. महाराष्ट्र शासन व महसूल विभागाच्या दिनांक २९ जुलै २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार, राज्यात दिनांक १ ऑगस्ट २०२५ ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत ''महसूल सप्ताह'' साजरा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार मंगळवारला तहसील कार्यालय देऊळगावराजा अंतर्गत राजस्व मंडळ, देऊळगाव मही येथे तहसिलदार वैशाली डोंगरजाळ, नायब तहसिलदार सायली जाधव यांच्या उपस्थितीत महसूल सप्ताह निमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले.

या उपक्रमांतर्गत श्रावणबाळ योजना व संजय गांधी निराधार अनुदान योजना मधील ज्यांचे आधार प्रमाणीकरण झालेले नाही तसेच केंद्रावर हजर राहून डिजिटल लाईफ सर्टिफिकेट सादर करता येत नाही, अशा लाभार्थ्यांच्या घरभेटी घेऊन आधार प्रमाणीकरण व तयार करण्याचे काम करण्यात आले. महसूल सप्ताह निमित्त विविध कार्यक्रम प्रा.संजय खडसे, उपविभागीय अधिकारी, सिंदखेडराजा व वैशाली डोंगरजाळ, तहसीलदार, देऊळगावराजा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात आले. या उपक्रमासाठी संजय गांधी विभागाचे कर्मचारी पूजा सावळे, महसूल सहाय्यक रुपेश सोनवाल, महसूल सहाय्यक, (ऑपरेटर) फरीद शेख, तसेच महा-ई-सेवा केंद्र चालक भगवान चित्ते यांनी परिश्रम घेतले. महसूल सप्ताहाच्या माध्यमातून शासनाच्या कल्याणकारी योजना प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा हेतू यशस्वीपणे साध्य होत आहे.

## लव्हाळा मार्गे खामगाव-मेहकर बस पुन्हा सुरू

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मंगरूळ नवघरे दि.९ :** आज मंगरूळ नवघरे येथे एसटी कामगार सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष मा.हाफिज भाई यांच्या प्रयतामुळे गेले दोन वर्षे आधी बंद झालेली मेहकर ते खामगाव ही लव्हाळा - मंगरूळ नवघरे - अमडापुर - उदयनगर मार्गे असलेली एस.टी.बस आज पुन्हा सुरू झाली.

आज पासून दुपारी १२ वाजता मेहकर , लव्हाळा , मंगरूळ नवघरे , अमडापूर, उदयनगर ते खामगाव मार्गे ही बस नियमित धावेल अशी माहिती एस .टी .परिवहन महामंडळ अधिकारी यांच्याकडून मिळाली आहे. मेहकर - खामगाव ही बस खामगाव वरुन मेहकरकडे धावत असतांना. आज सायंकांळी मंगरुळ नवघरे येथे सदर बस चे चालक - वाहक आणि ही बस पुन्हा या मार्गावर धावण्यासाठी महत्वाची भूमिका बजावणारे जिल्हा कामगार सेनेचे उपाध्यक्ष मा.हाफिज भाई यांचा सत्कार महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्षाचे व्हि.जे.एन.टी. आघाडी प्रदेश सचिव किसनराव आटोळे, मंगरुळ नवघरे येथील माजी सरपंच रमेशभाऊ वाकडे, सामाजिक कार्यकर्ते गजानन काकडे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. उपस्थीत सत्कार प्रसंगी मंगरुळ नवघरे येथील ग्रामस्थ आणि पंचक्रोशीतील अनेक मान्यवर उपस्थित होते.

त्यामध्ये प्रामुख्यानं चिखली तालुका कॉग्रेज नेते तथा नायगाव बु.येथील माजी सरपंच मा .नानाभाऊ पंखुले , चिखली तालुका भाजपा युवा नेते नारायण धुमाळ , बाळसमुद्र येथील सामाजिक कार्यकर्ते विठोबा नाझरकर , गजानन नाझरकर सखाराम गावडे ( पाळा) आणिशिवाजी लहाने मंगरुळ नवघरे , शरद लहाने मंगरुळ नवघरे , पवन सुरसे मंगरूळ नवघरे , अनिल येळवंडे मंगरूळ नवघरे, शेख अहमद मंगरुळ नवघरे , सुनील अंभोरे मंगरूळ नवघरे , राजूभाऊ मेकॅनिकल मंगरुळ नवघरे, नितीन शिंदे मंगरुळ नवघरे, राम मेहेत्रे मंगरुळ नवघरे ,गणेश पाटील मंगरुळ नवघरे , प्रल्हाद जोशी मंगरुळ नवघरे , नितीन नावकर मंगरुळ नवघरे ,संजू मामा मगर अमोल तांबट सर मंगरुळ नवघरे आदिंसह प्रवाशी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रहारच्या बहिणींचा पंतप्रधान व मुख्यमंत्र्यांना काळ्या राख्या बांधून निषेध

### शेतकरी भाऊरायांना संकटातुन बाहेर काढा; सपुर्ण कर्ज माफीची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मलकापुर दि.९ :** शासनाकडे 'लाडक्या बहिणीं' ना दरमहिन्याला १५०० रूपये देण्यासाठी पैसा आहे, मत्र आमच्या शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्यासाठी शासन टाळाटाळ करीत आहे. अस्मानी, सुल्तानी संकटाने शेतकरी बांधव भरडला जात असून दररोज कोठे ना कोठे शेतकरी आत्महत्या होतच आहे. महाराष्ट्रात आतापर्यंत ६ लाख शेतकरी बांधवांनी आत्महत्या करून आपले जीवन संपविले. तेव्हा ही आत्म हत्येची शोकांतीका थांबविण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या बहिणींनी पंतप्रधान व मुख्यमंत्री यांना प्रतिकात्मक स्वरूपात काळ्या राख्या बांधून निषेध नोंदविला.

आमच्या शेतकरी भाऊरायाला या संकटातून बाहेर काढा अशी साद घातली.आज रक्षाबंधन निमित्त शहरात प्रहार जनशक्ती पक्षाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी शेतकरी बांधवांच्या होत असलेल्या आत्महत्याा अन् शासन शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे व त्यांच्या समस्यांकडे वेळोवेळी करीत असलेले दुर्लक्ष. तसेच विधानसभा निवडणुकीवेळी महायुती सरकारने शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करण्याचे दिलेल्या आश्वासनाचा त्यांना विसर पडल्याने देशाचे पंतप्रधान व राज्याचे मुख्यमंत्री यांना प्रतिकात्मक स्वरूपात भाऊराया म्हणून त्यांना टिळा लावून औक्षण करून काळ्या राख्या बांधल्या. तसेच आम्हाला तुमच्याकडून कोणतीही ओवाळणी नको तर आमचे शेतकरी बांधवांना तुम्ही दिलेल्या आश्वासनाची पुर्तता करा अन् त्यांच्या असलेल्या समस्या तातडीने सोडवून त्यांचा ७/१२ कोरा करा अशी आर्त हाक घातली.

यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाच्या महिला पदाधिकाऱ्यांसह उपजिल्हामुख अजय टप, तालुकामुख अजित फुले शहर प्रमुख शालिग्राम पाटील, शहर उपप्रमुख बळीराम बावस्कर, राहुल तायडे, अशोक गाढवे, संजय इंगळे, अजाबराव वाघ आणि असंख्य महिला उपस्थित होत्याा.

## महत्त्वाचे

### किनगांव राजा ठाणेदार पदी संजय मातोंडकर



**किनगाव राजा :** येथील पोलीस स्टेशनच्या ठाणेदार पदी सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय मातोंडकर यांची नियुक्ती जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी केली आहे. त्यांनी ता.९ ऑगस्ट रोजी पोलीस स्टेशनचा पदभार स्वीकारला आहे. यापूर्वी विनोद नरवाडे हे ठाणेदार म्हणून कार्यरत होते. संजय मातोंडकर हे याअगोदर चिखली पोलीस स्टेशन मध्ये कार्यरत होते. ठाणेदार संजय मातोंडकर हे शिस्तप्रिय,कायद्याचे सखोल ज्ञान असणारे अधिकारी आहेत. याअगोदर त्यांनी यवतमाळ जिल्ह्यामध्ये काम केले आहे. पदभार स्वीकारल्यानंतर दैनिक अजिंक्य भारत सोबत बोलताना ठाणेदार संजय मातोंडकर यांनी सांगितले की, सामाजिक सुरक्षेला प्राधान्य देत गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे हे माझे प्रमुख उद्दिष्ट राहील त्यासाठी नागरिकांनी पोलिसांना सहकार्य असे आवाहन त्यांनी केले, तसेच कायदा सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी प्रयत करणार असल्यांचे त्यांनी सांगितले. संजय मातोंडकर यांनी प्रशासन व गुन्हेगारी नियंत्रणामध्ये त्यांनी चांगली कामगिरी केली आहे.

### अहिल्याबाई होळकर पुण्यतिथीसाठी चौंडीला उपस्थित रहा - सुनील मतकर

**देऊळगाव राजा :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची २३० वी पुण्यतिथी दि.१३ ऑगस्ट रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंढी ह्या त्यांच्या जन्मगावी संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन बुलडाणा जिल्हा मल्हार सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनील मतकर यांनी केले आहे. ह्या कार्यक्रमाकरिता चौढीचे शिल्पकार व माजी मंत्री अण्णासाहेब डांगे तसेच महासंघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. ज्यामध्ये महासंघाचे प्रदेशाध्यक्ष चिमणभाऊ डांगे माजी आमदार ॲड.रामहरी रुपनवर, माजी प्रदेशाध्यक्ष श्रीराम पुंडे,सरचिटणीस सुनील वाघ, मल्हार सेनेचे सरसेनापती बबनराव रानगे अहिल्या महिला संघाच्या अध्यक्षा डॉ. अलकाताई गोडे सुभाषराव सोनवणे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

### महिलांनी केले पोलीस स्टेशनमध्ये रक्षाबंधन



**देऊळगाव राजा :** भाजपाच्या जिल्हा महिला मोर्चाच्या अध्यक्षा सविता पाटील यांच्या पुढाकाराने रक्षाबंधनानिमित्ताने देऊळगाव राजा पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ब्रह्म गिरी व त्याांच्या अधिनस्त असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना राख्या बांधून हा पवित्र सण साजरा करण्यात आला. बहीण भावाचे नाते अधिक घट्ट होण्यासाठी भगवंताकडे प्रार्थना करण्यात आली. या पोलीस स्टेशनला नव्याने नियुक्त झालेले पोलीस निरीक्षक ब्रह्म गिरी यांचा या महिला मंडळाकडून सन्मान करण्यात आला.

यावेळी भाजपाच्या जिल्हा महिला मोर्चाच्या अध्यक्षा सविता पाटील, सुनिता सानप, ज्योती ताठे, ललिता पावले, शारदा जायभाये उपस्थित होत्या.

## ड्रॅगन फ्रुटने घडवली क्रांती, सतीश गुप्त यांचा गो- आधारित शेतीचा यशस्वी पॅटर्न

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**लोणार दि. ९ :** पारंपरिक शेतीत होणारे तोटे, कर्जाचे वाढते ओझे आणि निसर्गाच्या लहरीपणामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांसाठी चिखली अर्बन बँकेचे अध्यक्ष सतीश गुप्त यांनी एक नवा आदर्श उभा केला आहे. पारंपरिक पिकांपासून दूर जात त्यांनी १८ एकर शेतीत ड्रॅगन फ्रुटची लागवड करून आर्थिक यशाची नवी वाट निर्माण केली आहे. या शेतीत त्यांनी कोणतेही रासायनिक खत किंवा कीटकनाशके न वापरता, पूर्णपणे गो-आधारित शेती पद्धत अवलंबली आहे.

सुरुवातीला लागवडीचा खर्च मोठा असला तरी, या शेतीतून मिळणारे उत्पन्न आणि दीर्घकालीन फायदे लक्षात घेता हा निर्णय फायदेशीर ठरला आहे. गो-आधारित शेतीचा हा पॅटर्न परिसरातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



ड्रॅगन फ्रुटचे उत्पादन थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी गुप्त यांनी उत्कृष्ट विक्री व्यवस्थापन उभारले आहे. यासाठी त्यांनी १५ बेरोजगार तरुणांना रोजगार दिला आहे. ग्राहकांना ताजे फळ मिळण्याबरोबरच, तरुणांना रोजगाराची संधीही उपलब्ध झाली आहे. ड्रॅगन फ्रुटचा दर सर्वसामान्यांना परवडेल असा ठेवण्यात आला असून, त्यामुळे बाजारात याला मोठी मागणी आहे. उच्च प्रतीचे उत्पादन मिळवण्यासाठी गो-आधारित शेतीचा वापर करून त्यांच्या बागेतील फळे अतिशय रसाळ, गोड आणि आरोग्यदायी ते करत आहे. आतापर्यंत त्यांनी ३०० क्विंटलपेक्षा जास्त फळांची विक्री केली असून, पुढील तीन महिने उत्पादन सुरू राहणार असल्याची माहिती देखील त्यांनी दिली. शेतीला आधुनिकतेची जोड असली तर शेतकरी हा कधीही हवालदिल होणार नाही. ड्रॅगन फ्रुट शेतीत मिळालेल्या यशानंतर गुप्त हे याच पिकावर आणखी नवे प्रयोग करण्याच्या तयारीत आहेत. पारंपरिक शेतीला आधुनिकतेची जोड कशी द्यायची याचे उत्तम उदाहरण म्हणजे सतीश गुप्त यांचा हा प्रयोग होय.

त्यांनी केवळ चिखलीतच नव्हे, तर गोदरी शिवारातही ही शेती यशस्वीरित्याा फुलवली आहे. सतीश गुप्त यांचे म्हणणे आहे की, ''शेतकरी जर केवळ नफा पाहून पिकांची निवड न करता, टिकाऊ आणि आरोग्यदायी पद्धतीने शेती करत राहिले, तर त्यांचे उत्पन्न तर वाढेलच पण पर्यावरणही जपले जाईल. गो-आधारित सेंद्रिय शेती हा भविष्यातील मार्ग आहे.''

## 'हर घर तिरंगा' मोहिम; विविध उपक्रमांचे आयोजन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.९:** स्वातंत्र्य दिनानिमित्त यावर्षीही 'हर घर तिरंगा' मोहिम राबविण्यात येणार आहे. यात तीन टप्प्यात विविध उपक्रमांचे आयोजन कारण्यात आले आहे. या माहिमेत नागरिकांनी सक्रीय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.




पहिल्या टप्यात २ ते ८ ऑगस्ट दरम्यान शाळा, कार्यालये, सार्वजनिक ठिकाणी तिरंगा प्रेरित सजावट. हर घर तिरंगा २०२५ या हॅशटॅगसह सोशल मीडीयावर फोटो शेअर करणे, तिरंगा रांगोळी स्पर्धा-कार्यशाळा, तिरंगा राखी बनवण्याच्या स्पर्धा, अंगणवाडी, शाळा, वृध्दाश्रम, मॉल्स यामध्ये तिरंगा विषयक प्रश्नमंजूषा, शाळांमध्ये जवानांसाठी पत्रलेखन उपक्रम, 'हर घर तिरंगा - हर घर स्वच्छता' अभियान हे ८ ते १५ ऑगस्ट दरम्यान राबवून स्वच्छता व पाणी संजीवनीवर विशेष भर देण्यात येणार आहे. स्वयंसेवक कार्यक्रमात प्रचारकांनी घरोघरी तिरंगा पोचवणे व जनजागृती करण्यात येणार आहे.

दुसऱ्या टप्प्यात ९ ते १२ ऑगस्ट दरम्यान मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय तिरंगा महोत्सव, तिरंगा मेला व देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम, तिरंगा बाईक व सायकल रॅली, तिरंगा यात्रा व मानवी साखळ्या, तिरंगा विक्री स्थानिक उत्पादक व स्वयं सहायता गटांचा सहभाग, मिडीया व सोशल मिडीयात हॅशटॅगसह प्रसिद्धी-प्रचार, प्रत्येक घरात तिरंगा विकत घेण्याचे आवाहन करण्यात येणार आहे.

तिसऱ्या टप्प्यात १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान घर, कार्यालय, वाहनावर तिंरगा फडकावणे, सेल्फी व फोटो . वर अपलोड करणे, ध्वजारोहण समारंभ, कार्यक्रमाचे प्रसारण व प्रसिध्दी करण्यात येणार आहे. यात नागरिकांनी उत्स्फुर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## अत्यल्प पवसामुठे पिकाची वाढ खुटल्याने शेतकरी हवालदिल

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**धाड दि.९ :** हवामान खात्याने यावर्षी पावसाळा समाधानकारक राहणार, असा अंदाज वर्तविला होता. परंतु धाड परिसरात पावसाचे प्रमाण अत्याल्प झाल्याने पिकांची वाढ खुंटली आहे. तर आगामी काळात पिण्याच्या पाण्याची टंचाई निमर्ण होते की काय, अशी चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.

पावसाळा सुरू होऊन जवळपास दोन महिन्याचा कालावधी उलटून गेला आहे. परंतु अद्याप धाड भागात दमदार पाऊस झाला नाही. मे महिन्यात सतत १५ दिवस पावसाने हजेरी लावल्याने या भागात बहुतांश शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या होत्याा. तर उर्वरित शेतकऱ्यांनी मृग नक्षत्रात पेरण्या आटोपल्या. पिकांचे कोवळे अंकुर दिसू लागले, परंतु ऐनवेळी पावसाने दडी मारल्यामुळे कोवळ्या पीकाला वाचविण्यासाठी विहिरींचे पाणी ठिबकच्या सहाय्याने दिले. पीके समाधानकारक असताना पावसाने पुन्हा दडी मारल्याने पिके कोमजू लागली. सध्या परिस्थितीत नदी, विहिरीच्या पाण्याची पातळी खालावत आहे.

## तहसिल कार्यालयात महसूल दिन उत्साहात साजरा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**शेंदुर्जन दि.९ :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वनविभागाच्या आदेशानुसार, सिंदखेडराजा तहसील कार्यालयात 'महसूल सप्ताह २०२५' चा मोठा उत्साहाने साजरा केला जात आहे. या सप्ताहाचा एक भाग म्हणून, सोमवार, ४ ऑगस्ट २०२५ रोजी महसूल दिन साजरा करण्यात आला.

या दिवशी, उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तहसीलदार अजित दिवटे यांच्या अध्यक्षतेखाली अनेक महत्वाचे उपक्रम राबवण्यात आले. या महसूल दिनानिमित्त, संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ योजनेच्या एकूण ३११ लाभार्थ्यांची प्रकरणे मंजूर करण्यात आली. यामुळे गरजू लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. २१३ विविध प्रमाणपत्रे वाटप करण्यात आली. यामुळे, नागरिकांना शासकीय योजनांचा आणि सेवांचा थेट लाभ मिळाला. या कार्यक्रमाला निवासी तहसीलदार प्राजल पवार यांच्यासह, सहायक महसूल अधिकारी कमल लहाने, संजय सोनुने, रामेश्वर कहाळे, मनोहर चेके, सुनिता रोकडे, विष्णू भागीले, जानकिराम शिपे, महसूल सहाय्यक के.डी. इगोले, सुनिता ठोसरे, सारीका चिभडे, रेखा भंडारी, वर्षा पडघान आणि महसूल सहायक गणेश नागरे उपस्थित होते. यासोबतच, शिपाई अनंता वाटुरे, दत्तात्रय बनकर, शिवाजी शिंदे, सुनिता अंभोरे, महसूल सेवक राजु भाऊ खरात, संजय आटोळे, आकाश माघाडे, गणेश देशमुख, गणेश जायभाये, राहुल झोटे , मोरे, इंगळे यांच्यासह इतर नागरिक आणि महिलांनीही मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.

## जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**धामनगाव गो. दि.९ :** आदिवासी समाजाच्या हक्कासाठी आणि न्यायासाठी लढा देणाऱ्या या समाजाचे मोठे योगदान आहे. म्हणून दरवर्षी आपल्या देशात ९ ऑगस्ट हा दिवस जागतिक आदिवासी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानुसार याही वर्षी संग्रामपूर तालुक्यातील धामणगाव गोतमारे येथे ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. धामणगाव गोतमारे येथील ग्रामपंचायत कार्यालयात क्रांतिकारी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी जय वळेखन मित्र मंडळ , ज्ञानेश्वर सोळंके, बाळू सोळंके, सोपान सोळंके ,भागवत सोळंके, एकनाथ पवार, विठ्ठल पवार, कमलाबाई पवार, रामभाऊ गोतमारे, अभिमन्यू साखरे, प्रमोद वानखडे, संतोष वानखडे, अमोल गोतमारे, संजय थुकेकर यांचेसह नागरिक उपस्थित होते.

## तलाठी अमोल राठोड यांचा विविध सामाजिक संस्थेच्यावतीने सत्कार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.९:** हरित क्रांतीचे जनक डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांच्या जन्म शताब्दी निमित्त जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, प्रकल्प संचालक (आत्मा), कृषी विज्ञान केंद्र व तालुका कृषी अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने 'शाश्वत शेती दिन' साजरा करण्यात आला.

डॉ. अमोल झापे (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र) यांनी शाश्वत शेतीचे नियोजन व व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले, तर डॉ. निलेश कानवडे (वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, कृषी संशोधन केंद्र) यांनी शाश्वत शेतीचे महत्व उलगडून सांगितले. शेतकरी महेश जाधव व विशाल धनावत यांनी आपल्या प्रत्यक्ष अनुभवांची मांडणी केली. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या स्वागत व दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी नावीन्यपूर्ण व शाश्वत शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकातून डॉ. स्वामिनाथन यांच्या कार्याचा परिचय प्रकल्प संचालक (आत्मा) पुरुषोत्तम उन्हाळे यांनी करून दिला. अध्यक्षीय भाषणात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी शेतकऱ्यांनी शाश्वत शेतीकडे वळण्याचे महत्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक बुटे यांनी तर आभार प्रदर्शन अनुराधा गावडे यांनी केले. कार्यक्रमाला जिल्ह्यातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.



## अन्न व औषध प्रशासनामार्फत मार्गदर्शन शिबीर संपन्न

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.९ :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या ड्रग अवरनेस अँड वेलनेस नेव्हीगेशन ड्रग फ्री इंडीया (डीएडब्लु) योजना २०२५ अंतर्गत अन्न व औषध प्रशासन कार्यालयामार्फत दि. ३१ जुलै २०२५ रोजी मार्गदर्शन शिबीर आयोजन करण्यात आले. यावेळी अंमली पदार्थ व एनडीपीएस ॲक्टविषयी मार्गदर्शन करण्यात आले.



यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा सहदिवाणी न्यायाधीश सचिव नितीन पाटील, प्रमुख मार्गदर्शक सरकारी प्रमुख विधीज्ञ बचावपक्ष ॲड. सानप, केमिस्ट व ड्रगिस्ट संघटनाचे अध्यक्ष गजानन शिंदे, अन्न व औषध प्रशासन सहायक आयुक्त (औषधे) गजानन घिरके, महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिल सदस्य गणेश बंगाळे, केमिस्ट व ड्रगिस्ट संघटना सचिव निलेश गावंडे, दशरथ हूडेकर, दिनेश राजपूत, नंदू साळोख, अभिजित निबांळकर तसेच जिल्ह्यातील प्रमुख घाऊक व किरकोळ, केमिस्ट बंधू-भगिनींनी, औषध विक्रेते उपस्थित होते. ॲड. सानप यांनी एनडीपीएस ॲक्टबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तर न्यायाधीश नितीन पाटील यांनी अंमली पदार्थांचे सेवन, त्याचे दुष्परिणाम व कायदेशीर तरतुदींची सखोल माहिती दिली. त्यानंतर गजानन घिरके यांनी जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेत्यांना एनडीपीएस ॲक्टनुसार आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले. विना प्रिस्क्रिप्शन औषधी विक्री न करण्यासह प्रत्येक आस्थापनेत सीसीटीव्ही बसविण्याचे निर्देश दिले. तसेच सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून तरुण पिढीला अंमली पदार्थाच्या आहारी जाण्यापासून रोखण्यासाठी जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले.

## षड्रिपुच्या मोहात अडकलो तर मुक्त होणार नाही- दीपशरणजी महाराज

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.९ :** मनुष्य काम, क्रोध, मोह, मद, मत्सर इत्यादीमध्ये जर अडकला असेल तर तो आणखी अडकत जातो. मोहाच्या दोरीला खुंटीशी बांधुन ठेवले नावाडी कितीही वल्ली हलवत राहीला आणि खुंटीचा दोर सोडला नाही तर ज्याप्रमाणे नाव प्रयत करुनही पुढे जाणार नाही तसेच षड्रिपुच्या मोहात अडकलो तर मुक्ती होणार नाही असे प्रतिपादन बालसंत दिपशरणजी महाराज यांनी शिवमहापुराण कथेचे चवथे पुष्प गुंफतांना केले.



सद्भावना सेवा समितीद्वारा जगद्गुरु संत तुकाराम महाराज वारकरी भवन येथे ४ ते १० ऑगस्ट दुपारी २ ते ६ वाजेपर्यंत कथा आयोजित केली आहे. कथा प्रारंभहोण्यापुर्वी संतोष तुपकर, पंजाबराव मासोदकर, चरणदास अनेरकर यांनी माल्यार्पण केले. आजचा दिवस अग्रवाल समाज महिला मंडळाचा होता. रुद्राभिषेक तयारी, व्यासपीठ तयारी, आरती सजावट करून सर्वांनी व्यासपीठावर हार घालून आरती केली. यामध्ये श्रीमती सरला अग्रवाल, कुसुम अग्रवाल, सारिका चिरानिया, किरण चिरानिया, ज्योती भडेच, प्रमिला अग्रवाल, अस्मिता अग्रवाल, सरोज अग्रवाल, राधिका अग्रवाल, प्रिती अग्रवाल, दिपीका अग्रवाल, मोनिका चिरानिया यांनी सहभाग घेतला सायंकाळी आरतीमध्ये उमेश मुंदडा, मधुकर गायके, नितीन तापडीया, नितीन जयस्वाल, सौ. मंदा संतोष तूपकर, श्रीमती सरला अग्रवाल यांनी व्यासपीठावर आरती केली. दि. १० ऑगस्टला रविवारी होम हवन आणि २ वाजता महाप्रसाद होईल. आज शिवपार्वती विवाह निमित्त झाँकी सादर केली. चंद्रशेखर माळी मामा यांनी या निमित्त २५ किलो बुंदी दिली. सौ. सुनिता वाघमारे, यादव वाघमारे भुसावळ येथुन आलेले रेल्वे कर्मचाऱ्यांनी महाराजांचे पुजन व हार घालून आरती केली.

रुद्राभिषेक करणाऱ्यामध्ये सौ. किरण जुगलकिशोर चिरानिया, सौ. रेखा प्रकाशचंद्र पाठक, सौ. पुजा मयुर जैस्वाल, सौ. ज्योती कैलाश भडेच, सौ. माधवी आनंद गिदोडीया, सौ. सपना पंकज अग्रवाल, सौ. सुनिता यादव वाघमारे यांचा समावेश होता सर्वांनी ज्योतीर्लिंगा समोर आरती केली. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रकाशचंद्र पाठक यांनी केले. सिंधी व पंजाबी समाज महिला मंडळाने व्यवस्थापन केले, माहेश्वरी समाजाने प्रसाद वितरण केले.

## मंडल आयोगाच्या मागण्यांची पूर्तता होणे गरजेचे- किशोर पवार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.९ :** येथिल ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाच्या वतीने मंडल दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात मंडल आयोगाच्या ऐतिहासिक कार्याचा गौरव करत ओबीसी समाजाच्या मागण्यांवर सखोल चर्चा करण्यात आली.मंडल आयोगाच्या मागण्यांची पूर्तता होणे सामाजिक न्यायासाठी गरजेचे असल्याचे ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष किशोर पवार यांनी सांगितले.

राजर्षी शाहू महाराज सभागृहात जर कार्यक्रम पार पडला. पुढे बोलताना किशोर पवार म्हणाले, मंडल आयोगाची स्थापना १९७९ मध्ये मागासवर्गीय समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी करण्यात आली होती. बी. पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली तयार झालेल्या अहवालानुसार भारतात ओबीसी लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर असून, त्याांना २७ टक्के आरक्षण देण्याची शिफारस करण्यात आली होती. या शिफारशींमुळे ओबीसी समाजाला शिक्षण, नोकरी आणि प्रशासनात प्रतिनिधित्व मिळवण्यासाठी महत्वाचा मार्ग खुला झाला. मात्र आजही ओबीसी समाजाच्या अनेक मूलभूत मागण्या प्रलंबित आहेत. ओबीसींची स्वतंत्र जनगणना होणे अत्याावश्यक आहे, कारण याच माध्यमातून त्याांच्या वस्तुस्थितीचा अचूक अंदाज घेतला जाऊ शकतो. त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा आणि लोकसभेत राजकीय आरक्षण मिळणे ही ओबीसी समाजाच्या राजकीय सशक्तीकरणासाठी गरजेची बाब आहे. याशिवाय, आरक्षणाच्या अंमलबजावणीत होणारे अन्याय थांबवण्यासाठी उपवर्गीकरण आणि आरक्षण पुनर्रचना तातडीने करण्यात यावी. मंडल दिवसाच्या निमित्ताने ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाने या मागण्यांबाबत शासनाचे लक्ष वेधत ठोस कार्यवाही करण्याची मागणी केली. हा दिवस केवळ इतिहासाची आठवण नसून सामाजिक न्यायासाठीच्या संघर्षाचे स्मरण असून, ओबीसी समाजाच्या संविधानिक हक्कांसाठी सातत्याने लढा देण्याचा निर्धार या कार्यक्रमात व्यक्त करण्यात आला. यावेळी राज्य सल्लागार डॉ.शिवशंकर गोरे, जिल्हाध्यक्ष किशोर पवार, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख विठ्ठल इंगळे, सचिव अनिल हिस्सल, बुलडाणा तालुकाध्यक्ष गजानन पडोळ, उपाध्यक्ष निलेश डुकरे, कार्याध्यक्ष जनार्धन तेजनकर, सचिव प्रशांत डहाळे, मोताळा तालुकाध्यक्ष निळकंठ उचाडे, उपाध्यक्ष सतीश मुळे, तसेच कार्यकारिणी सदस्य संजय खांडवे, राजेंद्र धोंडगे, गजानन हुडेकर,जयंत शेलेकर, मनोहर डुकरे, राहुल बाजारे इ.सदस्य उपस्थित होते.



अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

अमरावती, रविवार, दि. १० ऑगस्ट २०२५

डॉ. पांडेस् मेड. रेमेडीज (OPC) प्रा.ली.

डॉ. रविराज पांडे (एम.डी.)

वात, दमा, अस्थमा, वजन वाढविणे, कमी करणे, त्वचा रोग, वंधत्व, लैंगिक समस्या, स्त्री रोग, सर्व प्रकारच्या व इतर रोगांवर उपचार व मार्गदर्शन केल्या जाईल.

व्यंकटेश कॉलनी, शंकरनगर जवळ, अमरावती. ( दर सोमवारी )

C/o राईकवार हॉस्पिटल जयस्तंभ चौक परतवाहा ( दर महिन्याचा 3 रा. शनिवार )

C/o महाराष्ट्र मेडिकल बनोसा रोड, दर्यापूर ( दर महिन्याचा 2 रा. गुरुवार )

वेळ : दुपारी 2 ते सायंकाळी 7 वाजेपर्यंत

मो. 9890043911, 9372151186

# रिवॉल्वर चोरणारा अट्टल चोरटा अटकेत


## मोर्शी पोलिसांची कारवाई ;१२ तासात आरोपी मुद्देमालासह ताब्यात !

अजिंक्य भारत | विकास पाटील

**मोर्शी, दि.९ :** मोर्शी येथील उपविभागीय राजस्व अधिकारी प्रदीपकुमार पवार यांच्या शासकीय निवासस्थानी टीनाच्या शेडमध्ये उभ्या असलेल्या खाजगी (क्रेटा)कारच्या काचा फोडून वैयक्तिक पिस्तूल चोरून नेणाऱ्या आरोपीचा शोध घेऊन त्याला मोर्शी पोलिसांनी अवघ्या बारा तासात जेरबंद केले.

दि.८ ऑगस्ट रोजी मोर्शी पोलीस स्टेशनच्या हद्दीत प्रदीपकुमार पवार उपविभागीय अधिकारी मोर्शी यांचे शासकीय निवासस्थान मोर्शी अमरावती रोडलगत असून त्यांच्या निवासस्थान परिसरात दुपारी २ वाजता दरम्यान प्रदीप पवार यांच्याकडे असलेली क्रेटा कार वाहन क्र. एम.एच. २९ ए.आर. ६६०० पार्किंग करून ठेवली होती.या खाजगी वाहनाचे काच फोडून वाहनातील डॅशबोर्डचे ड्रॉपमध्ये ठेवलेली सर्विस रिवॉल्वर कि. १०,०००/- रू.ची रिवॉल्वर चोरी करून तसेच शासकीय निवासस्थानाचे दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून घरातील कपाटातील कागदी रिम चोरी करून अज्ञात चोरट्याने चोरून नेली. फिर्यादीचे तक्रारीवरून पोलीस स्टेशन मोर्शी येथे अप क्र.४२९/२०२५ कलम ३०५(बी),३३१(१) ३२४ (२) भारतीय न्याय संहिताप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.





सदर गुन्ह्याचे तपासात सराईत आरोपी नामे अजय ऊर्फ राजेश गोवर्धन दांडगे वय ३६ वर्ष रा.तळणीपूर्णा ता. चांदूरबाजार जि. अमरावती हा सी.सी.टी.व्ही फुटेज मध्ये संशयास्पदरित्या वावरतांना मिळून आल्याने त्याच्याकडे गुन्ह्याचे अनुषंगाने सखोल विचारपुस केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. परंतु त्यास पुन्हा विश्वासात घेवून बारकाईने विचारपूस केली असता त्याने सर्विस रिवॉल्वर चोरून नेल्याची तसेच घरफोडी केल्याची कबुली दिली. सदर गुन्ह्यात चोरीस गेलेले सर्विस रिवॉल्वर जप्त करण्यात आले आहे.

सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलीस स्टेशन मोशीचे डी.बी. पथक, रात्रगस्त पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय मोर्शी यांनी अंत्यत कसुन व अथक प्रयत्न करून सदर गुन्हा १२ तासाच्या आत उघडकीस आणून गुन्ह्यातील चोरीस गेलेला मुद्देमाल व आरोपी यांचा शोध घेवून मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक विशाल आनंद,मा. अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत,मा. उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर,यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक राहुल आठवले ठाणेदार पो स्टे मोर्शी यांचे नेतृत्वात पो.स्टे. मोर्शी येथील सपोनि आर.टी.नांदगावकर, सपोनि लक्ष्मन चिंचोले, पोउपनि आकाश शिवणकर,सफौ गजानन सुंदरकर, पोहेकों योगेश सांभारे, पोहेको मनोज गायकी, पोहेको संदीप वंजारी, पोको स्वप्निल बायस्कर, पोकों अथर्व कोहळे, चालक पोकों अब्दुल हबीब यांनी केली आहे.

## थोडक्यात

### तीन तलवारींसह दोन चाकू जप्त

अमरावती, दि.९ : नागपुरी गेट पोलिसांनी गस्तीदरम्यान दोन युवकांकडून तीन तलवारींसह दोन चाकू जप्त केले. त्यांची अंदाजे किंमत ९ हजार रुपये आहे.अब्दुल अहेफाज अब्दुल आसीफ (२०) व अन्य एक अशा दोन युवकांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्यावर गुन्हा दाखल

अमरावती, दि.९ : कामुंजा फाटा येथे रहदारीस अडथळा निर्माण करीत मिनी ट्रक (एमएच २७-एक्स ०२९८) रस्त्याच्या मध्ये उभा केला. वलगाव पोलिसांनी याबाबत ट्रक चालक शेख सलीम शेखा बशीर (५३) याच्यावर गुन्हा नोंदवला.

### बजरंग टेकडी परिसरात जुगारावर कारवाई

अमरावती, दि.९ : गुप्त माहितीच्या आधारे राजापेठ पोलिसांनी बजरंग नगर टेडकडीकडे जाणाऱ्या मार्गावर सुरू असलेल्या जुगारावर धाड टाकून एकूण ४ हजार २० रुपयांचे साहित्य जप्त केले. या प्रकरणी सौरभ प्रकाशराव माहोरे (३५) व पप्पु राजेंद्रप्रसाद पांडे (६५) यांच्यावर गुन्हा दाखल केला.

### साडे तीन हजारांची दारू जप्त

अमरावती, दि.९ : शहरात तीन वेगवेगळ्या ठिकाणी अवैध दारूवर कारवाई करीत पोलिसांनी एकूण ३ हजार ७९५ रुपयांची दारू जप्त केली. ही कारवाई गाडगे नगर पोलिसांनी छत्रसाल नगर, वलगाव पोलिसांनी नांदुरा, तर भातकुली पोलिसांनी जसापूर येथे केली.

### लग्नाची गळ घालत केला विनयभंग

**मोर्शी, दि.९ :** तू माझ्यासोबत लग्न कर. तू माझी नाही तर कुणाची नाही, दुसरीकडे लग्न केल्यास तुझे लग्न तोडेन, अशी धमकी युवकाने युक्तीच्या अंगणात येवून तिला दिली. १९ वर्षीय ीने दिलेल्या तक्रारीवरून मोर्शी पोलिसांनी रोहित ढोले (२२) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### अरुण रौराळे यांना डॉक्टरेट पदवी जाहीर

अमरावती, दि.९ : आंबेडकरी विचारवंत अरुण



रामराव रौराळे यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विषयातील प्रथम डॉक्टरेट पदवी जाहीर झाली आहे. त्यांच्या प्रबंधाचा विषय होता आधुनिक भारताच्या जडणघडणीत डॉ. आंबेडकर यांचे विचार व कार्याचे योगदान - एक ऐतिहासिक अध्ययन (१८९१-१९५६). २३ जून २०२५ रोजी अंतिम मौखिक परीक्षा यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर विद्यापीठाने पदवी जाहीर केली. संशोधनात डॉ. आंबेडकरांचे सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक योगदानाचा सखोल अभ्यास करण्यात आला असून, त्यांचे विचार सर्व भारतीय समाजाच्या प्रगतीसाठी असल्याचे अधोरेखित झाले आहे. या कार्यात मार्गदर्शक डॉ. चंद्रकांत सरदार यांच्यासह अनेक मान्यवरांचे सहकार्य लाभले. लवकरच त्यांच्या संशोधनावर आधारित आधुनिक भारताचे राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पुस्तक प्रकाशित होणार आहे. त्यांच्या यशाबद्दल आंबेडकरी व बहुजन चळवळीतील मान्यवरांनी अभिनंदन केले.

# आंतरराज्य सायबर टोळीचा पर्दाफाश

## विदेशी लिंक तपासाच्या कक्षेत

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.९ :** ऑनलाईन नोकरीचे आमिष दाखवत नागरिकांची लाखोंची फसवणूक करणाऱ्या आंतरराज्यीय सायबर टोळीचा पर्दाफाश करत सायबर पोलिसांनी मोठी कामगिरी केली आहे. गुजरात आणि राजस्थान येथून चार आरोपींना अटक करण्यात आली असून, या गुन्ह्याच्या मुळाशी विदेशी कनेक्शन असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

सदर कारवाई अंजनगाव सुर्जी येथील एका नागरिकाच्या तक्रारीवरून सुरू झाली. १४ जुलै रोजी दिलेल्या फिर्यादीत, टेलीग्राम या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एका अनोळखी व्यक्तीने संपर्क साधून ऑनलाईन जॉबचे आमिष दाखवले. सुरुवातीला एका साध्या टास्कच्या मोबदल्यात ९७० रुपयांचा नफा मिळाल्याने तक्रारदाराचा विश्वास बसला. त्यानंतर वाढत्या परताव्याच्या लालसेने त्याच्याकडून २४ जूनपर्यंत एकूण ३ लाख ५६ हजार ४०३ रुपये वेगवेगळ्या बँक खात्यांवर ट्रान्सफर करवून घेण्यात आले.

मात्र काही दिवसांनी संपर्क तुटला आणि फसवणुकीची खात्री झाल्यानंतर तक्रारदाराने पोलिसात धाव घेतली. या तक्रारीवरून अंजनगाव सुर्जी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आणि त्याचा तपास सायबर पोलिस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. सायबर पोलिसांनी तांत्रिक तपासाद्वारे आरोपींनी वापरलेली बँक खाती, मोबाईल नंबर, डिजिटल ट्रांझेंक्शन्स यांची सखोल तपासणी करून गुजरात व राजस्थान येथे

शोधमोहीम राबवली. त्यातून अंकीत बोरीया, दर्शन रावल (जमनगर, गुजरात) आणि गुरवीनसिंग खोकर, भावेश गिरी (जोधपूर, राजस्थान) या चार आरोपींना अटक करण्यात आली. पोलिसांनी या कारवाईत ४ लाखांचा मुद्देमाल जप्त केला असून, यामध्ये मोबाईल हँडसेट आणि युएसडीटी (क्रिप्टोकरन्सी) चा समावेश आहे. या टोळीचे काही सदस्य अजूनही फरार असून, फसवणूक झालेला पैसा परदेशातील खात्यांमध्ये ट्रान्सफर झाला असल्याची शक्यता तपासात पुढे आली आहे.

### पोलिसांची कारवाई आणि यशस्वी समन्वय

ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. गुन्हे शाखेचे निरीक्षक किरण वानखडे, पोलिस निरीक्षक गोपाल उपाध्याय, एपीआय विलास सानप, पीएसआय सुनिल बनसोड, तसेच सायबर युनिटमधील प्रविण वानखडे, अजित राठोड, सागर धापड, अश्विन यादव, सरिता चौधरी आणि अन्य पोलिस कर्मचाऱ्यांनी तपासात मोलाची भूमिका बजावली. अंजनगाव सुर्जी पोलिस ठाण्याचे पीएसआय अनिल सावळे आणि हवालदार युवराज सोळंके यांनी देखील महत्त्वपूर्ण माहिती उपलब्ध करून दिली.

# राहुल तायडेची तुरूंगात रवानगी

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.९ :** फ्रेजरपूरा पोलिस ठाण्यात कार्यरत असलेल्या महिला पोलिस कर्मचारी आशा धुळे (तायडे) यांच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणात नवे वळण आले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी राहुल तायडे याला पुन्हा एकदा एमसीआर (मॅजिस्ट्रेट कस्टडी रिमांड) अंतर्गत तुरुंगात पाठवण्यात आले आहे. याआधी त्याला पीसीआर (पोलिस कोठडी) संपल्यानंतर तुरुंगात ठेवण्यात आले होते. मात्र, पुढीलतपासासाठी पोलिसांनी न्यायालयात पुन्हा अर्ज करून एमसीआर मिळवला. या प्रकरणात आतापर्यंत ४ आरोपींना अटक झाली असून, त्यांच्याकडून पोलिस चौकशी सुरू आहे. अटकेत असलेल्या काही आरोपींनी महत्त्वाची माहिती दिली आहे. राहुल आणि त्याच्या मैत्रिणीमधील व्हॉट्सॲप चॅट्सची तपासणी, तांत्रिक पुरावे गोळा करण्यासाठी पोलिसांनी पुन्हा कोठडीची मागणी केली होती.

# वादळात तुटलेली तार दुरुस्त न केल्याने शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

## वीज वितरण कंपनीचे दुर्लक्ष

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नांदगाव पेठ, दि.९ :** मे महिन्यामध्ये झालेल्या वादळामुळे नांदगाव पेठ उपकेंद्र अंतर्गत येणाऱ्या धर्मे डीपीवरील वीजपुरवठ्याची तार तुटल्यामुळे परिसरातील शेकडो शेतकऱ्यांचा विद्युत पुरवठा खंडित झाला असून शेतकऱ्यांना लाखोंचा फटका बसत आहे.जवळपास तीन महिने उलटूनही वीज वितरण कंपनीकडून अद्याप तुटलेल्या तारेला बदलून नवीन तार बसविण्याचे काम करण्यात आलेले नाही. या गंभीर निष्काळजीपणामुळे शेतीपिकांवर मोठे संकट ओढावले असून शेतकऱ्यांच्या जीवितास देखील धोका निर्माण झाला आहे. धर्मे डीपीवरून वीजपुरवठा करण्यात येत असलेल्यर तार अत्यंत जुन्या , गंजलेल्या आणि निकृष्ट अवस्थेत असून मागील चार ते पाच वर्षांपासून दरवर्षी चार-पाच वेळा ती तुटत आहे. या धोकादायक तारेमुळे कधीही विजेचा धक्का लागून जीवितहानी होण्याची शक्यता असूनही वीज विभागाने अजूनही दुरुस्तीची तसदी घेतलेली नाही.नांदगाव पेठ उपकेंद्राचे सहा अभियंता बेहरे यांना शेतकऱ्यांनी वारंवार भेटून आणि फोनवर संपर्क साधून तक्रारी केल्या.

मात्र, दोन दिवसांत करतो, चार दिवसांत नवीन तार बसवतो अशा आश्वासनावरच शेतकऱ्यांची बोळवण करण्यात येत आहे. शेतांमध्ये सध्या संत्रा, आंबिया बहाराची फळे, भाजीपाला, तसेच गहू, सोयाबीन आणि कपाशीची पिके आहेत. वीजपुरवठा



बंद असल्यामुळे लाखोंचे नुकसान होण्याची शक्यता असून बहुतांश शेतकरी हे अल्पभूधारक असल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढावले आहे. काही शेतकरी टोकाचे पाऊल उचलण्याच्या तयारीत असल्याची गंभीर माहिती समोर आली आहे.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी अधीक्षक अभियंता, वीज वितरण कंपनी, अमरावती यांना लेखी निवेदन देऊन तात्काळ नवीन तार बसवून वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली आहे अन्यथा परिसरातील शेतकरी आक्रमक पवित्रा घेतील असा इशारा प्रमोद गुलाबराव धर्मे, विनोद फकीरजी भोपळे, प्रमोद फकीरजी भोपळे, अरविंद देशमुख, सुरेश शामरावजी भोपळे, रामदास फकीरजी भोपळे, बाळू फकीरजी भोपळे, श्रावण फकीरजी भोपळे, सूर्यभान गोविंदराव सुरजुसे, मोरेश्वर काशीरावजी इंगोले, नरेंद्र जगन्नाथराव इंगोले, प्रवीण काशीरावजी इंगोले, रामराव मारोतराव भोपळे आदी शेतकऱ्यांनी दिला आहे.

# बेसखेड्यात उधळणार दोडक्याच्या भाजीचा सुगंध, रोडग्यांचा धूर!

## तिसऱ्या श्रावण सोमवारी बालब्रह्मचारी चंद्रपुरी महाराजांच्या जिवंत समाधीच्या परंपरेला शेकडो भाविकांचा प्रतिसाद

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**चांदूर बाजार, दि.९ :** चांदूरबाजार तालुक्यातील आळवळण येथील श्री क्षेत्र बेसखेडा गावात दरवर्षी तिसऱ्या श्रावण सोमवारी उधळण होते, ती दोडक्याच्या भाजीचा सुगंध आणि रोडग्याच्या धुराची. या दिवशी परिसरातील, जिल्ह्यातीलच नव्हे तर राज्याच्या कानाकोपऱ्यातील भाविकही हजारोंच्या संख्येने येथे दाखल होतात. नोकरदार, व्यापारी, शेतकरी कोणीही असो, श्रावणातील हा दिवस सोडून कोणीही रहात नाही.








ही परंपरा आठव्या दशकात बालब्रह्मचारी चंद्रपुरी महाराजांनी घालून दिली. प्लेगच्या भीषण साथीनं त्रस्त झालेल्या गावकऱ्यांना वाचवण्यासाठी गोसाव्याच्या रूपाने प्रकटलेल्या महाराजांनी देवीसमोर प्रार्थना करून, साथ संपल्यास जिवंत समाधी घेण्याचा प्रण केला. देवीच्या कृपेने रोग नष्ट झाला आणि श्रावणाच्या तिसऱ्या सोमवारी महाराजांनी हनुमान मंदिर परिसरात समाधी घेतली. समाधीपूर्वी त्यांनी गावकऱ्यांना दोडक्याची भाजी आणि रोडग्याचा प्रसाद वाटण्याची परंपरा सुरू केली, जी आजपर्यंत अखंड सुरू आहे.

बेसखेड्याच्या या धार्मिक परंपरेत महिलांना महाप्रसाद ग्रहण करणे वर्ज आहे, मात्र त्या देवीपूजेत सहभागी होतात. गावात देवीचा मोठा उत्सव साजरा न करता, साध्या पूजनानंतरच नैवेद्य अर्पण केला जातो.

आज या तीर्थस्थळाचा विकास बच्चू कडू यांच्या प्रयत्नांमुळे झाला आहे. त्यांच्या पुढाकाराने श्री क्षेत्र बेसखेडाला तीर्थक्षेत्राचा ब दर्जा मिळाला असून, पाच कोटींच्या निधीतून भव्य मंदिर सभागृह, भक्तनिवास, स्वयंपाकगृह, वाचनालय, व्यायामशाळा उभारण्यात आली आहेत. तसेच रस्ते, नाले आणि गावाचे सौंदर्यकरणाची कामे पूर्ण झाली आहेत.या दिवशी गावकरी एकजुटीने काम करून हजारो भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करतात. परिसरातील भक्त या दिवसाची आतुरतेने वाट पाहतात कारण हा फक्त प्रसादाचा नव्हे तर श्रद्धा, एकजूट आणि परंपरेचा सोहळा असतो.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, रविवार, दि. १० ऑगस्ट २०२५



## थोडक्यात

### लग्नाचे आमिष देऊन लैंगिक शोषण

अमरावती, दि.९ : लग्नाचे आमिष देत युवकाने युवतीचे लैंगिक शोषण केले. शिवीगाळ करीत मारपीट केले. फोटो व व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी दिली. युवतीच्या तक्रारीवरून नांदगाव पेठ पोलिसांनी रितेश घनश्याम भुतडा (४२) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### तडीपारास अटक

अमरावती, दि.९ : तडीपार युवक शहरात आला असून तो त्याच्या घरी असल्याची गुप्त माहिती नांदगाव पेठ पोलिसांना मिळाली. पोलिसांनी कारवाई करीत त्याला ताब्यात घेतले. अक्षय रमेश वानखडे (३०) असे ताब्यात घेतलेल्या तडीपाराचे नाव असून त्याच्यावर गुन्हा नोंदवला.

### चोरीच्या घटनेत ४८ हजारांचा ऐवज लंपास

अमरावती, दि. ९ : फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या राहुल नगर येथे घरी कुणी नसताना अज्ञाताने घर फोडून ४० हजारांचा व बडनेरा पोलीस क्षेत्रातील बायपास मार्गावरील एका बांधकामावर उभ्या असलेल्या ट्रकच्या दोन बॅटरी चोरट्यांनी चोरून नेल्या. चोरी संदर्भात राजु देवराव लायबर (५५, रा. राहुल नगर) यांनी फ्रेजरपुरा, तर संदीप दिगांबर कदम (४०, रा. बेनोडा जहागीर) यांनी बडनेरा पोलिसात तक्रार नोंदवली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### शहरात दोन वेगवेगळे अपघात; एक जखमी

अमरावती, दि.९ : काँग्रेस नगरकडून राहुल नगर गेटकडे जात असलेल्या महिलेच्या दुचाकीला भरधाव दुचाकीने (एमएच ३१-डीएफ ६५९५) धडक दिली. त्यात महिलेच्या दुचाकीचे नुकसान झाले. याबाबत तिने फ्रेजरपुरा पोलिसात फिर्याद दिली, तर हॉटेल दिल्ली दरबारपुढे मागुन येणाऱ्या दुचाकीने दिलेल्या धडकेत एकाच्या पायाला गंभीर दुखापत झाली. याबाबत गाडगे नगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शस्त्राच्या धाकावर धमकावणाऱ्यावर गुन्हा दाखल

अमरावती, दि.९ : प्रशांत नगर बगीच्याजवळ हातात शस्त्र घेवून नागरिकांना धमकावणाऱ्या आशिष उर्फ छावा महादेवराव इंगोले (२८) याच्यावर फ्रेजरपुरा पोलिसांनी गुन्हा दाखल करीत त्याच्याजवळून चाकू जप्त केला.

### मीटरमध्ये छेडछाड करीत विजेची चोरी

अमरावती, दि.९ : मीटरमध्ये छेडछाड करून वीजेची चोरी केल्याची घटना झाकीर कॉलनी येथे मीटर तपासणी दरम्यान समोर आली. याबाबत महावितरणचे कार्यकारी अभियंता राजेश नारायणराव श्रीवास (५२) यांनी दिलेल्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी अब्दुल लतीफभाई गतरभाई (६०) यांच्यावर गुन्हा दाखल केला.

### हातात शस्त्र घेवून फिरणाऱ्यावर गुन्हा

अमरावती, दि.९ : हाजरा नगर येथे हाता शस्त्र घेवून फिरणाऱ्या व आरडाओरड करीत परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या युवकाला नागपूरी गेट पोलिसांनी ताब्यात घेत त्याच्यावर गुन्हा नोंदवला. फारुख खान उर्फ शहारुख ब्लॅक समशेर खान (३५) असे गुन्हा दाखल झालेल्या युवकाचे नाव आहे.

# कृषी अधिकाऱ्यांचा शेतकऱ्यांसोबत दुजाभाव!

## शेतकऱ्यांची तालुका कृषी अधिकारी नरेंद्र वसुकर यांचेवर कारवाईची मागणी | परदेशातील शेती अभ्यासासाठी दोन शेतकऱ्यांचे अर्ज पाठविलेच नाही

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

अंजनगाव सुर्जी, दि.९ : कृषी विस्तार कार्यक्रमाद्वारे शेतकऱ्यांना परदेशातील शेती,तेथील तंत्रज्ञान आणि उत्पादकता वाढविण्यासाठी शेती अभ्यासासाठी दरवर्षी परदेश दौरा शासनामार्फत आयोजित करण्यात येतो, यामध्ये शेतीचा दर्जा,उत्पादन क्षमता, शेती घटकाबाबत जगात होत असलेले नवनवीन बदल विकसित तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे यामागील उद्देश असून यासाठी कृषी विस्तार कार्यक्रमाद्वारे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी ह्या परदेश दौऱ्याचे आयोजन करण्यात येते.या दौऱ्यासाठी शासन करोडो रुपये खर्च करून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे ज्ञान मिळावे व शेतकरी प्रगत व्हावा या दृष्टीने शासनाचे वतीने पात्र व इच्छुक शेतकऱ्यांकडून अर्ज मागवून घेतले होते,त्यानुसार अंजनगाव सुर्जी तालुक्यामधून



सात शेतकऱ्यांनी अर्ज दाखल केले होते, त्यामधून कृषी अधिकारी नरेंद्र वसुकर यांनी सात पैकी पाच शेतकऱ्यांचे अर्ज जिल्हा कृषी कार्यालयात पाठविले मात्र दोन शेतकऱ्यांचे अर्ज त्यामध्ये महिला शेतकरी सौ.सुनीता मनोहर मुरकुटे व रविकांत अरुण गोबरे या दोन शेतकऱ्यांचे अर्ज जिल्हा कृषी कार्यालयाकडे पाठविले नाही.

ह्या शेतकऱ्यांनी सर्व कागद पत्रांची पूर्तता करून तालुका कृषी अधिकारी नरेंद्र वसुकर यांच्याकडे 31 जुलै पूर्वी अर्ज दाखल केले होते. सदरच्या एकूण अर्जांपैकी पात्र लाभार्थी यादी ही दिनांक 6 ऑगस्टला लकी ड्रॉ द्वारे घोषित करण्यात आली व ती घोषित झाली सुद्धा परंतु सुनीता मुरकुटे व रविकांत गोबरे यांचे अर्ज हे सदरच्या पात्र लाभार्थी यादीच्या लकी ड्रॉ योजनेमध्ये तालुका कृषी अधिकारी नरेंद्र वसुकर यांनी हेतू परस्परपणे सादर केले नसल्यामुळे सौ.सुनीता मनोहर मुरकुटे व रविकांत गोबरे यांचे वर परदेश दौऱ्यापासून वंचित राहण्याची वेळ आली आहे.

त्यामुळे शेतकरी रविकांत गोबरे व सुनीता मुरकुटे यांनी कृषी अधिकारी यांनी जाणीवपूर्वक दूजाभाव केल्याचा आरोप केला आहे.यावरून कृषी विभाग व संबंधित अधिकारी शेतकऱ्यांप्रती किती जागृत आहेत हे दिसून आले आहे.

### दोषी कर्मचाऱ्यावर कारवाई करणार

याबाबत कृषी अधिकारी नरेंद्र वसुकर यांना विचारणा केली असता अर्ज ३१ ऑगस्टला आले नंतर सुट्टी आली,माझी तब्येत खराब होती, आणि ५ तारखेला आमच्या कर्मचाऱ्याने जिल्हा कृषी कार्यालयाच्या ईमेल वर राहिलेल्या ह्या शेतकऱ्यांचे अर्ज पाठविले व त्या कर्मचाऱ्याला डाग घेऊन प्रस्तावं घेऊन जाण्यास सांगितले परंतु त्याने ते काम केले नाही त्यांचेवर कार्यवाही करणार असे सांगितले.

# विजय राऊत यांच्या पेंटिंगची ६४ व्या राष्ट्रीय कला प्रदर्शनीसाठी निवड

अजिंक्य भारत |प्रतिनिधी

**अमरावती, दि.९ :** अमरावती येथील ॲनिमेशन बायोइंजिनिअरींग आणि रिसर्च सेंटरचे प्राचार्य तथा महाराष्ट्रातील ख्यातनाम चित्रकार विजय राऊत यांच्या क्विन्स अबोड २ या मिक्स मीडिया मधे तयार केलेल्या पेंटिंगची निवड महाराष्ट्रातून दिल्ली येथे ललित कला अकॅडमी तर्फे होत असलेल्या ६४ व्या राष्ट्रीय कला प्रदर्शनीसाठी निवड झालेली आहे .

५ ऑगस्ट रोजी केंद्र सरकारच्या ललित कला



अकादमीच्या वतीने दिल्ली येथे ६४ व्या राष्ट्रीय कला प्रदर्शनीचे उद्घाटन केंद्रीय पर्यटन व सांस्कृतीक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांच्या हस्ते करण्यात आले आहे. या प्रदर्शनीसाठी देशभरातून तब्बल ५५०० हून अधिक चित्रांच्या एंट्रीज प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी केवळ २५० पेंटिंग्जची निवड ज्युरीमार्फत या प्रदर्शनीसाठी झाली असून महाराष्ट्रातून निवडक पेंटिंग्जमध्ये विजय राऊत यांनी रेखाटलेल्या पेंटिंगची निवड या कलाप्रदर्शनीसाठी करण्यात आली आहे. ५ ऑगस्टपासून दिल्ली येथे सुरू असलेल्या या प्रदर्शनीत हे पेंटिंग देशभरातील कला प्रेमींसाठी बघण्यासाठी ठेवण्यात आले असून १५ सप्टेंबर पर्यंत ही प्रदर्शनी दिल्ली येथे सुरू राहणार आहे. दी बॉम्बे आर्ट सोसायटी ,मुंबईचे माजी अध्यक्ष असलेल्या विजय राऊत यांची महाराष्ट्रातच नव्हे तर देशभर ख्याती असून देशातील अनेक दिग्गज नेते, खेळाडू, अभिनेते, उद्योगपती यांच्या घरी तसेच कार्यालयांमध्ये विजय राऊत यांनी काढलेल्या पेटिंग्ज लागल्या आहेत. तसेच त्यांनी अनेक राज्य तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील आर्ट आणि अनिमेशन फिल्म साठी पुरस्कार देखील मिळविले आहेत ज्यामध्ये फिक्की इंटरनॅशन फिल्म फेस्टिव्हल ,दादासाहेब फाळके पुरस्कार ,जर्मनी येथील लेंसस्टार लँटीक्युलर अवार्ड सामील आहे .दिल्ली येथील कला प्रदर्शनीसाठी त्यांच्या पेटिंगची पुन्हा एकदा निवड झाल्याने जिल्हयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला.

# रामतीर्थ ग्रामपंचायतमध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान यशस्वी

अजिंक्य भारत |प्रतिनिधी

**दर्यापूर, दि.९ :** रामतीर्थ, १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट संपूर्ण राज्यामध्ये महसूल सप्ताह पार पडत आहे. त्या अनुषंगाने दर्यापूरच्या रामतीर्थ ग्रामपंचायत येथे सुद्धा महसूल सप्ताह निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आली आहे. ४ ऑगस्ट रोजी ग्रामपंचायत रामतीर्थ या ठिकाणी महसूल सप्ताह 2025 अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराज



महाराजस्व अभियान राबविण्यात आले आहे. यावेळी शासनाच्या विविध योजनेबद्दल माहिती तलाठी गव्हाळे यांनी दिली आहे. ग्रामपंचायत सरपंच योगिता ताई शेळके, ग्रामसेवक दिनेश टोळे, ग्राम महसूल अधिकारी रामतीर्थचे प्रथमेश गुल्हाने, सुकळीचे तलाठी पंकज गव्हाळे, बांबूचे तलाठी चंद्र हास्य सुलताने, लासुर चे तलाठी राजश्री इंदुरकर, नांदरूनचे तलाठी सरिता राजपूत, कोतवाल निरंजन चव्हान तसेच महसूल सेवक उपस्थित होते.

# बेनोडा ( शहीद ) येथे संगीतमय श्री रामायण ज्ञानयज्ञ सप्ताह

## श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

अजिंक्य| भारत प्रतिनिधी

**बेनोडा ( शहीद ), दि.९ :** श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळ्यानिमित्त बेनोडा (शहीद) येथे ७ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत संगीतमय श्री रामायण ज्ञानयज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी ३ ते सायंकाळी ६ या वेळेत रामायणाचार्य ह.भ.पं. श्री पुरुषोत्तमराव भेले गुरुजी यांच्या अमृतवाणीतील संगीतमय प्रवचनाने गावात भक्तिमय वातावरण रंगणार आहे.कार्यक्रमाचे आयोजन श्री राधाकृष्ण मंदिरात करण्यात आले असून, आयोजक म्हणून श्री गुणवंतराव जिचकार, श्री शरदराव जिचकार व श्री हेमंत जिचकार कार्यरत आहेत. व्यवस्थापक म्हणून रोशन भलावी, गणेश खेकाळे, बाबुराव गोडबोले, विजय पोटोडे हे काम पाहत आहेत.

**कार्यक्रमाची रूपरेषा अशी**

६ ऑगस्ट - सकाळी ९ वाजता श्री हनुमान अभिषेक मोरेश्वरराव दिघेकर, राधाकृष्ण मूर्ती अभिषेक गणेश खेकाळे यांच्या हस्ते करण्यात आला.

७ ऑगस्ट - सकाळी ९ वाजता भागवत सप्ताह तीर्थ स्थापना (श्री गुणवंतराव जिचकार हस्ते), दुपारी 3 ते 6 प्रवचन.

8 ते 15 ऑगस्ट- दररोज दुपारी ३ ते ६ संगीतमय रामायण प्रवचन.

१० ऑगस्ट - रात्री ८ ते १० सत्संग (बलजीतसिंग महाराज प्रचारक).१५ ऑगस्ट रात्री १० ते १२.३० भजन

16 ऑगस्ट - सकाळी ११ ते १ काल्याचे कीर्तन (ह. भ. पं. श्री दिलीप महाराज फरकाडे), दुपारी 1 ते 4 महाप्रसादाचे वितरण होईल.

# श्रावणबाळ व संजय गांधी निराधार योजनेचे पैसे थकीत

## निराधारांचा संताप जगावं की मरावं ? महाडीबीटीमुळे त्रस्त नागरिकांचा सवाल

अजिंक्य भारत |प्रतिनिधी

**बेनोडा ( शहीद ), दि.९ :** येथील वयोवृद्ध, निराधार व विधवा महिलांना गेल्या सहा महिन्यांपासून श्रावणबाळ व संजय गांधी निराधार योजनेचे पैसे मिळाले नाहीत. महाडीबीटी प्रक्रियेमुळे या लाभार्थ्यांचे पैसे खात्यात जमा होत नसल्याने त्यांना उपासमारीची वेळ आली आहे.

योजनेअंतर्गत मिळणाऱ्या आर्थिक मदतीवरच आपला गुजराण चालणारे अनेक वयोवृद्ध व निराधार नागरिक पैशाअभावी अत्यंत हालाखीचे जीवन जगत



आहेत. आधार लिंक व अपडेटसंबंधी तांत्रिक अडचणी, बँक व तहसील कार्यालयाच्या वारंवार चकरा, आणि सहा महिन्यांपासून लाभ न मिळाल्याने नागरिकांचा संताप वाढला आहे. शासनाच्या या महाडीबीटीमुळे जगावं की मरावं, हा प्रश्न आमच्यासमोर उभा राहिला आहे, असे पीडितांनी सांगितले.

या संदर्भात नायब तहसीलदार वरूड पंकज चव्हाण, जिल्हाधिकारी अमरावती, तसेच पालकमंत्री अमरावती चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात सहा महिन्यांपासून थकलेले पैसे तात्काळ जमा करण्याची व समस्या कायमस्वरूपी सोडवण्याची मागणी करण्यात आली.निवेदन सादरीकरणावेळी पुरुषोत्तम पोटोडे, सुखदेव चरपे, धीरज बारस्कर, किशोर धनोडे, विशाखा बारस्कर, चंद्रकला युवनाते, अरुणा फरकाडे, दिनेश जोशी आदी उपस्थित होते.

# गटशिक्षण अधिकाऱ्यांच्या अचानक भेटीत सहा शिक्षक लेटलतीफ

## अधिकारी संतप्त | शिक्षकांच्या शिस्तीबाबत अजूनही दुटप्पीपणा दिसून येतो

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**नांदगाव पेठ, दि.९ :** शासनाच्या शिक्षण विभागामार्फत ग्रामीण भागातील शाळांमध्ये गुणवत्ता सुधारण्यासाठी विविध उपाययोजना राबवल्या जात आहेत. मात्र, शाळांतील शिक्षकांच्या शिस्तीबाबत अजूनही दुटप्पीपणा दिसून येतो. याच पार्श्वभूमीवर अमरावती पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी बोडखे आणि शिक्षण विस्तार अधिकारी खोडे यांनी आज येथील जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाला अचानक भेट दिली असता या अनपेक्षित भेटीदरम्यान शाळेतील सहा शिक्षक लेटलतीफ आढळले.

सहा शिक्षक निर्धारित वेळेच्या तब्बल अर्धा तास उशिरा उपस्थित झाल्याचे निष्पन्न झाले. शाळेचा ठरलेली निर्धारित वेळ सकाळी १०.३० असूनही शिक्षक उशिरा आल्याने अधिकाऱ्यांनी शाळेचे प्राचार्य देवेंद्र ठाकरे यांच्याकडे याबाबत जाब विचारला.गटशिक्षण





अधिकारी बोडखे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, सर्व शिक्षकांनी वेळेचे काटेकोर पालन करणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांना वेळेवर आणि शिस्तबद्ध शिक्षण देणे ही प्राथमिक जबाबदारी आहे. यावेळी त्यांनी सर्व शिक्षकांना तात्काळ वेळेच्या शिस्तीचे पालन करण्याचे निर्देश दिले.

यावेळी भेटीदरम्यान माजी जिल्हा परिषद सदस्य नितीन हटवार, शाळा समितीचे माजी अध्यक्ष अरुण राऊत, तसेच पालक मनोज मोरे हे देखील उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी शाळेच्या कार्यप्रणालीचा आढावा घेत विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रम, उपक्रम, व त्यांच्या अडचणी याबाबत माहिती घेतली.यावेळी नितीन हटवार यांनी पालक, शिक्षक आणि लोकप्रतिनिधींमध्ये समन्वयाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सक्षम शिक्षण देण्यासाठी सर्व घटकांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक असल्याचे मत हटवार यांनी व्यक्त केले. जिल्हा परिषदेच्या शाळा सक्षम व आकर्षक बनाव्यात. जिल्हा परिषदेच्या शाळेचा दर्जा उंचावत राहिला, तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा कल खासगी शाळांऐवजी जिल्हा परिषदेच्या शाळांकडे वाढेल, आणि शिक्षण अधिक समृद्ध होईल,असे मत नितीन हटवार यांनी व्यक्त केले.या ठिकाणी अकरावी व बारावीला मंजूर तीन पदे असताना केवळ एक शिक्षक या ठिकाणी कार्यरत आहे त्यामुळे उर्वरित दोन पदे ताबडतोब भरण्याची विनंती देखील यावेळी नितीन हटवार यांनी अधिकाऱ्यांकडे केली.

# वणीत अवैध धंद्यांचे जाळे?

## अवैध दारू, मटका, कोळसा तस्करी जोमात, तरुण पिढी गुन्हेगारीच्या वाटेवर

**वणी, दि. ९ प्रतिनिधी**

**शहरासह परिसरात अवैध धंद्यांनी अक्षरशः कळस गाठला असून, 'भाईगिरी'च्या वेडात तरुण पिढी गुन्हेगारीच्या दिशेने भरकटत चालली आहे. अवैध दारू विक्रीपासून ते कोळसा तस्करीपर्यंत अनेक अवैध व्यवसाय फोफावले असून, गुन्हेगारांना पोलिसांचा धाकच उरला नाही का, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. यावर अंकुश लावण्याचे मोठे आव्हान पोलिस प्रशासनासमोर उभे ठाकले आहे.**

जिल्ह्यातील एक महत्त्वाचा तालुका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वणीत, सध्या अवैध धंद्यांचे जाळे पसरले आहे. अवैध दारू विक्री, तंबाखू तस्करी, मटका, जुगार आणि अवैध कोळसा तस्करी यांसारखे व्यवसाय जोमात सुरू आहेत. दिवसागणिक अवैध व्यावसायिक गब्बर होत चालले असून, त्यांना कोणाचाही धाक उरलेला नाही. याशिवाय, वाहनांची तोडफोड, बनावट विक्रीपत्रांच्या आधारे फसवणूक यांसारख्या घटनांनीही डोके वर काढले आहे. गुन्हेगार गुन्हा करून सहज सुटतो आणि पुन्हा गुन्हा करण्यास तयार होतो, अशी धक्कादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. या सर्व प्रकारावर पोलिस विभागाचा कोणताही वचक राहिला नाही का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या गंभीर परिस्थितीमुळे शहराची प्रतिमा मलिन होत असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. प्रशासनाने यावर तत्काळ कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. वणीतील वाढत्या गुन्हेगारीमुळे, पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गुन्हेगार गुन्हा करून सहज सुटतो आणि पुन्हा गुन्हा करण्यास तयार होतो, ही परिस्थिती चिंताजनक आहे. पोलिसांची गुन्हेगारांवर कोणतीही वचक राहिली नाही का, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. या फोफावलेल्या अवैध धंद्यांवर आणि 'भाईगिरी'वर अंकुश लावणे, हे पोलीस विभागासमोर मोठे आव्हान असल्याची चर्चा जनमानसात आहे.

### अवैध धंद्यांचे 'माहेरघर'?

**■ वणी शहर आणि परिसर सध्या अवैध धंद्यांचे 'माहेरघर' बनत चालले आहे. अवैध दारू विक्री, तंबाखू आणि सुगंधित सुपारीची तस्करी, मटका आणि जुगाराचे अड्डे, अवैध कोळसा तस्करी आणि कोंबड बाजार यांसारखे अनेक अवैध धंदे येथे फोफावले आहेत. या व्यवसायांमुळे गुन्हेगारी प्रवृत्तींना बळ मिळत असून, सामाजिक स्वास्थ्य धोक्यात आले आहे. या सर्व अवैध धंद्यांवर अंकुश लावण्याची मोठी जबाबदारी आता पोलिस विभागावर आहे.**

### भाईगिरीचे भूत

**■ वणी शहरातील तरुण पिढी 'भाईगिरी'च्या आकर्षणापायी गुन्हेगारी प्रवृत्तीकडे ओढली जात आहे. किरकोळ वादातून हाणामाऱ्या करणे, दहशत माजविणे यांसारखे प्रकार वाढले आहेत. या 'भाईगिरी'च्या भुतामुळे अनेक तरुणांचे भविष्य अंधारात जात आहे. याशिवाय, मटका, जुगार आणि दारू यांसारख्या व्यसनांच्या आहारी जाऊन, अल्पवयीन मुलेही गुन्हेगारीच्या दलदलीत फसत आहेत. यावर वेळीच नियंत्रण न मिळवल्यास, परिस्थिती हाताबाहेर जाण्याची भीती व्यक्त होत आहे.**

# जिल्ह्यातील लाखो लाडक्या बहिणी देवा भाऊंना पाठविणार 'रक्षासूत्र'

## यवतमाळ जिल्हा भाजप महिला मोर्चाचा अभिनव उपक्रम

**यवतमाळ, दि.९ प्रतिनिधी**

भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचा सण असलेल्या रक्षाबंधनाला यवतमाळ जिल्ह्यात एक भावनिक आणि अनोखे स्वरूप प्राप्त झाले आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिला सक्षमीकरणासाठी उचललेल्या पावलांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, जिल्ह्यातील लाखो भगिनींनी त्यांना 'देवा भाऊ' मानून रक्षासूत्र पाठविणार आहेत. भाजप महिला मोर्चाच्या वतीने या अभिनव उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. 'देवा भाऊ, राखीला तू बहिणीचा मान, दिले आम्हा बहिणींना सक्षमतेचे दान,' या भावनेने जिल्ह्यातील हजारो महिला या उपक्रमात सहभागी होत आहेत. 'आजपर्यंत आमच्या आर्थिक सक्षमतेचा विचार कोणी केला नाही, पण आमच्या 'देवा भाऊ'नी आम्हाला स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे बळ दिले,' अशा भावना व्यक्त करीत या भगिनींनी आपल्या लाडक्या भावाला राख्या पाठविल्या आहेत. या राख्या केवळ धागे नसून, त्या बहिणींच्या भावना आणि भक्कम पाठिंबा असल्याचे महिला मोर्चाने म्हटले आहे. माजी मंत्री मदन येरावार आणि भाजप जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल चौहान यांच्या मार्गदर्शनात हा उपक्रम राबविला जात आहे. यासाठी जिल्हा सरचिटणीस रेखा कोठेकर, प्रदेश चिटणीस माया शेरे, जिल्हा उपाध्यक्ष कीर्ती राऊत, सहसंयोजक निर्मला विनकरे आणि माधुरी केवटे यांच्यासह यवतमाळ जिल्ह्यातील महिला मोर्चाच्या सर्व पदाधिकारी सहकार्य करत आहेत, अशी माहिती नवनियुक्त जिल्हाध्यक्ष शैला मिर्झापूरे यांनी दिली आहे.



'रक्षाबंधन हे केवळ भावाच्या मनगटावर राखी बांधण्यापुरते मर्यादित नाही, तर ते बहिणीच्या सन्मानाचे आणि तिच्या पाठीशी उभे राहण्याच्या वचनाचे प्रतीक आहे. आमच्या 'देवा भाऊ'नी महिलांना आर्थिक सक्षमतेचे दान देऊन हा सन्मान खऱ्या अर्थाने जपला आहे. जिल्ह्यातील लाखो भगिनींनी पाठविलेले हे रक्षासूत्र केवळ धागे नाहीत, तर त्या त्यांच्या कृतज्ञ भावना आणि भक्कम पाठिंबा आहेत. हा सण आमच्यासाठी एका भावाने दिलेल्या विश्वासाचा आणि आदराचा उत्सव आहे.'

-**शैला मिर्झापूरे,** जिल्हाध्यक्ष, भाजप महिला मोर्चा.

## महत्वाचे

### अवैध रेती वाहतूक

मारेगाव : येथील करणवाडी फाट्यावर विनापरवाना रेतीची चोरटी वाहतूक करणाऱ्या एका टिप्परवर पोलिसांनी कारवाई करून ५ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई मंगळवारी (दि. ५) पहाटे करण्यात आली. याप्रकरणी मारेगाव पोलिसांनी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस हवालदार सिंहे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी महेश रघुनाथ कोचे (वय २७) आणि सुरज प्रकाश टोंगे (वय ३५) हे टिप्परमधून (क्र. एम.एच-३६ एम-१८२०) तीन ब्रास रेती (किंमत १५ हजार रुपये) अवैधपणे वाहतूक करत होते. पोलिसांनी रेतीसह ५ लाख रुपये किमतीचा टिप्पर जप्त केला.

### दुचाकी चोरी

**वणी :** येथील इंदिरा चौकात पाईप टाकण्याच्या वादातून दोन गटात झालेल्या मारहाणीप्रकरणी आता परस्परविरोधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना मंगळवारी (दि. ५) दुपारी घडली. याप्रकरणी वणी पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. संस्कार संजय गुरुफुडे (वय २१) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, विशाल बाबाराव खांदनकर (वय ४५) याने पाईप रस्त्याच्या बाजूला करण्याच्या कारणावरून वाद घातला. विशालने संस्कार यांच्या वडिलांना शिवीगाळ केली आणि काचेच्या तुकड्याने त्यांच्या पोटावर मारून जखमी केले, असे तक्रारीत म्हटले आहे. यापूर्वी विशाल खांदनकर यांनी गुरुफुडे कुटुंबाविरुद्ध तक्रार दिली होती. आता पोलिसांनी दोन्ही बाजूंच्या तक्रारीवरून परस्परविरोधी गुन्हे दाखल करून तपास सुरू केला आहे.

## रक्षाबंधन...



**उमरखेड : सणासुदीच्या दिवशीही समाजाच्या रक्षणासाठी कर्तव्यावर असलेल्या पोलिस बांधवांसाठी उमरखेड येथे रक्षाबंधनाचा दिवस अविस्मरणीय ठरला. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विद्यालयाच्या भगिनींनी पोलिस ठाण्यात जाऊन, कामात व्यस्त असलेल्या पोलिस बांधवांना राखी बांधून हा सण साजरा केला. यावेळी शीला दीदी, मोहना दीदी आणि पूजा दीदी यांनी पोलिस निरीक्षक शंकर पांचाळ, सहायक पोलिस निरीक्षक आशीष चौधरी, पोलिस उपनिरीक्षक अशोक जाधव, दिलीप पाटील, गणेश बोडके यांच्यासह उपस्थित सर्व कर्मचाऱ्यांना राखी बांधली. या स्तुत्य उपक्रमाने पोलिस आणि नागरिक यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक दृढ झाले असून, कर्तव्यावर असलेल्या पोलिसांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.**

### जागतिक कौशल्य स्पर्धेसाठी नोंदणी सुरू

**यवतमाळ, दि. ९ :** सन २०२६ मध्ये चीनमधील शांघाय येथे होणाऱ्या जागतिक कौशल्य स्पर्धेसाठी, जिल्हास्तरावर स्पर्धकांची निवड करण्याकरिता नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. ही जगातील सर्वात मोठी व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा मानली जाते. या स्पर्धेच्या पूर्वतयारीसाठी जिल्हा, विभाग, राज्य आणि देश पातळीवर विविध ६३ क्षेत्रांमध्ये स्पर्धा आयोजित केली जाणार आहे. निवडलेल्या उमेदवारांना जागतिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळेल. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००४ नंतरचा असावा, तर १३ विशिष्ट उच्च तंत्रज्ञान क्षेत्रांसाठी १ जानेवारी २००१ ही जन्मतारीख ग्राह्य धरण्यात येईल. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी ३० सप्टेंबरपर्यंत संकेतस्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन सहायक आयुक्त प.भ.जाधव यांनी केले आहे.

# एस. जी. जगताप यांच्या कार्याचा गौरव

## महसूल सप्ताहानिमित्त सन्मान सोहळा

**मंगरूळ, दि. ९ प्रतिनिधी**

नेर तहसील कार्यालयातील महसूल सहाय्यक एस. जी. जगताप यांचा त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल महसूल सप्ताहानिमित्त प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. विशेषतः वृद्ध नागरिकांप्रति असलेल्या त्यांच्या सेवाभावी वृत्तीची आणि प्रामाणिकपणाची प्रशासनाने दखल घेतली. त्यांच्या या सन्मानाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

महसूल सप्ताह कार्यक्रमांतर्गत, सन २०२४-२५ या वर्षात प्रशासकीय कामात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल एस. जी. जगताप यांना हे प्रशस्तीपत्र देण्यात आले. जगताप हे त्यांच्या प्रामाणिकपणा आणि विशेषतः वृद्ध नागरिकांना मदत करण्याच्या वृत्तीमुळे परिसरात ओळखले जातात. प्रकृती ठीक नसतानाही ते आपले कर्तव्य चोख बजावतात आणि कोणत्याही अडवणुकीशिवाय ज्येष्ठांची कामे मार्गी लावतात, अशी भावना अनेक नागरिकांनी व्यक्त केली आहे. गरीब-श्रीमंत असा भेद न करता, सर्वांना समानतेने मदत करण्याच्या त्यांच्या स्वभावामुळे ते लोकप्रिय आहेत. 'आपल्याकडून यापुढेही अशीच लोककल्याणाची कामे पार पाडली जावीत,' या सदिच्छेसह त्यांना सन्मानित करण्यात आले. एका प्रामाणिक कर्मचाऱ्याच्या कामाची दखल घेतल्याबद्दल नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे. या सन्मानामुळे प्रशासनातील इतर कर्मचाऱ्यांपुढे एक चांगला आदर्श निर्माण झाला आहे.

# चहांद येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमा फलकाचे अनावरण

## अनेक वर्षांचे प्रयत्न यशस्वी; जयंतीनिमित्त गावातून भव्य रॅली

**राळेगाव, दि. ९ प्रतिनिधी**



राळेगाव तालुक्यातील चहांद येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीदिनी त्यांच्या प्रतिमा फलकाचे अनावरण करण्यात आले. अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर गावातील युवकांनी हा उपक्रम यशस्वी केला असून, यानिमित्त गावातून भव्य रॅली काढून अभिवादन करण्यात आले.

चहांद येथील मातंग समाजाची संख्या अत्यल्प असल्याने, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमा फलक लावण्याचा संकल्प अखेर १ ऑगस्ट रोजी पूर्ण झाला. प्रमुख पाहुणे शंकर राऊत, चारुदत्ता पाटील, शरद कांबळे, मनमोहन चांदेकर आणि सुभाष कांबळे यांच्या हस्ते या फलकाचे अनावरण करण्यात आले. यानंतर गावातून भव्य रॅली काढण्यात आली. ही रॅली रमामाता बौद्ध विहारात पोहोचली, जिथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तथागत गौतम बुद्ध आणि अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले. तसेच, स्थानिक चौकातील भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेलाही पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी चारुदत्ता पाटील यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महेश खडसे, उत्तम खडसे, जयश्री खडसे, नैनाताई खडसे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन महेश खडसे यांनी केले तर आभार शरद कांबळे यांनी मानले. या उपक्रमाला गावातील सर्व समाजबांधवांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

# दोन बुलेट चोरणाऱ्या आंतरजिल्हा टोळीला यवतमाळमधून अटक

## राळेगाव पोलिसांची कामगिरी; अवघ्या काही दिवसांतच गुन्ह्यांचा छडा

**राळेगाव, दि.९ प्रतिनिधी**



राळेगाव शहरातून सलग दोन बुलेट मोटारसायकली चोरणाऱ्या आंतरजिल्हा टोळीला, अवघ्या काही दिवसांतच जेरबंद करण्यात राळेगाव पोलिसांना यश आले आहे. लोहारा पोलिसांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, यवतमाळ शहरातून तीन आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून चोरीला गेलेल्या दोन्ही बुलेट मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत.

पहिल्या प्रकरणात, समीर संतोषराव कोकुलवार यांची एक लाख रुपये किमतीची बुलेट (क्रं. चक ३४, एड ३२२२) चोरीला गेली होती. तर दुसऱ्या घटनेत, तुफैल जमेल शेख यांचीही एक लाख रुपये किमतीची बुलेट (क्रं. चक ४९ अढ २५४६) चोरीला गेली होती. या दोन्ही गुन्ह्यांचा तपास सुरू असताना, लोहारा पोलिसांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, राळेगाव पोलिसांनी ७ ऑगस्ट रोजी यवतमाळ शहरातून आरोपी नीलेश श्रावण मुनेश्नर (३२), आदित्य प्रकाश राऊत (२०) आणि गणेश विलास उले (१९) यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्यांची कबुली दिली आहे. आरोपी हे 'हॅण्डल लॉक' न केलेल्या मोटारसायकलींना लक्ष्य करून, त्या थेट सुरू करून घेऊन जात असल्याचे तपासात उघड झाले. या पार्श्वभूमीवर, नागरिकांनी आपली वाहने नेहमी हॅण्डल लॉक करून सुरक्षित ठिकाणी पार्क करावीत, असे आवाहन ठाणेदार शीतल मालटे यांनी केले आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक शीतल मालटे यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलिस निरीक्षक योगेश दांडे, पोलिस उपनिरीक्षक विशाल बोरकर, सहायक पोलिस उपनिरीक्षक गोपाल मास्टर, पोलिस नाईक सूरज चिव्हाणे आणि अविनाश चव्हाण यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

**ओवाळणी** ७० स्नानगृहांचे लोकार्पण; 'दीनदयाळ प्रतिष्ठान'चा सामाजिक उपक्रम

# गोधनीतील महिलांना रक्षाबंधनाची अनोखी भेट

**यवतमाळ, दि.९ प्रतिनिधी**

येथील निळोणा जवळील गोधनी गावातील महिलांसाठी, शनिवारचा (दि. ९) रक्षाबंधनाचा दिवस अविस्मरणीय ठरला. दीनदयाळ सेवा प्रतिष्ठानच्या वतीने, गावातील ७० महिलांना स्नानगृहांच्या चाव्या भेट देऊन, त्यांना सुरक्षेची अनोखी 'ओवाळणी' देण्यात आली. रा.स्व. संघाचे अखिल भारतीय सहसंपर्कप्रमुख सुनील देशपांडे यांच्या हस्ते हे लोकार्पण झाले.

दीनदयाळ प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात, निळोणा येथील महिलांनी सुनील देशपांडे यांना राखी बांधली. या रक्षाबंधनाच्या भेटी स्वरूप, संस्थेच्या वतीने पहिल्या टप्प्यात ७० महिलांना स्नानगृहांच्या चाव्या वितरित करण्यात आल्या. यावेळी दीनदयाळ प्रतिष्ठानचे अध्यक्ष नाहर देव, उपाध्यक्ष ज्योती चव्हाण व डॉ. मनोज पांडे, सचिव विजय कढे आणि सहसचिव चंद्रशेखर बिडवाई उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन परसोडकर यांनी केले. याप्रसंगी संस्थेच्या संचालक मधुरा वेळूकर, माधवी राजे, कोषाध्यक्ष धनंजय चव्हाण, एज्युकेशन सोसायटीचे सचिव धनंजय पांडे, योगशिक्षक महेश जोशी, ग्रामपंचायत सदस्य इंदूबाई रामगडे, अंगणवाडी मदतनीस अनसूया आडे आणि जयश्री विधाते यांच्यासह गावातील महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य - सुनील देशपांडे

**■ 'महिलांना सुरक्षित वाटावे, यासाठी स्नानगृह ही एक मूलभूत गरज आहे. ही गरज ओळखून, संस्थेने आणि सरपंचांनी केलेले हे काम अत्यंत स्पृहणीय आहे,' असे मत रा.स्व. संघाचे अखिल भारतीय सहसंपर्कप्रमुख सुनील देशपांडे यांनी व्यक्त केले. 'आपले गाव स्वच्छ, सुंदर, सुरक्षित आणि विकासाभिमुख होईल, यासाठी सर्वांनी संकल्प करायला हवा,' असे आवाहनही त्यांनी केले.**

### ग्रामस्थांची कृतज्ञता आणि निर्धार

**■ 'या उपक्रमामुळे आता आमच्या गावातील एकाही महिलेला उघड्यावर स्नान करण्याची वेळ येणार नाही,' अशा शब्दांत उपस्थित महिलांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. गोधनीच्या सरपंच प्रणिता डंभारे आणि त्यांचे पती राजेश डंभारे यांनी संस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त करून, 'आमचे गाव विकासाच्या पथावर अग्रेसर राहील,' अशी ग्वाही दिली.**

# डॉ. गजानन निचत दुसऱ्यांदा भाजपच्या जिल्हा उपाध्यक्षपदी

**दिग्रस, दि. ९ प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या पुसद जिल्हा उपाध्यक्षपदी दिग्रस येथील डॉ. गजानन निचत यांची दुसऱ्यांदा निवड करण्यात आली आहे. त्यांच्या संघटन कौशल्याची आणि पक्षकार्याची दखल घेत जिल्हाध्यक्षा डॉ. आरती फुपाटे यांनी ही घोषणा केली. या निवडीमुळे दिग्रस भाजपमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



भाजपच्या पुसद जिल्ह्याची नवीन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यामध्ये डॉ. गजानन निचत यांच्यावर पुन्हा एकदा जिल्हा उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. डॉ. निचत यांनी जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी आणि पक्ष संघटन वाढवण्यासाठी केलेल्या अथक परिश्रमामुळेच त्यांची फेरनिवड करण्यात आल्याचे डॉ. फुपाटे यांनी सांगितले. या नूतन कार्यकारिणीत दिग्रस येथील महादेव सुपारे, मनोज राठोड, म. आतिक म. इस्राईल, डॉ. विवेक भास्करवार, सुभाष काटेकर, अनिल भरारे, राजेंद्र ठाकरे व परिक्षित पंडागळे यांनाही विविध पदांवर संधी देण्यात आली आहे. दिग्रस शहराध्यक्ष अभय इंगळे यांच्या पुढाकाराने सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून जल्लोष करण्यात आला. या निवडीमुळे पक्ष संघटनेला अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. या निवडीबद्दल डॉ. निचत यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.





# पालकमंत्र्यांनी बहिणींना दिले रक्षणाचे आणि समृद्धीचे वचन

## कर्तव्य आणि परंपरेच्या धाग्याचा रौप्य महोत्सव; शेकडो बहिणींनी बांधले ना. संजय राठोड यांना रक्षासूत्र

अजिंक्य भारत/प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.९ : भारतीय संस्कृतीत भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याला अतूट बनविणारा रक्षाबंधनाचा सण केवळ रक्ताच्या नात्यापुरता मर्यादित नसतो, तर तो मानलेल्या नात्यांनाही कर्तव्याच्या धाग्यात घट्ट विणतो. याचाच प्रत्यय आज यवतमाळमध्ये आला, जेव्हा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांना राखी बांधण्यासाठी शेकडो भगिनींनी येथील बचत भवनात एकच गर्दी केली. गेल्या २५ वर्षांपासून जपलेल्या या परंपरेने अनेकांचे डोळे पाणावले होते, तर संपूर्ण वातावरण भावनिक झाले होते.**



राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड हे यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. शिवसेनेत सामान्य कार्यकर्त्यांपासून सुरू झालेली त्यांची राजकीय कारकीर्द आज कॅबिनेट मंत्रिपदापर्यंत पाहोचली आहे. दिग्रस-दारव्हा-नेर या विधानसभा मतदारसंघाचे ते सुमारे गेल्या २५ वर्षांपासून नेतृत्व करीत आहेत. दरम्यान, त्यांनी मतदारांशी केवळ राजकीय नव्हे तर भावनिक नातेही जपले आहे. मतदारसंघात विकास पुरुष म्हणून त्यांना ओळखले जात असले तरी ना. संजय राठोड हे खरे लोकनेते आहेत. समाजातील सर्वस्तरांशी त्यांचे अतूट नाते आहे. महिलांच्या विकासासाठी त्यांनी विविध योजना राबविल्या असून त्यांच्या सक्षमीकरणासाठी ते प्रयत्नरत आहेत. रक्षाबंधनानिमित्त शनिवारी (दि. ९) बचत भवनात आयोजित रक्षाबंधन सोहळा बघून कुणालाही याची जाणीव झाल्यावाचून राहिली नाही. त्यांना रक्षासूत्र बांधण्यासाठी जिल्हाभरातून शेकडो महिला आणि युवती आल्या होत्या. त्यांनी मोठ्या मायेने पालकमंत्री संजय राठोड यांना राखी बांधली आणि ओवाळले. हा केवळ एक राजकीय कार्यक्रम नव्हता, तर एका भावाने आपल्या हजारो बहिणींना दिलेल्या संरक्षण आणि समृद्धीच्या वचनाचा तो रौप्य महोत्सवी सोहळाच होता. प्रत्येक बहिणीने राखी बांधल्यानंतर, पालकमंत्री राठोड यांनी त्यांना साडीचोळी देऊन ओवाळणी केली आणि त्यांच्या सुखासाठी सदैव पाठीशी उभे राहण्याचे वचन दिले.

हा सोहळा म्हणजे राजकारण आणि संस्कृती यांचा एक सुंदर मिलाफ होता. याप्रसंगी शिवसेनेचे पश्चिम विदर्भ समन्वयक पराग पिंगळे, संपर्कप्रमुख हरिहर लिंगणवार, श्रीधर मोहोड, जिल्हाप्रमुख गजानन डोमाळे, राजूदास जाधव, यशवंत पवार, महिला आघाडीच्या संपर्कप्रमुख कालिंदा पवार आणि संघटिका वैशाली मासाळ यांच्यासह शिवसेनेचे सर्व पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाने भारतीय सण-उत्सवातील कर्तव्य आणि जबाबदारीची भावना राजकारणातही कशी जपता येते, याचे उत्तम उदाहरण घालून दिले.

## महत्वाचे

### भरधाव वाहनाची वृद्धाला धडक

यवतमाळ : शहरातील तेलीपुरा परिसरात रस्त्याच्या कडेने पायी जात असलेल्या एका ७५ वर्षीय वृद्ध व्यक्तीला भरधाव वाहनाने धडक दिली. त्यात त्यांचा पाय फ्रॅक्चर झाला. याप्रकरणी शहर पोलिसांनी अनोहखी वाहनचालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला. मोहम्मद सलीम मोहम्मद निझाम यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे काका मोबीन अहमद मलनस (वय ७५) हे पायी जात होते. यावेळी एम.एच. २९ सी.एच. ३९२२ क्रमांकाच्या वाहनाच्या अज्ञात चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वेगाने वाहन चालवत त्यांना जोरदार धडक दिली. यात त्यांचा उजवा पाय फ्रॅक्चर झाला.

### काठीने हल्ला

**लाडखेड :** जुन्या भांडणाचा राग मनात धरून एका व्यक्तीला काठीने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार ३ ऑगस्ट रोजी येथे घडला. याप्रकरणी लाडखेड पोलिसांनी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. विजय दादाराव जाधव यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी संतोष शंकर आडे याने जुन्या भांडणाचा राग मनात धरला होता. याच कारणावरून त्याने विजय यांच्याशी वाद घालून त्यांना अश्लील शिवीगाळ केली. तसेच, 'तुला जिवंत सोडणार नाही' अशी धमकी देत, हातातील काठीने त्यांच्या उजव्या हातावर मारून त्यांना जखमी केले.

### दुचाकी चोरी

**उमरखेड :** शहरातील मध्यवर्ती असलेल्या माहेश्वरी चौकातील साई आर्केडमधून अज्ञात चोरट्याने पंचवीस हजार रुपये किमतीची दुचाकी लंपास केल्याची घटना ५ ऑगस्ट रोजी घडली. याप्रकरणी उमरखेड शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अरविंद सुदाम दवणे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांनी आपली एम.एच. २९ बी.क्यु. ३७४३ क्रमांकाची दुचाकी साई आर्केड येथे उभी केली होती. काही वेळाने ते परत आले असता, त्यांना दुचाकी जागेवर दिसली नाही.

# दराटी तलावाच्या बांधाला तडे

## शेकडो घरे धोक्यात, गावकरी भीतीच्या छायेत; प्रशासन 'अनर्था'ची वाट पाहतेय?

उमरखेड, दि.९ प्रतिनिधी

उमरखेड तालुक्यातील जंगलव्याप्त दराटी गावातील लघु सिंचन प्रकल्पाच्या तलावाच्या बांधाला गंभीर तडे गेले असून, शेकडो घरांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. तलावाची भिंत कधीही फुटू शकते, या भीतीने ग्रामस्थांना जीव मुठीत धरून राहावे लागत आहे. मात्र, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप गावकरी करत आहेत.

तत्कालीन मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या दूरदृष्टीतून, ५० वर्षांपूर्वी दराटी येथे हा सिंचन तलाव निर्माण करण्यात आला होता. मात्र, सध्या देखभालीअभावी त्याची मोठी दुरवस्था झाली आहे. तलावाच्या बांधावर मोठ्या प्रमाणात झाडे-झुडपे वाढल्याने, बांधाची रचना कमकुवत झाली आहे. सध्याच्या पावसाळ्यात तलाव पूर्ण क्षमतेने भरला असल्याने, पाण्याच्या दाबामुळे बांध फुटण्याचा धोका निर्माण झाला आहे. या तलावाच्या खालच्या भागात सुमारे २५० ते ३०० घरे आहेत. बांध फुटल्यास, मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ग्रामस्थांनी अनेकदा संबंधित विभाग आणि लोकप्रतिनिधींना निवेदने दिली, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. या उदासीनतेमुळे अनेक नागरिक घरे सोडून सुरक्षित स्थळी जाण्याच्या तयारीत आहेत.



### दरवर्षी पावसाळ्यात घरे पाण्याखाली!

**दराटी तलावाची पाणी साठवण क्षमता मोठी आहे. दरवर्षी पावसाळ्यात हा तलाव पूर्ण भरल्यानंतर, सांडव्यावरून पाणी वाहून नाल्याद्वारे बाहेर पडते. मात्र, पाऊस वाढल्यास नाल्याला पूर येतो आणि पाणी दराटीच्या शिवाजीनगर तांडा क्रमांक २ मध्ये शिरते. यामुळे दरवर्षी नागरिकांच्या घरातील अन्नधान्याचे आणि जनावरांचे मोठे नुकसान होते. आता तर तलावच फुटण्याची भीती निर्माण झाल्याने, गावकरी धास्तावले आहेत.**

### अधिकाऱ्यांची सारवासारव

**या गंभीर समस्येबाबत, पाटबंधारे विभागाचे शाखा अभियंता निशांत लहाने यांनी सांगितले की, 'दराटी येथील तलावाच्या भिंतीवर झाडेझुडपे वाढल्याबाबत एप्रिल महिन्यातच निरीक्षण करण्यात आले आहे. त्याबाबतचा सविस्तर अहवाल वरिष्ठांना पाठवण्यात आलेला आहे. मात्र, अहवाल पाठवून चार महिने उलटले, तरीही कोणतीही कारवाई न झाल्याने, प्रशासनाच्या दिरंगाईबद्दल ग्रामस्थ संताप व्यक्त करत आहेत.**

# फुटबॉलच्या वादातून घरासमोर अंदाधुंद गोळीबार

## पुसदमध्ये पुन्हा दहशतीचे सावट, एकाला अटक, तिघे अद्याप फरार

पुसद, दि. ९ प्रतिनिधी

फुटबॉल खेळण्याच्या किरकोळ वादातून, थेट घरासमोर अंदाधुंद गोळीबार झाल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (दि. ८) रात्री पुसद शहरात घडली. वसंतनगर पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर झालेल्या या घटनेने, शहराच्या कायदा-सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले असून, नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे.

वसंतनगर येथील निसार टेलर मार्गावर रात्री साडेदहाच्या सुमारास हा थरार घडला. फिर्यादी हसन खान अजीज खान (३५) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा मावस भाऊ आणि आरोपी शेख साहिल शेख वजीर (२४) यांच्यात फुटबॉल खेळण्यावरून वाद झाला होता. याच वादातून साहिल आणि त्याच्या साथीदारांनी हसन खान यांच्या घरासमोर येऊन बंदुकीने गोळीबार केला. या गोळीबारात हसन खान यांचे वडील अजीज खान फतेह खान (५२) यांच्या डाव्या पोटाला गोळी चाटून गेल्याने ते जखमी झाले. सुदैवाने ते थोडक्यात बचावले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड आणि पोलीस निरीक्षक घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी याप्रकरणी शेख साहिल शेख वजीर याला अटक केली असली तरी, रियाज उर्फ रम्मू अहमद पठाण, मोहम्मद आवेश उर्फ टिंडा मोहम्मद नजीर आणि जुनेद शेखा रफिक शेखा हे तिघे अद्याप फरार आहेत. रात्री घटना घडूनही, पोलिसांनी दुसऱ्या दिवशी दुपारी पंचनामा केल्याने त्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. फरार आरोपींना तात्काळ अटक करावी, अशी मागणी नागरिक करत आहेत.

## पुरामुळे मार्ग बंद



**म्हसोला का. : आर्णी तालुक्यातील म्हसोला का. परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे म्हसोला ते जवळा मार्गावरील ब्राह्मणवाडा आणि शेकलगाव जवळील नाल्यांना पूर आला. नाल्याचे पाणी थेट रस्त्यावरून वाहू लागल्याने, या मार्गावरील वाहतूक शनिवारी (दि. ९) सकाळपासून दुपारपर्यंत पूर्णपणे ठप्प झाली होती. (छायाचित्र : बंडू हलबी)**

## दिग्गज नेत्यांचे मार्गदर्शन | पक्ष संघटना मजबूत करण्याचा शिवसैनिकांचा निर्धार

# बाभूळगावात शिवसेना कार्यकर्ता मेळावा उत्साहात

बाभूळगाव, दि.९ प्रतिनिधी

बाभूळगाव येथे शुक्रवारी (दि. ८) आयोजित शिवसेना कार्यकर्ता मेळाव्याला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. येथील महल्ले सभागृहात झालेल्या या मेळाव्याला शेकडो शिवसैनिकांनी गर्दी केल्याने, कार्यक्रमाला जणू जत्रेचे स्वरूप आले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर आणि पालकमंत्री संजय राठोड यांच्या मार्गदर्शनावर विश्वास व्यक्त करीत, या मेळाव्याने तालुक्यातील शिवसेनेची ताकद पुन्हा एकदा सिद्ध केली.

या मेळाव्याला मार्गदर्शन करण्यासाठी आमदार तथा जिल्हा निरीक्षक ज्ञानेश्वर धाने पाटील, विदर्भ समन्वयक पराग पिंगळे, जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगणवार, जिल्हाप्रमुख गजानन डोमाळे, उपजिल्हाप्रमुख सचिन महल्ले, महिला आघाडी जिल्हाप्रमुख कालिंदी पवार, संपर्कप्रमुख माधुरी आराठे, युवासेना प्रमुख विशाल गणात्रा आणि नगराध्यक्षा संगीता मालखुरे आदी उपस्थित होते. नेत्यांनी पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांना महत्त्वाचे निर्देश दिले. कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र पांडे, रमेश बहाड, अयुब भाई आणि डॉ. बबनराव बोंबले यांच्या उपस्थितीने कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित झाला. या मेळाव्याच्या यशस्वी आयोजनात सुधीर कडूकार, शब्बीर खान, विजय भेंडे, गजानन वानखडे, युवराज महानूर, मुन्ना पटेल, चंद्रशेखर अर्जुने, गोलू अलोणे, गणेश येळणे, मनोज हिवरकर, आशीष ठाकरे, धीरज कोंबेक, सोमेश चेटुले, राहुल ओकटे, अनिल वाघमारे, तेजस गावंडे, स्वप्नील मुडे, जाकीर खान, नितीन महालगावे, तेजस गंधे, मोहित शिरस्कर आणि विनोद राठोड यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. अपर्णा वानोडे यांनी संचालन केले.




# महाळुंगी येथील कपाशी पिकाचे नुकसान

आर्णी, दि. ९ प्रतिनिधी

शनिवारी रात्रभर झालेल्या वादळी वाऱ्याने आणि मुसळधार पावसाने शेतकऱ्यांच्या डोळ्यादेखत त्यांच्या उभ्या पिकांचा चिखल केला आहे. आर्णी तालुक्यातील महाळुंगी येथील शेतकरी पंकज उकंडराव तुनगर यांच्या चिखली शिवारातील दोन एकरमधील कापसाचे पीक या नैसर्गिक आपत्तीत पूर्णपणे भुईसपाट झाले आहे.

हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने बळीराजा पूर्णपणे हवालदिल झाला आहे. या नुकसानामुळेझालेल्या कर्जाची परतफेड कशी करावी, या चिंतेने त्याला ग्रासले आहे. त्यामुळे शासनाने या नुकसानाचे तत्काळ पंचनामे करून आम्हाला आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी पंकज तुनगर यांच्यासह परिसरातील इतर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

